# वर्णमुद्रा

वर्णमुद्रा
इ–जर्नल
(मुद्रितप्रत, केवळ खासगी वितरणासाठी)
अंक सतरावा / मे–जून २०२४
किंमत : १५०/– देणगीमूल्य (मुद्रितप्रतीसाठी)



# अनुक्रमणिका


। मुखपृष्ठ ।
मुग्धा देशपांडे
। सुरुवातीचे काही शब्द ।
मनोज सुरेंद्र पाठक
। कविता ।
प्रकाश हरी कार्लेकर, मनीषा उगले, राहुल पुंगलिया
। स्मरणसूक्त ।
स्मरणातील कथा : शिरीष चिंधडे
। चित्रे/रेखाचित्रे/छायाचित्रे ।
मुग्धा देशपांडे
। कथा ।
एडगर ॲलन पो, अनुवाद : शैलेंद्र मेहता
। सहोदरांचा शोध ।
ओरहान पामुक : महेश्वर लव्हेकर
। लेख/ललित लेख/टिपण/मुलाखत ।
सिनेमा : दोन टिपणे, नंदिनी देशमुख
घडवीन असे मी वृत्त : योगिता जाधव
जॅक केरुआॅकची टेड बेरिगनने घेतलेली मुलाखत : अनुवाद – डॉ. स्मिता घैसास
तत्त्वभान : लेखांक २ – सुरेंद्र दरेकर
'उद्या' : भविष्यभीतीचं भयावह चित्र – अभिषेक वाघमारे
। गंभीर किंवा गमतीदार ।
चं. प्र. देशपांडे यांची फेसबुक पोस्ट
सुरेंद्र विठ्ठल दरेकर यांची फेसबुक पोस्ट



। संपादन साहाय्य ।
नंदिनी देशमुख, शरद बिन्नोर, अभिषेक वाघमारे
। निर्मिती साहाय्य ।
उमा नाबर, महेश गवाणकर, भाग्यश्री बनहट्टी

# सुरुवातीचे काही शब्द

जानेवारी २४ मध्ये मी बिचकत बिचकत काही मित्र-मैत्रिणी सुहृदांकडून वर्गणी स्वीकारली. अंक तसेही निघतच होते आणि निघत राहिलेही असते, परंतु मला माझा स्वतःचाच काही भरवसा देता येत नाही. न जाणो कधीतरी आपल्यालाच वाटेल की, झाले तेवढे पुरे झाले- आता, दुसरे काही करून पाहू.

मग खोड्यात अडकवून घेतलेल्या मानेला कसं सोडवणार, म्हणून वर्गणीदार करण्याऐवजी आधीप्रमाणे सुटे मुद्रित अंक ज्यांना हवे असतील त्यांना देत जावे.ऑनलाईन अंक तर वेबसाईटवर तसेही सदैव उपलब्ध असतातच.




प्रकाशन संस्थेचे मुखपत्र असल्याने साहजिकच अंकातील मजकुराचा भर हा वर्णमुद्राने प्रकाशित केलेल्या पुस्तकांविषयी दिसून येतोच. तरीही महत्त्वाची काही सदरे पाहिली तर माझी धडपड जागतिक साहित्य मराठी वाचकांना उपलब्ध करून देणे अशाच स्वरूपाची आहे. सुदैवाने जागतिक साहित्यात आस्था आणि रुची असणारे मित्रमैत्रिणी, सुहृद वर्णमुद्राशी जोडले गेले आहेत आणि त्यांच्या आधिव्याधितापांमधून वेळ काढून ती माणसे माझे हट्ट पुरवत आहेत. मी अशा त्या त्या सगळ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.




वयोवृद्ध ज्येष्ठ कवी, लेखक, समीक्षक, ते नव्याने लिहू लागलेले तरुण पिढीचे लोक मला रसद पुरवत आहेत.

ह्या अंकात प्रकाशित करण्यात आलेल्या सगळ्याच साहित्यप्रकारांतून तुम्हांला ते दिसून येईलच.




२०२४ मधील हा तिसरा अंक आहे. आणखी तीन तर काढूच. पुढचं पुढे.

'शाम से पहले क्यूँ हम सोचे, क्या होना हैं शाम के बाद!'

**मनोज सुरेंद्र पाठक**



## प्रकाश हरी कार्लेकर

### १) आभार

लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्त्वावर
घर घेणे आहे.
मुदत डिपॉझिट भाडे अन्य अटी
मालक, तुम्ही म्हणाल तशा
माझी अट फक्त इतकीच
दरवाजावर माझ्या नावाचा बोर्ड असेल
तात्पुरता
''जगा आणि जगू द्या''
शेवटी आपला काय
ओ.पी.नय्यर किंवा सिंघानिया होणार
बिनघराचा बिनवस्त्रांचा
आपण कोण काय ठरवणार?

डिपॉझिट : दोन-चार शिव्या दहा-बारा शुभेच्छा
भाडे : रात्रीची झोप सकाळची जाग
मुदत : पुरून उरेल इतके भरगच्च अज्ञान
सोडून देऊ घर तुम्ही सांगाल त्या क्षणाला
कोणी सांगण्याआधीच सुटले तर बरेच
(ती जुनीच सवय
कोणी 'ऊठ' म्हणण्याआधीच उठून चालू पडायचे.)

पण मालक
घर बरे होते, बरे का.
ज्या असतातच, राहून जातात त्या उणिवांसकट
मालक, हे घ्या तुमचे घर तुम्हाला परत
नीट पाहून घ्या

भिंतीवर आम्ही कुठे कुठे
शिलालेख कोरलेले नाहीत ना
जमीन उकरून तळघर धुंडाळले नाही ना
छप्पर उचकटून आकाशात नजर खुपसली नाही ना
घेणेकऱ्यासारखे पुन्हा जन्माला घालू नका
डिपॉझिट? ते राहू द्या. तुम्हालाच राहू द्या.
उपयोगी पडेल पुन्हा डागडुजी करायला.

### सटवी

वादळाचा धुडगूस नुसताच
सरळसोट माणसांना वेडंवाकडं पळवून लावणारा
इस्पितळातून सुटलेल्या अडाणचोट वेड्यासारखा
संध्याकाळ येते नुकतीच
वय उलटून गेलेल्या गतिमंद मुलीसारखी
रंग उडालेल्या भिंतीसारखी
फतकल मारून बसते आयुष्याच्या उंबरठ्यात
ढगही गडगडत नाहीत भीतिदायक
कैक सहस्र वर्षांपूर्वीच्या, म्युझियममधील

डायनासोरच्या सांगाड्यांसारखे अक्राळविक्राळ
आणि गलितगात्र, थिजल्यासारखे
आभाळात बसून राहतात
लहानग्यांनी मुताच्या पिचकाऱ्यांचा खेळ खेळावा
तशी पर्जन्यवृष्टी होते इतस्ततः
बेसावध आभाळाच्या खाचखळग्यांतून
विजा चमकतात संभ्रमित भ्रमिष्टासारख्या
गावभवानी वाकुल्या दाखवत
तुटून पडत नाही एकही
अर्ध्यामुर्ध्याही साक्षात्कारासारखी
रात्रभर गच्च काळ्या शाईचे आभाळ
कपाळमोक्ष झाल्यासारखे सरकत राहते
या टोकाकडून त्या टोकाकडे
संन्यस्त प्रेतांसारखे
सकाळ उगवते अशी सटवी की जसे काही काल
काही झालेच नाही

घराकडे
एक दिवस
उगवला धावला थकला.

रांधा
वाढा
आवारा
पेंगुळत
पेंगुळत
झोपा

बिस्तर
निस्तर
एक रात्र
कंटाळली काळवंडली कोमेजली
पहाट
सारवासारव
पुन्हा सकाळ
सैरावैरा.

## ३) घर

घर
शाकारलेले
उचकटलेले
दार
उघडझाप
वेळच्या वेळी

रस्ते
आपण
पाठलागावर
एकमेकांच्या
संध्याकाळ
हताश
परतणारी

**प्रकाश हरी कार्लेकर ह्यांचा**

**आगामी कवितासंग्रह**

***'समाधानांचे निराकरण'***

## मनीषा उगले



### १)

हे निर्वाणीचे शब्दच यापुढे
संचित म्हणून सांभाळून ठेव,
तुला देण्यासारखे
माझ्यापाशी दुसरे काही नाही
विरक्तीच्या कुंपणापल्याड
लेकरांना ताटकळत ठेवून
तू ध्यानस्थ झालीस शून्यात
तुला कसे कळले नाही,
अर्भकांसाठी पाझरणारी माया
पदराआड सुकवत बसल्याने
कुठल्याही स्वर्गाचे दार उघडत नसते
आमच्या शैशवाचे अंगण सुने ठेवून
तू कोणत्या मोक्षाची लिपी गिरवते आहेस,
आई?

### २)

बाईच्या मनातला पसारा
घरात दिसतो
हे घर आरसाच आहे
माझ्या मनाचा
जागेवर नसलेल्या
वस्तूंचे काय सांगता
इथे हल्ली
मीही स्वतःला सापडत नाही
सैरभैर होणारे मन
मी सांभाळू पाहते नेटाने
तर तितक्याच अचपळपणे
ते चहूदिशांना पांगू लागते
बरणीतून सांडलेल्या मोहोरीसारखे
मला हे एवढे कोण विखरून गेले आहे?

### ३)

गडद सांजावलेय आई
तू डोळे मिटून का बसलीयेस?
सूर्यकुळाचा वारसा असतानाही
अंधारच आपले प्राक्तन आहे
असे तुला नेहमी का वाटते?
तू आगीनफूल आहेस लखलखणारे
अशी धगीला भिऊ नकोस
ज्यांनी दुःखाच्या पहाडाचे पाणी होते
आणि भय कापरासारखे उडून जाते
ते तुझे तेजस्वी नेत्र उघड ना आई
मग आपले घर उजळून निघायला
कितीसा वेळ लागेल?

# राहुल पुंगलिया



## १)

कॉर्पोरेशनच्या वॉकिंग ट्रॅकवर
ही समोरून चालत येणारी
अन् मागून ओलांडून
पुढे चालत जाणारी माणसं.

कुठल्याही देशाच्या बुलंद सैनिकांपेक्षा
कमी नाहीत ही.
अहोरात्र चाललेल्या
अनंत युद्धासारखं त्यांचं आयुष्य.
रात्रंदिन त्यांना युद्धाचा प्रसंग.
सैनिक जसे
अभिमानाने मिरवतात अपंगत्व.
धाडधाड आपटत कुबड्या
फिरतात डौलदार.
किंवा भराभरा फिरवतात खुर्चीची चाकं
पाय गमावला तरी
आणि जे नसतात इतके सुदैवी
देशासाठी त्याग करण्याची संधी मिळालेले
त्यांना दाखवण्यासाठी असतातच
आत घुसलेल्या गोळ्यांच्या खुणा.
ज्या सहज बोलता बोलता
जेवणानंतरच्या गप्पांवेळी दाखवतात
अनिच्छेने शर्ट उचलून
किंवा बाही मागे सारून
७७ च्या धुमश्चक्रीत
अमुक रणभूमीवर
पोटरीत ही गोळी शिरली
आणि ९३ च्या रणधुमाळीत
मांडीत ही दुसरी.

तसेच हे व्यायामासाठी चालायला येणारे झालेत
अनेकदा अनेक ठिकाणी
जायबंदी
त्यांच्या शरीराच्या भूगोलांवर
वेगवेगळ्या अक्षांश रेखांशावर
आहेत बारा गावच्या
डॉक्टर आणि सर्जननी
कापलेल्याच्या खुणा.
इतके टाके
की पेच पडावा
माणसं आहेत ही
की आहेत सदरा?

या सहज गप्पा मारत येणाऱ्या स्त्रिया
आहेत ना,
त्या,
स्त्रियांना
कॉम्बॅट ड्युटी मिळण्याआधीच
कित्येक वर्षांपासून,
मिरवतायेत ओटीपोटांवर
सिजेरियनच्या पंधरा-सतरा टाक्यांच्या खुणा.
आणि हिंडतायत तरीही सस्मित
करत कुचाळक्या ओळखीच्यांच्या
निरलस भावाने
एकदम प्रोफेशनली निर्विष.

नागरी पुरुषांच्या तर
विचारूच नका
बहादुरीच्या खुणा.
ओपन हार्टसाठी
गळ्यापासून पोटापर्यंत
दिलेला सरळ छेद
अन् खाली हर्नियाची नक्षी
त्याखाली मुळव्याधीचे टाके
एन्जिओग्राफीची छिद्रं

फाडाफाड नंतर शिवाशिव
अंगभर
आणि मनांवर तर असंख्य टाके
इतके
की पेनकिलर खाऊनच
काढायचे उरले दिवस

सैनिकांच्या अंगांवर जशी
जखमांच्या स्वरूपात
उभी राहतात जुन्या युद्धांची स्मारकं
तसेच यांनीही सहन केलेत
सर्जनच्या चाकूचे वार
अंगभर.

वॉकिंग ट्रॅकवरची कवायत
काही कमी नाही
सैनिकांच्या परेडपेक्षा.
सतत सज्ज अन् चौकन्ने
राहते सैन्य
रोजच्या फ्लॅग मार्चमुळे.
तसेच यांनाही राहावे लागते सुसज्ज.
म्हणून सकाळी संध्याकाळी
वॉकिंग ट्रॅकवर पडतात लयबद्ध पाऊले,
वन टू वन टू
शेवटपर्यंत.
मग पीछे मुड
वर खाली वर खाली.
जसा हिंडावा एखादा सेंटरी नाईटवॉचवर.

शत्रू तर सगळीकडे आहेत
घरात नात्यात
कोणाचा नवरा कुणाचा मुलगा
कुणाची बहीण कुणाची बायको
हाडवैरी कोणाची सख्खी आई
तर कोणाचा बाप निर्दय कर्दनकाळ.
झोपेत चिरावा गळा
असे घरातलेच लोक.
अन् बाहेर धंद्यात
ऑफिसमध्ये वैरी टपलेले
धोकेबाज गद्दार
ब्लडप्रेशर वाढवणारे
शुगर सुरू करणारे

सैनिकांसारखेच यांचे
चालण्याचे खास गणवेश
धक्कारोधक बूट पायांमध्ये
हातात पाण्याची बाटली
आणि कानात खुपसलेल्या वायरी
आहेत संदेशवहनाची सामग्री
शत्रूच्या आक्रमणाची बित्तंबातमी
त्याला स्वतःला कळण्याअगोदर
यांना कळते.

यांच्याही डोक्याचा पार भुगा झालेला
आता बायेंमूड
का दायेंमूड ?
का सरळ चालत जाऊन
खुपसू बॉयनेट पोटात
बॉसच्या, नवऱ्याच्या ?
का कमांडो ट्रेनिंगमध्ये शिकवलेले
डावपेच वापरून
बॉयफ्रेंडच्या मानेवर

एक चॉप मारून
तोडून टाकू सातवा मणका
असे चिंतन सदैव मनात.

पोटात खदखदते आग
कारण मोहीम चालू असताना
कधी जेवायला मिळेल
काही सांगता येत नाही
वाटेत जे मिळेल ते पोटात टाकायचे
जसे सैनिक करतात
सरपटणारे साप आणि विषारी विंचू.
तसे खाऊन घ्यायचे वडेपाव जाता जाता
किंवा गिळायच्या पाणीपुऱ्या
आणि जायचे पुढे

शूर शिपाई जसे असतात राष्ट्रभक्तीने प्रेरित तसे हे
स्थूल सस्तन नागरिक
देशभक्तीने पेटलेले
शत्रुराष्ट्र आणि शत्रुधर्माच्या
नुसत्या नावानेदेखील
डोक्यात त्यांच्या तिडीक जाते

कृतज्ञ असतो आपण
सीमेचे रक्षण करणाऱ्या सैनिकांप्रती
तशी कृतज्ञता बाळगूया का
या नियमित चालणाऱ्या नागरिकांप्रती ?

या शहराच्या रस्त्यारस्त्यांमधून
इमारतींच्या जिन्यांत
अपार्टमेंटमध्ये भिंतींच्या आत
अहोरात लढत राहणाऱ्या
नागरिकांना सलाम

## २)

मानेवरती दुश्चिन्हं रुळवणारी
ही कठीण रात्र.
रंगहीन काठांवरील
दगड-गोट्यांनाही शिसारी येईल,
अशा पाण्याच्या खुणा
अर्ध्या आत
बाहेर अर्ध्या
ओल्या, वाळलेल्या.

विमनस्क अनिश्चित
त्या तळ्याभोवती उभी आहे
कष्टप्रद वाट बघत
ही अवघड वेळ.
वर अप्राप्य आकाश
खाली सखोल जमीन
मध्ये अंथरलेय अधांतर
पाण्याचं अनिवार्य तळं.
आणि
तिथं काहीच होत नाहीये नवं.
एकांडा बगळादेखील कंटाळून
उडतो इथून
फक्त तिथे.
माणसांची आयुष्य आहेत
आसमंतांच्या भिंतींवरून चाललेले
रक्ताचे ओघळ.

लठ्ठ आणि बुटके प्रवास
चहाच्या कपात तीन बिस्किटं बुडवलेले.
रेल्वे बाहेरून पहारा देतंय क्षितिज
तुमच्यावर बंदुकीच्या नळीसारख्या
खिडक्या रोखून.

ही गाडी पोचेस्तवर
स्टेशन म्हातारं होत होत मरून पडलेय.
वेग मंदावत फलाटावर थांबतीये गाडी.
मुंग्यांसारखी माणसं लागलीये
असं हे स्टेशनचं निश्चेष्ट प्रेत.
नाकासमोर सूत धरा तिकिटाचं
खात्री करा अन् बाहेर पडा.

या कळाहीन शहरात शोधा
आपआपली घरं
चहा घ्या.
घराघरातील बाथरूममधलं बेसिन
पुनर्निर्माण आहे
त्या अजस्र बेशुद्ध पडलेल्या तळ्याचे.
आणि या कडेवरून बेसिनच्या
पलीकडे दूर असीम आरशाच्या मर्यादेत
पुन्हा पुन्हा शोधते नजर
काही पुरावा अस्तित्वाचा.
तरी येत नाही उत्तर पलीकडून
म्हणून भांबावते
हरवून जाते नजर वारंवार.

कुठेही जा
ती दुःखद वेळ संपत नाही कधी.

कळाहीन रंगहीन दुःखांचा ससा
धावतोय तुमच्यासमोर
खुरट्या झुडपांमधून
वेड्यावाकड्या उड्या घेत वैराण पठारावर.
आणि मागे धावतोय आपण
अन् डोक्यावरील सूर्य
भाजून काढतोय
सताड उघडी सोशिक पाठ.
जळतोय घशात
तहानेचा तेजस्वी दिवा.
हा दुःखाचा ससा कोणाचा ?
तुमच्या की अजून कोणाच्या दुःखाचा ?
का केवळ गैरसमजापोटी
तुम्ही धावताय त्यामागे ?

या मावळत्यावेळी
अंध पुरुषाचे अंतहीन डोळे
टक लावून बघतायेत
अंध स्त्रीच्या मनात.
तिने मनावर ठेवलेली
दोन हातांची फुली
अलगद बाजूला करून
कळतं त्याला
की तिलाही कधीतरी मागे
दृश्याचं स्वप्न पडलं होतं.
तिच्या आठवणींमध्ये डोकावून
हे चाणाक्ष आकलन कशासाठी ?
तिला वश करण्यासाठी केवळ ?
आंधळ्यांचा रोमान्स.

एक शब्द नाही फुटणार बाहेर
ओरड किती ओरडायचं ते.
आणि जे काही
टाईप होत चाललंय तुझ्या बोटांनी
ते माझ्या मनातलेय
तुझ्या मनातलं नाहीये.
हतबल बोटं तुझी,
साशंक बलात्कारितेसारखी
थरथरतायत कीबोर्डवर.

लिही, लिही, अजून लिही तू.
ते शब्द
अगोदरच हारीने मांडून ठेवलेत
शब्दकोशांमध्ये अनुक्रमे.
ते विस्कटल्याने तुला काय वाटते
अर्थाची पैदास होईल ?

नाही,
हा भ्रम आहे,
तू साधं चित्कारूही शकत नाहीयेस
तू हसूही शकत नाहीयेस, विफल.




**राहुल पुंगलियाच्या कविता (१)**
**राहुल पुंगलिया**
**किंमत : ₹ ३२५/–**
**सवलतीत ₹ २५०/– ला पोस्टेजसह घरपोच मिळेल.**

**संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, जिल्हा बुलढाणा**
**९९२३७२४५५०**
**नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसअॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.**

**अकाउंट डिटेल्स :**
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

**किंवा**



# पाचशे ठोंबे
## शिरीष चिंधडे



*कोणे एकेकाळी मी कथा लिहीत असे. मटा, तरुण भारत, सत्यकथा, काही मासिके यांत त्या प्रसिद्ध झाल्या. पुढे रसवंती बंद पडली. काल फायली शोधताना हे प्रकरण सापडले.*

*ऑलमोस्ट ४५ वर्षांपूर्वी मी एका खेड्यातल्या कॉलेजात चिकटलो, तेव्हा लिहिली होती.*

**– शिरीष चिंधडे**

---

तालुक्यातालुक्याला कॉलेजं उभे करण्याची सुखद घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आणि तालुक्या–तालुक्याच्या ग्रामसिंह पुढाऱ्यांत चैतन्य पसरले. अधिकार गाजवायची आणखीन एक जागा सनदशीर पद्धतीनं निर्माण झाली. घोषणा झाली आणि जिल्ह्याचे खासदार, तालुक्याचे आमदार, झेड.पी.चे पदाधिकारी, ग्रामपंचायतीतली मेंढरं, अशा सर्वांच्या हिरिरीच्या प्रयत्नाने कुगाव ग्रामी कॉलेज उभे राहिले. याही गोष्टीला अर्धा डझन वर्षं एव्हाना होऊन गेली. या काळात 'जाखाई जोखाई कला आणि वाणिज्य महाविद्यालय' कुगावात या ना त्या कारणाने गाजू लागले. मग ते गॅदरिंगचे निमित्त असो, क्रीडासप्ताह असो, विविध गुणदर्शन असो, साहचर्य संध्या असो, नाहीतर मराठी विभागाच्या प्राध्यापकी

डोक्यांतून निघालेले आणखीन अशाच मोहक नावांचे कार्यक्रम असोत. कॉलेजात कार्यक्रम म्हटला की शिस्तीचा– खरं तर बेशिस्तीचा– प्रश्न विक्राळ रूप धारण करू लागे. कुस्त्यांची दंगल असते तसा हाही दंगलीचा पर्वकाळच होऊन बसला.

यावर्षी मात्र 'महाविद्यालय' गाजू लागले ते जरा वेगळ्याच कारणाने. गेले सहा महिने प्राध्यापकांना पगारच मिळालेले नव्हते. तशी इथली प्राध्यापक मंडळी सोशिक हो! कॉलेज सुरू झाल्यापासून त्यांनी एकरकमी आणि पूर्ण पगार कधी बघितलेलाच नव्हता. दर महिन्याला पन्नास रुपये इमारत फंडासाठी खुषीची देणगी पगारातून परस्पर कापून घेतली जाई. उरलेल्या पैशांपैकी प्रत्येक शंभर रुपयांचा हिशेब कुणाही प्राध्यापकाला कधीही मिळालेला नव्हता. पण निदान ॲडव्हान्स, उचल, अशा या ना त्या स्वरूपात काहीतरी किडूकमिडूक हातात तरी पडायचे. यावर्षी मात्र आक्रीत झाले. सहा महिने पगारच झाले नाहीत. काळं कुत्रंदेखील हे गुपित ओळखून होते. प्रा. हरी रामचंद्र कुळकर्णी याच गोष्टीचा विचार करण्यात गुंतलेले होते. म्हणजे घरी बसलेले नव्हते. प्राचार्य कुणालाच घरी बसू देत नसत. प्रा. कुलकर्णी वर्गातच बसलेले होते. पोरांना स्वाध्यायलेखन सांगून ते चिंतन– अर्थात चिंतामग्न झालेले होते. त्यांच्या मनात शेट धनमल मणिराम वाणी यांचे शब्द नारोशंकरच्या घंटेप्रमाणे घणघणत होते.

सकाळचा तो प्रसंग होताच तसा विद्धकारक...

प्रा. हरी रामचंद्र कुळकर्णी या महाविद्यालयाच्या उद्‌घाटनापासून इथेच चिकटून होते. उद्‌घाटनाचा सोहळाही त्यांना हुबेहूब स्मरत असे. मुख्यमंत्री उद्‌घाटनाला आलेले होते. पुढारी मंडळींनी स्टेजवरील सगळ्या खुर्च्या अडवून ठेवल्याने खुद्द प्राचार्यांनादेखील समारंभभर उभेच राहावे लागले होते. प्रा. हरी रामचंद्रांची जिद्दच दांडगी. पी.डब्ल्यू.डी.त कारकुनी, शाळेत ग्रंथपाल, पोस्टात नोकरी अशा आडवळणाने वयाच्या चाळिशीपर्यंत त्यांनी एम.ए. (मराठी) मिळवून 'जाखाई जोखाई महाविद्यालयात' प्राध्यापकाची चेअर जिंकली होती. सेवाज्येष्ठता सर्वाधिक असल्याने प्रा. हरी रामचंद्र यांचे नाव भावी प्राचार्य म्हणून कधीमधी दबल्या आवाजातून उच्चारले जाई. प्रा. हरी रामचंद्रदेखील त्या दृष्टीने प्रयत्नशील होतेच. त्यांचे गोत्र अत्री. 'अत्री आणि सर्वांशी मैत्री' हे त्यांचे सूत्र. त्यानुसार ते एक मनमिळावू प्राध्यापक म्हणून ख्यातकीर्त होते. विशेषतः महाविद्यालयाच्या व्यवस्थापक मंडळातील मान्यवर सदस्यांशी त्यांचे स्नेहाचे संबंध होते. विद्यमान प्राचार्य निवृत्त व्हायला आता केवळ तीन वर्षे उरलेली असल्याने हा विषय 'प्राध्यापक विश्रांतिके'त जरा जिव्हाळ्यानेच चघळला जाई. प्रा. हरी रामचंद्र मनोमनी हरखून जात. फक्त इंग्रजी डिपार्टमेंटच्या चंद्रमौली मोहिते–पाटीलपासूनच त्यांना धोका होता. तोही या प्राचार्यपदाच्या रेसमधला एक तगडा घोडा होता.

आज मात्र प्रा. हरी रामचंद्र सचिंत झालेले होते. निगर्सकृपेनेच मुदलात वाकडा असलेला त्यांचा चेहरा ते चिंताग्रस्त झाले की भयानक वाकडातिकडा होई. तसा तो आज झाला. त्यात पुन्हा पेपरवेटच्या काचांएवढा जाड भिंगांचा चष्मा. एखाद्या खोल ढोलीतून घुबडाचे डोळे चमकावेत तसे त्यांचे डोळे चमकत... आजच्यासारखा प्रसंग गेल्या सात वर्षांत आलेला नव्हता. सात वर्षांपूर्वी किती सुख, स्वास्थ्य आणि भरवंशाची भक्कम भावना होती. गावाला महाविद्यालयाचं कवतिक होतं. तरणीताठी पोरे सुटाबुटात, गळलंगोट अडकवून लगबगीने महाविद्यालयाकडे जाताना दिसली की गावाला वाटे, आपण सुधारलो! स्वतःला 'प्राध्यापक' म्हणवून घेणारी ही पोरे मासिकात गोष्टी, कवने लिहायची, पेपरात लेख लिहायची. गावाला वाटे, आपल्याला संस्कृती सापडली. आपलीही पोरं आता चार बुकं जास्त शिकतील, पाटलोणी घालतील, गळ्यात रंगीबेरंगी लंगोट्या अडकवतील. नोकऱ्या करतील, मोठी

होतील आणि आपल्याला पोसतील, ही सुखद भावना गावाच्या मनात दाटून येई. पहिल्या दोन-चार वर्षांत तर महाविद्यालयातून अर्धवट किंवा पूर्ण शिकून बाहेर पडलेल्या पोरांना तर चटाफटा नोकऱ्या मिळून गेल्या होत्या. त्यामुळे आपल्या स्वप्नाला भक्कम पाया आहे हे गावाला पटलं.

पंधरा-वीस प्राध्यापक, डझनभर आणखीन सेवकवर्ग आणि आसपासच्या खेड्यांतून शंभर-दोनशे पोरांची गावात आयात झाल्यावर गावाचा नूरच पालटायला लागला. घरांची टंचाई सुरू झाली. किराणा, स्टेशनरी, हॉटेल, कापडचोपड अशा सगळ्याच मालाला एकदम उठाव मिळायला लागला. एक तारखेला हमखास पैसे हजर होत असल्याने किराणाभुसारवाल्या शेटजी मंडळींचा आनंद त्यांच्या वाढत्या पोटात मावेनासा झाला.

प्रा. हरी रामचंद्रसमोर गेल्या सात वर्षांतला इतिहासपट सरकत होता. ते सेवाज्येष्ठ, वयाने अधिक, दिसायला थोराड, वागण्यात गोड, यामुळे यांचा एकूण पोरांवर बरा वचक होता. अगदी प्राचार्यांपेक्षाही इंचभर जास्तच. त्या काळी पोरांची संख्यासुद्धा तुडुंब होती. नव्या आकृतिबंधाची चाळणी लागलेली नसल्याने हे एक सुख होते. पहिल्या वर्षीच महाविद्यालयात दोनशेच्या वर डोकी जमली होती. फीचं उत्पन्न ठीक होतं. मुख्य म्हणजे पोरांमध्ये शिस्त, जबाबदारी यांची भावना होती; कॉलेजचं कौतुक होतं. प्राध्यापकांची वर्गात प्रविष्टता झाली की ही येडपट पोरे त्यांना नम्रपणे उत्थापन देत! त्याने सांगितले की मगच ती खाली बसत. प्रश्न विचारला की उभे राहून उत्तरे देत. रस्त्यात सर भेटले की नमस्कार ठोकत. सगळे कसे पद्धतशीर होते.

संस्कृती गावाच्या मनात मुरायला लागली; ज्ञानाची गंगा अंगणात आली; समृद्धीच्या पाउलवाटा उमटायला लागल्या. गावात महाविद्यालय आल्याने गाव आनंदला.

दिवस गेले, महिने सरले, वर्षे झाली. कॉलेज मोठं व्हायला लागलं. पदवीपर्यंत वर्ग वाढले, अनेक विषय शिकवण्यात येऊ लागले. विद्यार्थीसंख्या चांगली पाचशेला भिडली...

...आणि सर्व काही 'आलबेल' नाही ही जाणीव प्रथम झाली ती सहाव्या वर्षीच्या संमेलनाप्रसंगी. नाटकात, विविधगुणदर्शनात निवड न झाल्याने स्टेजवर झकपक कपडे घालून मिरवण्याची संधी न मिळालेले असंतुष्ट आत्मे पिसाळले. शेंदूर प्यायल्याप्रमाणे नरडे असलेला जनरल सेक्रेटरी (त्याला 'महामंत्री' म्हणायचे; अगदी प्राचार्यदेखील!) सूर्यभान मोहिते चिडलेला होता. त्याला विविधगुणदर्शनात पाच गाणी म्हणायची होती, परंतु निवड समितीने त्याला संधी दिलेली नव्हती. याचा त्याने बिनधास्त बदला घेतला. तीन अंकी नाटकातलं मुख्य पात्रच त्याने पळवून नेलं. एकांकिका ऐन रंगात आली आणि एकदम स्टेजखालून दण्ण्या फटाक्यांची सरबत्ती सुरू झाली. कशी कोण जाणे, परंतु दगडफेकही सुरू झाली. स्टेजवरील नाटकाचा तर तमाशा झालाच; प्रेक्षकांनादेखील पळता भुई थोडी झाली. एकाने ध्वनिवर्धकाचे कनेक्शन तोडून टाकले. दुसऱ्याने तर 'मूले कुठारः' या न्यायाने विजेचा फ्युज काढून घेतला. सर्वत्र अंधार. मग पोरांनी पोरींच्या पदराला हात घातले. तरुण प्राध्यापक तर हुडहुडी भरून घाबरून गेले. हिंदी शिकवणारा पोरगेलासा प्रा. सुरेंद्रकुमार कटारिया याच्या तर कोणीतरी थोबाडीत दिली. इंग्रजीचे प्रा. मोहिते-पाटील यांच्या नव्या कोटावर कोणीतरी डांबर ओतले. सुरक्षिततेचा उपाय म्हणून सगळे प्राध्यापक 'विश्रांतिके'त आले. सर्वांना प्रा. हरी रामचंद्रांना विनंती केली की काहीतरी करून शांतता प्रस्थापित करा. प्रा. हरी रामचंद्र सुखावले. ते एक गॅसबत्ती घेऊन स्टेजवर आले. आणि अंधारातून भिरभिरत आलेल्या एका कंगोरेदार दगडाने त्यांचा एक पटाशीचा दात लीलया उखडून टाकला. ही हद्दच झाली. पोरांनी प्रा. हरी रामचंद्रांच्या नावे घोषणा सुरू केल्या,

‘हरिमामा बैठजाव!’ त्या रात्रीपासून प्रा. हरी रामचंद्र यांचे ‘मामा’ हे बारसे होऊन गेले. इतर प्राध्यापकांनादेखील यथाकाल अशी नावे मिळालीच.

या साऱ्या बिनधास्त प्रकाराने गावात प्रचंड खळबळ उडाली. लगोलग महाविद्यालयाचे व्यवस्थापक, प्राचार्य, गावातली लब्धप्रतिष्ठित मंडळी यांनी एक सभा घेऊन या प्रकाराचा सर्वांगीण वगैरे विचार केला आणि सर्वानुमते ठरलं की पुढील वर्षी स्नेहसंमेलनापूर्वी विद्यार्थी प्रतिनिधीकडून लेखी हमीपत्र घ्यावे आणि मगच संमेलन साजरे करावे.

एवढं करूनही पुढच्या वर्षीदेखील तोच तमाशा झाला. अगदी जणू सुधारित आवृत्ती म्हणून शोभावा असा. मग पुन्हा सभा होऊन संमेलनच रद्द करावे असा तोडगा निघाला. हा तोडगा विद्यार्थ्यांना समजताच त्यांनी मोर्चा, संप, हरताळ, घेराव अशा आधुनिक लोकशाही पद्धतीने संमेलन घडवून आणलेच. हा मात्र प्राचार्य, प्राध्यापक, व्यवस्थापक मंडळ, गावातील प्रतिष्ठित यांच्यावर विद्यार्थ्यांनी मिळवलेला निर्णायक आणि दणदणीत विजय होता.

आणि मग कॉलेज हा दंगलींचा आखाडा म्हणून गावाला उपद्रवकारी ठरायला लागला. ‘भीती’ हा शब्दच विद्यार्थ्यांच्या शब्दकोशात राहिला नाही. तास सुरू असला तरी पोरे वर्गासमोरच्या गॅलरीत उभी राहून शिट्ट्या वाजव, गाणी म्हण, गप्पा मार, अर्वाच्य शिव्या दे, सिगारेटी ओढ, असे बेदरकार प्रयोग करू लागली. दुतर्फा उभे राहून मधून जाणाऱ्या मुलींची, प्राध्यापकांची छेड काढणं, कुण्या प्राध्यापकाला ‘ढापण्या’ म्हण, कुणाला ‘टकल्या’ म्हण, कुणाला (प्राचार्यांचा) ‘चमचा’ म्हण, हेही सुरू झालं. वर्गात पंचेचाळीस मिनिटं शिकवून बाहेर पडणं म्हणजे एखाद्या घनघोर युद्धातून सुखरूप आल्याची भावना प्राध्यापकांत निर्माण झाली. मग प्राध्यापकांनीदेखील, विद्यार्थ्यांनी नेमक्या गुंडांना हेरून, त्यांना नित्यनेमाने चहा, वडा वगैरे लाच देऊन आपापले गट तयार करायची मोहीम काढली. कारण प्राचार्यांकडे गुंड मुलांना घेऊन जाण्यात काही अर्थच उरला नव्हता. प्राचार्य त्या पोराला दाटण्याऐवजी प्राध्यापकांनाच दाटू लागले! ‘तुम्हाला क्लासकंट्रोल नाही!’ म्हणून सुनवू लागले. हा तर एकदम नोकरीवर, स्थैर्यावरच घाला! तेव्हा मुलांविरुद्ध तक्रारी करणंच बंद झालं.

गाव मात्र इतकं छोटं की या टोकाला पादलं तर त्या टोकाला आवाज भिडायचा. कॉलेजात रोजच्या रोज घडणाऱ्या घटना वणव्याप्रमाणे गावात पसरत असत. सगळ्यांना आता हे कॉलेज म्हणजे गावावरची खरूज वाटायला लागली.

प्रा. हरी रामचंद्र यांना या जनमानसाची पूर्ण कल्पना होती. ते मनापासून वैतागले होते. एकीकडे पोरांचा ग्राम्य उर्मटपणा आणि दुसऱ्या बाजूला पैशांची चणचण, या कात्रीत ते सापडले होते. विद्यापीठ अनुदान मंडळाने नवी आकर्षक वेतनश्रेणी जाहीर केल्यावर सगळे प्राध्यापक स्वतःला कलेक्टर समजायला लागले होते. परंतु प्रत्यक्षात वेतन मिळण्याच्या बाबतीत बोंबाबोंब होती. नवी वेतनश्रेणी म्हणजे मूर्खांच्या नंदनवनातला फेरफटका ठरण्याची पाळी आली. सहा-सात वर्षे नोकरीत शिकलेल्या प्राध्यापकांनी एव्हाना दोनाचे चार आणि चाराचे सहा हात करून टाकलेले होते. पगार पुरेनासा झाला होता. आणि आता तर चक्क सहा महिन्यांचा पगारच मिळालेला नव्हता. दूरदृष्टीच्या प्राध्यापकांनी शेवटी मुलाबाळांना माहेरी सासरी लावून दिले. प्राध्यापकांना पगार मिळालेले नाहीत हे गावातल्या काळ्या कुत्र्यालाही समजलं होतं. मोठी नामुष्की व्हायची वेळ येऊन ठेपली.

ज्या गावानं एकेकाळी या कॉलेजचं कौतुक केलं तेच गाव या कॉलेजला आता वैतागलं. पूर्वी टेचात राहणारे प्राध्यापकही आता जरा नरमले होते. पँटला इस्त्री पाहिजेच हा आग्रह त्यांनी सोडून दिला

होता. सगळ्यात वाईट स्थिती म्हणजे किराणा भुसाराच्या दुकानात सहा–सहा महिने तुंबलेली उधारी.

प्रा. हरी रामचंद्र यांनी सकाळीच शेट धनमल मणिराज यांचेकडे चक्कर मारली आणि होऊ नये तेच झालं. सेट धनमल कॉलेजच्या व्यवस्थापक मंडळावर असल्याने सर्व प्राध्यापकांनी आपापली किराणा खाती शेटजींच्या दुकानीच ठेवली पाहिजेत, असा दंडक होता. सारं गाव प्रेमादरानं या शेटजींना 'धन्यामन्या' म्हणून ओळखत असे. प्रा. हरी रामचंद्र शेटजींच्या दुकानाची पायरी चढले आणि शेटजींनी त्यांना खास ठेवणीतल्या आवाजात ऐकवलं, ''मास्तर, आता एक पैशाचीही उधारी मिळणार नाही. तुम्हा सगळ्या मास्तरांची मिळून पंचवीस हजारांवर उधारी तुंबली आहे. हे कॉलेज काही सहा महिने टिकत नाही. आम्ही ते बंदच करून टाकणार आहे. तेव्हा मागील बाकी दिल्याशिवाय इथून पुढे गुर्जी लोकांशी उधारीचा व्यवहार नाही.''

प्रा. हरी रामचंद्र यांचा वाकडा चेहरा आणखीनच वाकडा झाला. ते शेटजींना तत्त्वज्ञान सांगायचा प्रयत्न करू लागले. ''असं बघा शेटजी की हे महाविद्यालय जिवंत ठेवणं हे तुमच्यासारख्या दानशूर धनिकांचे सांस्कृतिक कर्तव्यच आहे...'' वाक्य पूर्ण व्हायच्या आत शेट धन्यामन्या यांनी जालीम अस्त्र काढलं. ते म्हणाले, ''गुर्जी, या संस्कृतीच्या गप्पा बास करा. गेली आठ वर्षं बघतोय, महाविद्यालय आलं आणि बद्धा गाव खराब झाला. पोरं कटिंगा वाढवून विड्यासिगरेटी वढत गावातून उंडरायला लागले. दर साल ग्यादरिंग म्हणजे हाणामारी आणि दगडफेक. गुर्जीमंडळींचा पोरांवर काहीही वचक नाही. या साली तर पोरांनी ग्यादरिंगात निरोधाचे फुगेदेखील उडवले. म्हंजे पुढल्या वर्षी काय होणार त्याचा अंदाज आला. तेव्हा गुर्जी, या महाविद्यालयाने गावात पाचशे ठोंबे तेवढे पोसले... एकजात सगळे साले भाकड...''

प्रा. हरी रामचंद्र क्रोधायमान झाले. प्राध्यापकाचा राग म्हणजे राखेखालचा कोळसा आणि थकलेला पगार म्हणजे थकलेला रक्तपुरवठाच...

प्रा. हरी रामचंद्र भानावर आले, ते तास संपल्याच्या घंटेमुळे. घंटेच्या प्रत्येक टोल्याबरोबर डोक्यात शब्द घणघणत होते, ''तेव्हा गुर्जी, या महाविद्यालयाने गावात पाचशे ठोंबे तेवढे पोसले...''

जिभेच्या एका फटक्यात शेठ धन्यामन्या यांनी सगळ्या जगातल्या प्राध्यापकांच्या पदरात त्यांच्या कर्तुकीचं माप ओतलं होतं...


❑

(पूर्वप्रकाशित : साप्ताहिक मनोहर, मार्च १९७८)



# मनाचिये गुंती...

## मुग्धा देशपांडे



आयुष्यातले धबधबे सतत आतून बाहेरून उलट-सुलट मनात कोसळत उन्मादत असतात. आयुष्याची आणि कलेची अथांगता, व्यापकता, सखोलता उमजल्यावर थक्क झाल्यानं छंदाकडून कलेकडे आणि कलेतून तत्त्वज्ञानाकडे प्रवास आणि शोध सुरू झालाय तो आकाशस्पर्शी आणि तलस्पर्शी अवकाशाचा...

एक टप्पा असा आला की ज्या दिशेने एकगठ्ठा समाजप्रवाह चालतो आहे तो हमरस्ता आपला नव्हे... या हमरस्त्यावर आपले मन रमत नाही, वेगळेच पडघम, वेगळेच पाठ ऐकू येताहेत... आपली वाट वेगळीच आहे.. ही पायवाट मला विविध ललित ते विज्ञानादी पुस्तकांनी, समाजसुधारकांनी, समाजकार्यकर्त्यांनी, तत्त्ववेत्त्यांनी आणि नात्यापलीकडच्या नात्यांनी दर्शवली आहे..

ही पायवाट एकाकीच आहे याचं दुःख आहे, व्यथा आहे; पण या वाटेवर साथसंगत आहे शब्दांची, रंग-रेखांची, मातीची, याचा अनाम, अथांग, शांत आनंदही आहे..

व्यावहारिक जगाची झळ मला सह्य नाही. मग हे सारे स्वान्तसुखाय आहे का तर नाहीच नाही. हा सारा अबोध मनाचा नाट्यखेळ, बोध, नाट्यगृहासाठीही आहेच की. मग हे सारे जमावे कसे? मनभरून

/रूमभरून वाहणाऱ्या कलाकृती यांचं काय करायचं ?

मगाशी म्हटल्याप्रमाणे या माझ्या पायवाटेवर कोणा वाटसरूची वाटच चुकते आणि कोणीतरी सहृदयी भेटते..

तोपर्यंत माझे शब्द आणि कलाकृती
कधी मस्त तर कधी अस्वस्थचित्त...

**डायरी दि.*****

कधीतरी आत, आतात निघून गेलेली कला मला माझा असा वेळ मिळायला लागल्यावर पुन्हा एकेक दालनं पार करत माझ्यातून कागद, कॅनव्हास, माती आणि इतर माध्यमांतून व्यक्त होऊ लागली. मग थोडं तांत्रिक शिक्षण घेतलं आणि नंतर माझ्यातली ही कलासुंदरी भलतीच मुक्त विहरू लागली. जिथं जिथं कला असेल तिथं मला ओढून नेऊ लागली. आर्टगॅलरी, प्रदर्शनं, म्युझियममध्ये रमत गेले. पुण्यात ब्रिटिश कौन्सिल लायब्ररीतून कलाविषयक पुस्तकं, मासिक वाचत गेले. जिथं जिथं कलाजगत होतं, तिथं जात राहिले...

महानगरीय गर्दी, नीटस सुबकता, त्याच बरोबरीने अस्तित्वात असणारे दारिद्र्यरेषेखालचे, लगतचे विस्कटित जग. बघता बघता अदृश्य होणारी निसर्गसंपदा, त्याजागी उठणारे सिमेंटी लोळ. त्या दाहात जगणारी माणसं. युद्धाची व्यर्थता..

आणि काही ठसे उमटले, उमटताहेत,
मूर्त अमूर्ताचे.
अजून काही दाटले आहे, दाटते आहे.




A song of peace
A song of peace
A song of peace
A song of peace
A song of peace







# लाल मृत्यूचा मुखवटा

## एडगर ॲलन पो
## अनुवाद : शैलेंद्र मेहता

लाल मृत्यूने देशभर थैमान घातले होते. याआधीची कोणतीही रोगराई इतकी प्राणघातक किंवा भीषण नव्हती. रक्त हा त्या रोगाचा अवतार व त्याचा शिक्का होता – रक्तरंजित वेडेपणा व भय. तीक्ष्ण वेदना व अचानक चक्कर येणे, व नंतर त्वचेवरील छिद्रांमधून विपुल रक्तस्राव. शरीरावर व विशेषत: पीडिताच्या चेहऱ्यावर लाल रंगाचे डाग, हे सारे प्रतिबंधित करण्यासारखे नव्हते, ज्यामुळे रोगी कोणतीही मदत व इतर माणसांच्या सहानुभूतीपासून वंचित असायचा व झटके येणे, ते वाढत जाणे आणि जीव गमावणे या केवळ अर्ध्या तासाच्या घटना असायच्या.

पण प्रिन्स प्रॉस्पेरो आनंदी, निर्भीड आणि विवेकी होता. जेव्हा त्याची अर्धी प्रजा संपुष्टात आली, तेव्हा त्याने आपल्या एक हजार शूरवीर व उमद्या स्वभावाच्या मित्र-मैत्रिणींना आपल्या दरबारात बोलावले व नंतर त्यांच्याबरोबर निर्जन ठिकाणी असलेल्या त्याच्या एका मठात एकांतवासात गेला. ती एक विस्तृत व भव्य इमारत होती, राजकुमाराच्या स्वतःच्या विक्षिप्त परंतु आदरयुक्त अभिरुचीची

निर्मिती. एका भक्कम आणि उंच भिंतीने ती वेढली होती. या भिंतीला लोखंडी दरवाजे होते. दरबारी आत गेल्यावर त्यांनी मोठ्या प्रमाणात भट्ट्या व हातोडे आणले व सर्व प्रवेशद्वारांना कड्या-कोयंडे ठोकून ते सीलबंद करून टाकले.

निराशेच्या किंवा उन्मादाच्या अचानक आवेगाने कुणी निघून जाण्याचा निर्धार केला तरी बाहेर जायचा किंवा कुणालाही आत प्रवेश करण्यासाठी मार्ग नव्हता. मठात सगळ्या प्रकारची भरपूर तरतूद करण्यात आली होती. अशा सावधगिरीमुळे दरबारी संसर्गापासून बचाव करू शकत होते. बाह्य जगापासून स्वतःची काळजी घेऊ शकत होते, ज्याबद्दल दुःख किंवा विचार करणे हा मूर्खपणा होता. राजपुत्राने सुखाची सर्व साधने पुरवली होती. तेथे विदूषक होते, कलाकार होते, बॅले-नर्तक होते, संगीतकार होते, सौंदर्यवती होत्या, वाइन होती. आत हे सर्व व सुरक्षा होती, लाल मृत्यूला बाहेर ठेवून.

एकांताच्या पाचव्या किंवा सहाव्या महिन्याच्या शेवटी, प्रिन्स प्रॉस्पेरोने सर्वांना चेहऱ्यावर घालण्यासाठी मुखवटे देऊन त्याच्या हजार मित्रांचे, अत्यंत असामान्य व भव्य अशा संगीतमय बॉलरूम नृत्यरजनीचे आयोजन करून मनोरंजन केले.

ते एक आनंददायी दृश्य होते, तो मुखवट्यांचा समारंभ. पण आधी मी तो कोणत्या दालनांमध्ये आयोजित केला होता ते सांगतो. तेथे सात दालने होती... सात शाही महाल, अनेक राजवाड्यांमध्ये, असे महाल लांबलचक आणि सरळ बांधलेले असतात, व त्यांचे दुमडणारे दरवाजे जवळजवळ दोन्ही बाजूंच्या भिंतींकडे सरकतात, ज्यामुळे संपूर्ण दृश्य क्वचितच बाधित होते. इथे प्रकरण खूप वेगळे होते; ड्यूकच्या विचित्र आवडीतून अशा प्रकारची अपेक्षा केली जाऊ शकते. या अपार्टमेंट्सची रचना इतकी अनियमितपणे केली गेली होती की एका वेळी एकच दालन दृष्टिपथात यायचे व पुढच्या दालनाचा थोडासाच भाग. उजवीकडे व डावीकडे तीव्र वळणे होती, प्रत्येक भिंतीच्या मधोमध, एक उंच व अरुंद गॉथिक खिडकी बंद कॉरिडॉरला लागून असलेल्या दालनात उघडायची. या खिडक्या स्टेन्ड काचेच्या होत्या व त्यांचा रंग ज्या खोलीत त्या उघडायच्या, त्या खोलीच्या सजावटीच्या प्रचलित रंगछटांनुसार बदलत होता. उदाहरणार्थ, पूर्वेकडील टोकाला, निळ्या रंगाचे दालन व त्याच्या खिडक्या स्पष्टपणे निळ्या होत्या. दुसरी खोली गडद गुलाबी रंगाची होती, सजावट व वेलबुट्टीदार पडद्यांसह, आणि येथे काचा गुलाबी रंगाच्या होत्या. तिसरे संपूर्ण हिरवे होते, आणि खिडक्यादेखील हिरव्या होत्या. चौथे केशरी रंगाने उजळलेले होते, पाचवे पांढऱ्या रंगाने, सहावे जांभळ्या. सातवे दालन काळे, काळ्या मखमली तलम पडद्यांनी आच्छादलेले होते जे संपूर्ण छतावरून आणि भिंतींवरून खाली लटकत होते, सारी सामग्री व गालिचेदेखील काळे होते. परंतु केवळ या दालनामध्ये, खिडक्यांचा रंग सजावटीशी सुसंगत नव्हता. तेथील तावदाने लाल रंगाची होती- गडद रक्ताचा रंग. आता सात दालनांपैकी एकाही दालनामध्ये दिवा किंवा मेणबत्ती नव्हती, सोन्याने मढवलेली सारी सामग्री इकडे-तिकडे पसरलेली होती व छतावरूनही लोंबकळत होती. दालनांच्या सजावटीमध्ये दिवा किंवा मेणबत्तीचा कोणताही प्रकाश नव्हता. पण दालनामागे असलेल्या कॉरिडॉरमध्ये, प्रत्येक खिडकीच्या समोर, एक जड ट्रायपॉड उभा होता, ज्यावर आगीची शेगडी होती, विविध रंगछटा असलेल्या काचेतून तिचे किरण प्रक्षेपित व्हायचे व त्यामुळे खोली उजळून जायची. व अशा प्रकारे अनेक भडक आणि विलक्षण देखावे तयार केले गेले होते.

पण पश्चिमेकडील किंवा मागच्या खोलीत, रक्ताच्या रंगाच्या तावदानांमधून काळ्या पडद्यांवर प्रवाहित होणाऱ्या अग्निप्रकाशाचा प्रभाव अत्यंत भयानक होता, व प्रवेश करणाऱ्यांचे चेहरे त्यामुळे

इतके भेसूर दिसायचे की काही मोजकेच जण तिथे यायला धजावायचे, त्या दालनाच्या हद्दीत पाऊल ठेवण्यासाठी पुरेसे धाडस असलेले. या दालनामध्येच, पश्चिमेकडील भिंतीसमोर काळ्या लाकडात कोरलेले एक अवाढव्य घड्याळ उभे होते. त्याचा लोलक एक कंटाळवाणा, जड, नीरस आवाज करत इकडे-तिकडे झुलत होता; व जेव्हा मिनिटाचा हात घड्याळाच्या चेहऱ्याची प्रदक्षिणा संपवायचा, आणि तास पूर्ण व्हायचा, तेव्हा घड्याळाच्या फुफ्फुसातून एक आवाज यायचा जो स्पष्ट, मोठा, खोल व खूप संगीतमय असायचा, परंतु एक विलक्षण सुरावटीचा. एक एक तास उलटल्यावर प्रत्येक वेळी, ऑर्केस्ट्राच्या संगीतकारांना त्यांच्या सादरीकरणात, आवाज ऐकण्यासाठी क्षणभर विराम द्यावा लागायचा; नृत्य करणारे थांबायचे; आणि संपूर्ण आनंदी वातावरणात एक छोटासा व्यत्यय यायचा; आणि घड्याळाचे झंकार अजून वाजत असतानाच असे आढळून यायचे की सर्वांत उत्साही असलेलेही फिकट फिकट पडायचे, आणि अधिक वृद्ध व शांत असलेले लोक जणू काही गोंधळात पडल्यासारखे किंवा ध्यान लागल्यासारखे त्यांच्या कपाळावरून हात फिरवायचे. पण जेव्हा प्रतिध्वनी पूर्णपणे थांबायचा, तेव्हा लगेचच एक हलके हास्य सगळीकडे पसरायचे; संगीतकार एकमेकांकडे पाहायचे व स्वत: च्या अस्वस्थतेबद्दल व मूर्खपणाबद्दल हसायचे आणि एकमेकांशी कुजबुजत शपथ घ्यायचे की घड्याळाच्या पुढील घंटीने त्यांच्यात तशाच भावना निर्माण होणार नाहीत; आणि मग, साठ मिनिटं संपल्यानंतर (ज्यांत तीन हजार सहाशे सेकंदांचा समावेश असतो), घड्याळाची आणखी एक घंटी वाजायची, व नंतर पूर्वीसारखीच अस्वस्थता, थरकाप व ध्यान व्हायचे. पण, या गोष्टी असूनही, तिथे एक उत्साही व भव्य आनंद होता. ड्यूकची अभिरुची विलक्षण होती. रंगसंगती आणि परिणामांवर त्याची बारीक नजर होती. त्याने केवळ फॅशनसाठी असणाऱ्या सजावटीकडे नेहमी दुर्लक्ष केले. त्याच्या योजना धाडसी आणि ज्वलंत होत्या व त्याच्या संकल्पना तीव्र तेजाने चमकत होत्या. काही जणांना तो वेडा वाटला असेल. पण तो तसा नव्हता, असे त्याच्या अनुयायांना वाटायचे. तो तसा नव्हता याची खात्री करण्यासाठी त्याला ऐकणे, पाहणे व त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे आवश्यक होते.

या महान सोहळ्याच्या निमित्ताने सात दालनांसाठी आणलेल्या अलंकारांवर त्याने जातीने लक्ष पुरविले होते; व त्याची स्वतःची एक मार्गदर्शक अभिरुची होती, जिच्याद्वारे मुखवट्यांना वैशिष्ट्य दिले गेले होते. खात्रीने ते वैचित्र्यपूर्ण होते. खूप चकाकणारे, झळाळी असलेले, तीव्र व कल्पनारम्य - हर्नानी नाट्यामध्ये असल्यासारखे. त्यात अनुपयुक्त हातपाय व भाव असलेल्या अरबी आकृत्या होत्या. चित्रविचित्र फॅशन्सच्या विलोभनीय रंगसंगती होत्या. त्यातले अनेक सुंदर होते, अनेक अर्धवट होते, अनेक काहीसे विचित्र होते, काही भयंकर होते आणि तिरस्काराला उत्तेजित करणारेही थोडेथोडके नव्हते. सात दालनांत असंख्य स्वप्ने ये-जा करत होती. आणि ही स्वप्ने - आत व आजूबाजूला- खोल्यांमधून रंग उधळत ऑर्केस्ट्राच्या संगीतावर प्रतिध्वनित होत होती.

आणि, लगेच, मखमलीच्या हॉलमध्ये उभ्या असलेल्या काळ्या लाकडी घड्याळात तासाचे टोल वाजतात. व मग, क्षणभर, सर्व काही स्थिर होते, घड्याळाचा आवाज सोडून सर्व शांत. स्वप्ने उभी राहून ताठ-गोठलेली असतात. पण झंकाराचे प्रतिध्वनी मरून जातात - सर्वांनी ते सहन केल्यावर, परंतु क्षणार्धात - आणि ते लोप पावल्यावर एक हलके अर्धे शमलेले हास्य त्यांच्या मागे तरंगते. व संगीत परत वाजू लागते, आणि स्वप्ने जिवंत होतात, व नेहमीपेक्षा अधिक आनंदाने बागडतात, अनेक रंगीबेरंगी खिडक्यांमधून रंग उधळत, ज्यातून ट्रायपॉड्सच्या किरणांचा प्रवाह वाहतो. पण सातपैकी पश्चिमेला असलेल्या खोलीत आता कोणीही मुखवटा घातलेला नाही, कारण रात्र वाढली आहे; व

रक्तरंजित फलकांमधून एक प्रखर प्रकाश वाहतो; आणि केसाळ गालिच्यांचा काळपटपणा घाबरतो; आणि ज्याचा पाय केसाळ गालिच्यावर पडतो, त्याच्या जवळच्या काळ्या घड्याळातून एक दबलेला घंटानाद येतो जो इतर दालनांत प्रचंड आनंदात गुंतलेल्या त्यांच्या कानांपर्यंत पोचतो.

पण या इतर दालनांमध्ये दाट गर्दी होती व त्यामध्ये जीवनाचे हृदय तापदायकपणे धडकत होते. व घड्याळाच्या काट्यावर मध्यरात्रीचा आवाज येईपर्यंत हा आनंद घुमत राहिला. आणि मग मी सांगितल्याप्रमाणे संगीत बंद झाले; आणि नर्तकांचा पदन्यास शांत झाला; आणि पूर्वीप्रमाणेच सर्व गोष्टींची अस्वस्थता स्तब्ध झाली. पण आता घड्याळात बारा वाजायचे होते; व त्यामुळे जास्त वेळ, कदाचित अधिकाधिक विचार निर्माण होण्यासाठी, आनंद व्यक्त करणाऱ्या विचारवंतांच्या ध्यानासाठी अधिक. आणि त्याचप्रमाणे, असेदेखील घडले की शेवटच्या झंकाराचा शेवटचा प्रतिध्वनी पूर्णपणे शांत होण्याआधी, गर्दीत अनेक लोक होते ज्यांना मुखवटा घातलेल्या एका व्यक्तीच्या उपस्थितीची जाणीव व्हायला फुरसत मिळाली, ज्याने आधी कोणाचेही लक्ष वेधून घेतले नव्हते. आणि या नवीन उपस्थितीची बातमी आजूबाजूला कुजबुजत पसरली, संपूर्ण गर्दीत गोंधळ, किंवा कुरकुर करत एक भयानक किळस पसरली .

मी चित्रित केलेल्या कल्पनारम्य संमेलनात, असे मानले जाऊ शकते की कोणत्याही सामान्य दृश्याने अशा संवेदना उत्तेजित केल्या नसतील. खरं तर रात्रीचा मुखवटे परिधान करण्याचा परवाना जवळजवळ अमर्यादित होता; परंतु नवीन गूढ आकृतीने सर्वांनाच गोंधळात टाकले होते आणि हे राजकुमाराच्या अनिश्चित मर्यादेपलीकडे होते. अत्यंत बेपर्वा लोकांच्या हृदयात अशा तारा असतात, ज्या भावनेशिवाय छेडता येत नाहीत. जे पूर्णपणे हरवलेले असतात, त्यांच्यासाठी जीवन आणि मृत्यू तितकेच हास्यास्पद असतात व अशा काही गोष्टी आहेत, ज्यांची थट्टाही करता येत नाही. या अपरिचित व्यक्तीच्या वेशभूषेत आणि धारणेत बुद्धिचातुर्य किंवा औचित्य नाही, असे आता संपूर्ण समूहाला मनापासून वाटत होते. ती आकृती उंच व भडक होती आणि डोक्यापासून पायापर्यंत थडग्यात विसावण्याआधी घालतात अशा वस्त्रांनी आच्छादलेली होती. चेहरा लपविणारा मुखवटा ताठ झालेल्या मृतदेहाच्या चेहऱ्यासारखा अशा खुबीने बनवला गेला होता की बारकाईने तपासणी करणाऱ्यालाही त्यातील फसवणूक शोधण्यात अडचण आली असती. आणि तरीही आजूबाजूच्या उन्माद करणाऱ्यांनी, त्यांना मान्य नसले तरी, हे सर्व सहन केले असते. पण त्याला लाल मृत्यूचा प्रकार गृहीत धरण्याइतपत कुजबुज पसरली. त्याचा पोशाख रक्ताने माखलेला होता– व त्याच्या रुंद कपाळावर, त्याच्या चेहऱ्याच्या सर्व वैशिष्ट्यांसह, लाल रंगाने भीतिदायक शिंतोडे उडवले होते.

जेव्हा प्रिन्स प्रॉस्पेरोची नजर या भुतासारख्या प्रतिमेवर पडली (जी जणू काही आपली भूमिका टिकवून ठेवण्यासाठी, नर्तकांमधून पुढे मागे होत संथ व गंभीर हालचाल करत होती) त्याला पहिल्याच क्षणी धक्का बसल्याचे दिसले. एकतर दहशतीचा किंवा तिरस्काराचा तीव्र थरकाप; पण नंतर त्याचे कपाळ रागाने लालबुंद झाले.

कोणाची हिंमत झाली– त्याने त्याच्या जवळ उभ्या असलेल्या दरबाऱ्यांकडे खडसावून विचारणा केली– या निंदनीय उपहासाने आमचा अपमान करण्याची कोणाची हिंमत झाली? त्याला पकडा आणि त्याचा मुखवटा खेचा– म्हणजे सूर्योदयाच्या वेळी, आम्हांला कोणाला फाशी द्यायची आहे हे कळेल. तटाच्या भिंतीवरून!

पूर्वेकडील निळ्या दालनामध्ये प्रिन्स प्रॉस्पेरोने उच्चारलेले शब्द सातही दालनांतून खोल्यांमध्ये

मोठ्याने व स्पष्टपणे घुमले, कारण राजकुमार एक धाडसी व बलदंड माणूस होता व त्याच्या हाताच्या इशाऱ्यासरशी संगीत शांत झाले होते.

निळ्या खोलीत राजकुमार उभा होता, त्याच्या बाजूला फिकट पडलेल्या दरबाऱ्यांचा एक घोळका होता. सुरुवातीला, तो बोलत असताना, घुसखोराच्या दिशेने या गटाची घाईघाईने थोडी हालचाल झाली, जो त्या क्षणी अगदी जवळ होता, व आता, मुद्दाम आणि डौलदार पावलांनी, राजकुमाराच्या जवळ आला. पण एका विशिष्ट अबोध विस्मयाने, ज्याच्या वेड्या कल्पनेने संपूर्ण समूहाला उत्तेजित केले होते, त्याला पकडण्यासाठी हात पुढे करणारा कोणीही आढळला नाही; त्यामुळे, बिनदिक्कत, तो राजपुत्राच्या समोरून गेला; व विशाल समूह, एका आवेगाने, खोल्यांच्या मध्यापासून भिंतींपर्यंत आकसत असताना, त्याने न थांबता त्यांच्यातून मार्ग काढला, त्याच गंभीर आणि मोजून मापून टाकलेल्या पावलानी, ज्यांनी त्याला पहिल्यापासून इतरांकडून वेगळा काढला होता, निळ्या चेंबरमधून जांभळ्या–जांभळ्या ते हिरव्या–हिरव्यातून केशरी– त्यातून पुन्हा पांढरा– आणि तेथून गडद गुलाबीपर्यंत, त्याला अटक करण्यासाठी एक निश्चित हालचाल झाली होती तरीही. तथापी, तेव्हाच, प्रिन्स प्रॉस्पेरो, रागाने व स्वतःच्या क्षणिक भ्याडपणाच्या लाजेने वेडा झालेला, घाईघाईने सहा दालनांमधून धावत त्याच्या मागे गेला, परंतु सर्वांवर कब्जा केलेल्या प्राणघातक दहशतीमुळे इतर कोणीही त्याच्या मागे गेला नाही. त्याने खंजीर उपसला होता, आणि वेगाने जाणाऱ्या आकृतीच्या तीन किंवा चार फुटांच्या अंतरावर तो पोचला होता. दोघे मखमली दालनाच्या टोकापर्यंत पोचले होते, तो आगंतुक अचानक वळला व त्याचा पाठलाग करणाऱ्याला सामोरा गेला. एक तीक्ष्ण किंचाळीचा आवाज आला – आणि खंजीर त्या केसाळ गालिच्यावर चमकला, ज्यावर लगेचच, प्रिन्स प्रॉस्पेरो मृत्यूला लोटांगण घालत पडला. मग निराश अनियंत्रित धैर्याने, उत्सव साजरा करणाऱ्या जमावाने ताबडतोब काळ्या दालनामध्ये स्वतःला झोकून दिले व ती उंच आकृती काळ्या घड्याळाच्या सावलीत ताठ आणि गतिहीन उभी राहिली, भीतीने मूक झालेली गर्दी मृताचे कपडे परिधान केलेल्या व मृतदेहासारखा मुखवटा घातलेल्याकडे पाहत ज्याला कोणत्याही मूर्त स्वरूपाचा वापर न करता त्यांनी इतक्या हिंसक असभ्यतेने हाताळला होता.


आणि आता लाल मृत्यूची उपस्थिती ओळखली गेली. तो रात्री चोरासारखा आला होता. आनंदाने हॉलमध्ये जल्लोष करणाऱ्यांच्या मागे, रक्ताने माखत प्रत्येकजण खाली पडून निराशाजनक स्थितीत मरण पावला. व काळ्या घड्याळाचे आयुष्य शेवटच्या आनंदी ठोक्याबरोबर निघून गेले. ट्रायपॉड्सच्या ज्वाला विझून गेल्या आणि अंधार, ऱ्हास व लाल मृत्यूने सर्वांवर अमर्याद वर्चस्व गाजवले.

❑




# ओरहान पामुक

## महेश्वर लव्हेकर



ओरहान पामुक (जन्म. १९५२). २००६ सालचा नोबेल पुरस्कार मिळालेल्या या तुर्की लेखकाने १० कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'माय नेम इज रेड' आणि 'स्नो' या पामुकच्या सर्वांत जास्त गाजलेल्या कादंबऱ्या. 'माय नेम इज रेड' या कादंबरीत शव, नाणं, कुत्रा, वृक्ष, मृत्यू असे अनेक निवेदक आहेत. या कादंबरीचा सुरुवातीचा निवेदक एक शव आहे. नॉर्मन मेलरची कादंबरी 'एन्शंट इव्हिनिंग्ज' या कादंबरीचा सुरुवातीचा निवेदकही एक मृत झालेली व्यक्ती आहे. या साधर्म्यामुळे पामुकवर वाङ्मयचौर्याचा आरोपही झाला होता. मागच्या वर्षी पामुकची 'नाईट ऑफ प्लेग' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. त्याने दिलेल्या साहित्यविषयक व्याख्यानांचे संकलन 'दि नाइव्ह अँड दि सेंटिमेंटल नॉव्हेलिस्ट' या शीर्षकाने प्रसिद्ध झाले आहे. इस्तंबूल शहर आणि या शहराच्या त्याच्या आठवणी यांविषयीचे त्याचे लेख 'इस्तंबूल' या पुस्तकात संकलित केले आहेत. खालील तीन टिपणे पामुकच्या 'अदर कलर्स' या पुस्तकात समाविष्ट केली आहेत. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत पामुक लिहितो – असे क्षण, अनुभव ज्यांना त्याच्या कादंबऱ्यांमध्ये स्थान मिळू शकले नाही; ते क्षण, अनुभव त्याने शब्दबद्ध करून या पुस्तकात संकलित केले आहेत. अशा साक्षात्कारी क्षणांचे वर्णन व्हर्जिनिया वूल्फ हिने 'मोमेंटस् ऑफ बिईंग'

असे केले आहे.




## १. पावसातला समुद्रपक्षी

पावसात, काही घडलंच नाहीये अशा आविर्भावात, एक समुद्रपक्षी छतावर उभा आहे. पाऊस पडतच नसल्यागत तो निश्चल आहे. किंवा हा समुद्रपक्षी महान तत्त्वज्ञ असावा, कशानेच विचलित न होणारा. तिथे उभा आहे तो, छतावर पाऊस पडतोय. कदाचित असं असावं तो तिथे उभं राहून विचार करतोय, मला माहितीय, पाऊस पडतोय पण याविषयी फारसं काही करणं माझ्या हाती नाही. किंवा खरंय, पाऊस पडतोय हे, पण काय महत्त्व असेल या पावसाचं? किंवा कदाचित काहीसं असं: आता सरावलोय मी या पावसाला; आता फारसा फरक नाही पडत त्याने.

मला असं म्हणायचं नाहीये की, हे समुद्रपक्षी चिवट असतात. खिडकीतून मी पाहतो त्यांना, लिखाण करण्याचा प्रयत्न करत असताना, खोलीत फेऱ्या मारतानाही: आपल्या आयुष्याच्या पल्याड असलेल्या गोष्टींनी समुद्रपक्षीही कमालीचे सैरभैर होतात.

एका समुद्रपक्ष्याची पिलं तिथे होती. स्वच्छ करड्या लोकरीचे दोन छोटे चेंडू, काहीसे भेदरलेले, थोडे वेडे. कधीकाळी लाल रंग असलेल्या मात्र आता त्यांच्या आईने शिटून पांढरट केलेल्या छतावरून डावीकडे आणि उजवीकडे जाणारे आणि मग कुठेतरी थांबून विश्रांती घेणारे. याला खरं तर विश्रांती नाही म्हणता येणार; मात्र ते थांबायचे क्षणभर. त्यांचं अस्तित्व आहे एवढंच. याहून अधिक काही नाही. अधिकतर माणसं आणि अधिकतर जीवांप्रमाणे समुद्रपक्षी त्यांच्या आयुष्याचा जास्तीत जास्त काळ काही न करण्यात घालवतात, कुठल्या एका ठिकाणी निश्चल बसून. प्रतीक्षा करण्याची ही एक पद्धत आहे, असंही तुम्ही म्हणू शकाल. प्रतीक्षा करत उभं राहणं या विश्वात: पुढच्या भोजनाची, मृत्यूची, निद्रेची. त्यांचा मृत्यू कसा होतो, हे मला माहीत नाही.

या पिलांना सरळ उभं राहता येत नाही. वारा विस्कटून टाकतोय त्यांची पिसं, त्यांचे संपूर्ण देहच. ते पुन्हा थबकतात. आणि परत एकदा. त्यांच्या मागच्या बाजूला असलेल्या शहरात हालचाल आहे, खाली जहाजं, गाड्या, वृक्ष थरारतायत.

ज्या धास्तावलेल्या आईविषयी मी सांगत होतो तिला खाण्याचं कुठेतरी थोडं काही सापडतं, जे ती आपल्या पिलांना खाऊ घालायसाठी घेऊन येते. इथे धावपळ दिसून येते: अचानक कराव्या लागणाऱ्या बऱ्याचशा क्रिया, कष्ट, बिथरणं. मृत माशाचे मॅकरोनीसारखे दिसणारे अवयव – ओढाताण, बघू या तुम्हाला खेचता येईल का हे – वेगळं केलं जातं आणि खाऊन टाकल्या जातं. जेवण झाल्यावर शांत असतं सगळं. समुद्रपक्षी छतावर उभे राहतात काही न करता. आम्ही सारे एकत्रितपणे प्रतीक्षा करतो. आभाळात ढग भरून आलेले.

पण अजूनही असं काही आहे, जे माझ्या नजरेतून सुटलंय. मी खिडकीपाशी जाऊन उभा राहिलो

आणि ते अचानक ध्यानात आलं. सोपं नाहीये समुद्रपक्ष्यांचं आयुष्य. संख्येने किती प्रचंड आहेत ते! दुश्चक्राच्या आगमनाचं भय वाटणारे समुद्रपक्षी, छतांवर उभे असलेले, शांतपणे कशाचा तरी विचार करणारे ज्याविषयी मला काहीही माहीत नाही. कदाचित काही दगाफटका होईल का असा विचार करत असलेले.

या साऱ्याचं मला आकलन कसं झालं? एकदा मी त्यांना पाहिलं होतं, साऱ्यांनी मिळून पहाटेच्या फिकट पिवळ्या प्रकाशाकडे स्थिर नजरेने बघत असताना. आधी वारा सुटला, आणि नंतर पिवळा पाऊस आला. पिवळा पाऊस सावकाश पडत असताना सगळ्या समुद्रपक्ष्यांनी माझ्याकडे पाठ फिरवली आणि ते आपसात कल्ला करू लागले. यावरून हे स्पष्ट झालं की ते कशाची तरी वाट पाहत होते. खालच्या बाजूला, शहरात, माणसं घरात, गाड्यांमध्ये आसरा घेण्यासाठी धावपळ करत होती; आणि वरच्या बाजूला समुद्रपक्षी वाट पाहत होते, ताठ आणि स्तब्ध. त्यावेळी मनात विचार आला की आकलन झालंय मला त्यांचं.

काहीवेळा एकत्रितपणे भरारी घेताना समुद्रपक्षी सावकाश वर जातात. जेव्हा ते असं करतात, तेव्हा त्यांच्या पंखांच्या फडफडण्याचा आवाज पावसासारखा येतो.

**२. समुद्राच्या काठावरचा, मृत्यू समीप आलेला एक समुद्रपक्षी (हा समुद्रपक्षी दुसरा, भिन्न आहे).**

समुद्राच्या काठावर, मृत्यू समीप आलेला एक समुद्रपक्षी पडलाय. एकटा. लगतच्या पेबल्सवर त्याची चोच विसावली आहे. त्याच्या डोळ्यात वेदना आणि आजारपण दाटून आलंय. नजीकच्या खडकांवर लाटा धडका देत आहेत. वारा त्याची पिसं विस्कटून टाकतोय, जी आताच मृत दिसायला लागलीयत. तिथून पुढे समुद्रपक्ष्याची नजर माझा पाठलाग करू लागते. नुकतीच सकाळ झालीय; थंड हवा आहे. वर, आयुष्याची वाटचाल सुरू आहे; आकाशात इतर समुद्रपक्षी आहेत. मृत होत चाललेला समुद्रपक्षी एक पिलू आहे.

मला पाहून तो समुद्रपक्षी अचानक उभे राहण्याचा प्रयत्न करतो. देहाच्या खालच्या बाजूस असलेले त्याचे पाय अगतिकतेने कापतायत. त्याची छाती पुढे सरकते, मात्र त्याला पेबल्सवर टेकवलेली चोच वर उचलता येत नाही. हा आटापिटा चालू असताना त्याच्या डोळ्यात अर्थ एकवटून येतो. याचवेळी तो पेबल्सवर शरीर झोकून देतो, मृत्यू जवळ आलाय या वास्तवाचा स्वीकार केल्यागत. त्याच्या डोळ्यातला अर्थ लुप्त होतोय ढगांमध्ये आणि लाटांमध्ये. आता कुठलीही शंका उरलेली नाही. समुद्रपक्षी मरण पावतोय.

त्याचा मृत्यू का होतोय हे मला माहीत नाही. त्याची पिसं निस्तेज दिसतायत, निगा न राखलेली. प्रत्येक मोसमाप्रमाणे याही मोसमात मी समुद्रपक्ष्यांच्या कितीतरी पिलांना मोठं होताना आणि उडण्याचा प्रयत्न करताना पाहिलंय. काल एका पिलाला दोनदा वारा आणि लाटांना स्पर्श करून निर्भयपणे बेधडक आकाशात कमानी रेखाटत आणि आनंदाने भरारी घेताना मी बघितलं. भरारी घ्यायला शिकले की समुद्रपक्षी असंच करतात. नंतर मी बघितलं तेव्हा लक्षात आलं की, या पिलाचा एक पंख तुटला होता. असं वाटलं की, त्याचा केवळ एक पंखच नाही तर सारं शरीर जायबंदी झालं होतं.

फार कठीण असावं, तुम्ही आहात त्या टेकडीवरचे समुद्रपक्षी उन्हाळ्यातल्या सकाळी छान गार हवा असताना आनंदाने गातेवेळी, तुम्हाला मृत्यू येणं. पण कदाचित हा समुद्रपक्षी मृत होत नसून त्याला

वाचवण्यात येत असावं जगण्यापासून. कदाचित त्याला काही जाणवलं असावं, काही हवं असावं, मात्र त्याला फारसं काही किंवा काहीच गवसलेलं नसावं. काय विचार करू शकतो समुद्रपक्षी? त्याला काय जाणवत असावं? त्याच्या डोळ्यांभोवती दुःखवेदना दाटून आलीय मृत्यूला सामोरे जायला तयार असलेल्या म्हाताऱ्या माणसाची आठवण करून देणारी. असं वाटतं मृत्यू पावणं म्हणजे रांगत जाऊन अंगावर गोधडी ओढून घेणं. समुद्रपक्षी सांगत असावा, ठीक आहे, असंच व्हायचं असेल तर जाईन मीही.

आमच्या डोक्यावर घिरट्या घालणाऱ्या उद्धट समुद्रपक्ष्यांपेक्षा मी या पिलाजवळ आहे याचं मला बरं वाटतं. या एकाकी बीचवर मी आलो ते समुद्रात पोहायला जाण्यासाठी. मला घाई आहे, डोक्यात अनेक विचार आहेत आणि माझ्या हातात टॉवेल आहे. आता मी त्या समुद्रपक्ष्याकडे पाहत नाहीये. स्तब्धपणे, त्याचा पुरता आदर राखून. सारं विश्व सामावलंय माझ्या पावलांखाली असलेल्या पेबल्समध्ये. तुटलेल्या पंखामुळे नव्हे तर त्याच्या डोळ्यांमुळे मला जाणीव होते त्याच्या मृत्यूची.

एकेकाळी त्याने खूप काही पाहिलं होतं, खूप काही त्याच्या ध्यानात आलं होतं, आणि हे तुम्हालाही माहीत आहे. एकाच मोसमात त्याला एखाद्या वृद्ध माणसाला येईल तेवढा शीण आलाय आणि हा असा शीण आल्यामुळे त्यालाही वाईट वाटत असावं. सावकाश तो सारं काही मागे सोडून देतोय. खात्रीने नाही सांगता येणार, पण कदाचित या समुद्रपक्ष्याविषयीच आकाशातले समुद्रपक्षी गलबला करत असावे. कदाचित समुद्राची गाज मृत्यू सोपा करत असावी.

नंतर, जवळपास सहा तासांनी मी परत त्या बीचवर गेलो, तेव्हा तो समुद्रपक्षी मृत झाला होता. त्याने त्याचा एक पंख फैलावला होता जणू काही त्याला भरारी घ्यायची होती, आणि तो एका अंगावर पहुडला होता, एक डोळा जेवढा विस्फरणं शक्य आहे तेवढा विस्फारून, सूर्याकडे शून्य नजरेने बघण्यासाठी. जवळपास समुद्रपक्षी भराऱ्या घेत नव्हते.

काहीच घडलं नसल्यागत मी समुद्राच्या गार पाण्यात शिरलो.

**३. वादळानंतर**

वादळानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी मी घराबाहेर पडलो तेव्हा बघितलं की, सगळं काही बदललं होतं. मी तुटून खाली पडलेल्या झाडांच्या फांद्यांविषयी किंवा रस्त्यावर झालेल्या चिखलात पडलेल्या पिवळ्या पानांविषयी बोलत नाहीये. जे बदललं होतं ते याहून अधिक खोलवरचं होतं आणि त्यावर नेमकं बोट ठेवणं कठीण होतं, कदाचित पहाटेच्या प्रकाशात सर्वत्र दिसणाऱ्या गोगलगायींच्या फौजा, मातीत साचलेल्या पाण्याचा घाण वास, शिळी हवा ही सगळी चिन्हं होती, काहीतरी कायमचं बदललं होतं, याची.

मी पाण्याच्या एका थारोळ्याजवळ गेलो आणि त्यांत वाकून पाहिलं. थारोळ्याच्या तळाशी मला चिखल झालेली माती दिसली, कदाचित ती कुठल्या इशाऱ्याची, निमंत्रणाची वाट पाहत होती. थोडं पुढे गेल्यावर नजरेला पडलं ते पिवळं गवत, क्लोव्हर्सच्या कडेला आडव्या झालेल्या फर्न आणि इतर वनस्पती पाण्याच्या थेंबांसारख्या दिसणाऱ्या आणि ज्या सुळक्याच्या कडेकडेने मी ठामपणे आणि डोळ्यात अप्रूप घेऊन चालायचो तो माझ्या उजव्या हाताला असलेला सुळका आणि या सुळक्याच्या पायथ्याशी सावकाश घिरट्या घालणारे, कधी नव्हे तेवढे धोकादायक दिसणारे, निर्धार केलेले

समुद्रपक्षी.

अर्थात या सगळ्या गोष्टी – आकलनाची सुस्पष्टता, कुठूनशा आलेल्या वाऱ्याने अचानक गार झालेली हवा, वादळाने पुसून स्वच्छ केलेलं आकाश, संपूर्ण निसर्गाने परिधान केलेला एक नवा रंग – हे सारं मला फसवत होतं अशीही शक्यता होतीच. पण पुढे चालत गेलो तसतसे वाटू लागले की, वादळापूर्वी पक्षी, किडे, कीटाणू, वृक्ष, दगडधोंडे, कचऱ्याचा जुना डबा, कललेला विजेचा खांब या साऱ्यांना विश्वात स्वारस्यच उरले नव्हते, त्यांची उद्दिष्टं नजरेआड झाली होती आणि आपण इथे का आहोत, याचा त्यांना विसर पडला होता. आणि नंतर, मध्यरात्र होऊन गेल्यावर आणि पहाट फुटायच्या आधी, वादळ इथे येऊन धडकलं या हरपलेल्या अर्थाला, आकांक्षांना पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी.

आयुष्य आपल्याला वाटतं त्याहून अधिक सखोल आहे आणि विश्व अधिक अर्थपूर्ण आहे याची जाणीव होण्यासाठी, खडखडणाऱ्या तावदानांचा, पडद्यात असलेल्या फटींमधून वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याचा, विजेच्या कडकडाटाचा आदी आवाजांनी, मध्यरात्रीच जाग यावी लागते का? वादळवाऱ्याच्या आवाजाने मध्यरात्री जाग आलेला नाविक जसा लगेच शिडांकडे धाव घेतो, तसाच मी तातडीने पलंगावरून उठलो, साऱ्या खिडक्या लावून घेतल्या आणि रात्री झोपताना चालू असलेला दिवा मालवला. हे सगळं करून मी किचनमध्ये गेलो आणि पाणी प्यायलो. तेव्हा फटींमधून येणाऱ्या वाऱ्यामुळे डोक्यावर असलेला दिवा लंबकाकार हलत होता. अचानक वाऱ्याचा एक मोठा झोत आला, असं वाटलं की सारं विश्व थरारलंय, आणि वीज गेली. सगळं अंधारात बुडून गेलं. अनवाणी पावलांना किचनमधली फरशी गार लागत होती.

मी बसलो होतो तिथून खिडकीवाटे मला बाहेर झुलणारे पाईन आणि पोप्लारचे वृक्ष आणि वरचेवर मोठ्या होत जाणाऱ्या लाटांवरचा सफेद फेस दिसत होता. ढगांच्या गडगडाटादरम्यान जवळच समुद्रात वीज पडली असावी. सतत चमकणाऱ्या विजा, धावणारे ढग आणि सळसळणाऱ्या वृक्षांचे शेंडे यात कुठेतरी भूमी आणि आकाश एकमेकांत मिसळून गेले होते. किचनच्या खिडकीतून, हातात रिकामा ग्लास घेऊन बाह्यजगताकडे पाहत असताना मनात अपार समाधान दाटून आलं.

मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी जे घडलं होतं, त्याची संगती लावण्यासाठी मी बाहेर पडलो, एखादा अन्वेषक प्रचंड मोठा गुन्हा घडलाय त्या ठिकाणची बारकाईने पाहणी करायला जातो त्याप्रमाणे, आणि तेव्हा मी स्वतःला सांगितलं ते हे– प्रचंड उलथापालथ, हिंसा घडते अशा वादळी काळात आपल्याला आठवण होते–आपण सारे एकाच जगात राहतोय. नंतर, तुटलेल्या, विस्थापित झालेल्या फांद्या, सायकली पाहून मनात आलं– जेव्हा वादळाचा तडाखा बसतो, तेव्हा आपण सारे एकाच जगात राहतोय एवढेच आकलन होत नाही तर असेही वाटू लागते की, आपण सारे एकच, सारखेच आयुष्य जगतोय.


एक छोटी चिमणी चिखलात पडली होती, कशामुळे ते नाही सांगता येणार, आणि ती मृत्यू पावत होती. मी कुतूहलाने आणि कोरडेपणाने तिला रेखाटत होतो, तेव्हा माझ्या वहीवर आणि त्यातील रेखाटनांवर पाऊस बरसू लागला.

❑



# सिनेमा : दोन टिपणे

## नंदिनी देशमुख







### १)
### अ ब्युटिफुल माईंड आणि देवराई

मला तुलना करायची नाही. दोन्ही अतिशय अप्रतिम चित्रपट आहेत. त्यांचे नायक स्किझोफ्रेनिक आहेत हे साम्य आहे म्हणून केवळ एकत्रितपणे विचार करावासा वाटतो. पार्श्वभूमी, काळ, भाषा अगदी निरनिराळे आहेत. आजाराची लक्षणे सारखी दिसतात. पण शिक्षण, संस्कार, कुटुंबातली माणसे यांत खूप फरक आहे. साधारण दोनतीन वर्षे मागेपुढे हे चित्रपट प्रकाशित झाले आहेत. दोन्ही दिग्दर्शकांनी या मानसिक आजाराबाबत व रुग्णाविषयी मानवतापूर्ण आणि सखोल विचार केल्याचे दिसून येते. दोन्ही कथांची मांडणीही पूर्णपणे वेगळी आहे. जॉन नॅश यांची गोष्ट हे घडून गेलेले वास्तव आहे. रसेल क्रो यांनी संस्मरणीय अभिनय केला आहे. देवराई सिनेमातला स्किझोफ्रेनिक शेष ही काल्पनिक व्यक्तिरेखा असली तरी अतुल कुलकर्णी यांनी खराखुरा हाडामासाचा जिवंत माणूस मनोविकारानंतर कसा अंतर्बाह्य फुटून जातो हे अक्षरशः जगून दाखवले आहे.

जॉन नॅश हा गणिताचा बुद्धिमान विद्यार्थी होस्टेलवर राहायला येतो. त्या तरुण वयातच त्याला असे भास होऊ लागतात की त्याच्या खोलीत आणखी एक हुशार विद्यार्थी राहतोय, त्या दोघांची चांगली मैत्रीही होतेय. मात्र प्रेक्षकांना हे फार उशिरा समजते. तो सच्चा मित्र, त्याची छोटी गोड पुतणी आपल्यालाही आवडतात. ते अधूनमधून जॉनला भेटत राहतात. दोघे विद्यापीठात प्राध्यापक असले तरी त्यांचे विषय वेगळे असतात. त्याच सुमारास एका विद्यार्थिनीशी जॉनचे प्रेमसंबंध जुळतात व त्यांचे लग्नही होते. कालांतराने पत्नीलाही त्याच्या आजाराची कल्पना येते, जेव्हा तो अचानकच रागावतो वा हिंसक होऊ लागतो.

शेष हादेखील विज्ञानाचा विद्यार्थी, त्याला देवराईवर संशोधन करण्याची इच्छा असते. पण ते प्रत्यक्षात येऊ शकत नाही. देवराई व तिच्याशी संबंधित घटना, माणसे यांचे त्याला भास होत राहतात. त्यामुळे तो नेहमी गोंधळलेला, संशयग्रस्त होत असतो. त्याची बहीण सीना त्याला आधार देते, डॉक्टरकडे घेऊन जाते आणि त्याचा आजार व उपचार समजावून घेत त्याला बरे करण्याचा प्रयत्न करते. त्याच्या आवडत्या कल्याणीशी त्याची भेट घालून देते आणि हळूहळू कल्याणीच्या मनाचीही शेषसह राहण्याची तयारी होते. हा मनोविकार कशामुळे व का होतो यापेक्षाही तो झालेल्या व्यक्तीशी कसे वागावे हे देवराईमध्ये सांगितले आहे.

स्किझोफ्रेनिक मनुष्य महत्त्वाकांक्षी असला तरी त्याच्या अत्यंत संवेदनशील व तरल मानसिकतेमुळे त्याचे मन खऱ्या वास्तवातून बाहेर पडून स्वतःचे एक वेगळे वास्तव जग तयार करते आणि त्यातल्या घटनांमध्ये रममाण होते.

जॉन नॅशला एकदा पेंटागॉनच्या गुप्त जागेत कामासाठी जावे लागते. तिथल्या कामाबद्दल जाणून घेत असतानाच प्रवेशद्वाराशी शस्त्रधारी सैनिक त्याला बोलावताना दिसतो. तो नंतरही अनेक ठिकाणी त्याचा पाठलाग करत राहतो. अगदी मोठ्या हॉलमध्ये व्याखान देत असताना एकदमच जॉन स्टेज सोडून पळतो. त्याची पत्नी सायकियाट्रिस्टकडून त्याला होणाऱ्या भासांबद्दल इत्थंभूत जाणून घेते. तिला बाळ होणार असते, तेव्हा क्वचित त्याचा हिंसक भाव तिला सहन करावा लागतो. यथावकाश बाळाचा जन्म झाल्यावर पत्नी त्याला फार वेळ देऊ शकत नाही. तोही बाळाला सांभाळण्याचा प्रयत्न करतो, पण अचानक त्याचे चित्त विचलित होते आणि तो कोषात जातो, बाळाला पूर्ण विसरतो. तेव्हा पत्नी हादरते, त्याला काही दिवस असायलममध्ये ठेवले जाते. घरी परतल्यावर काही काळ तो नॉर्मल वागतो. पण पुन्हा त्याला त्याच्या मनातल्या काल्पनिक व्यक्ती दिसू लागतात, त्यांच्याशी तो मोठ्याने बोलत राहतो. पत्नी मुलासह घर सोडून जाण्याचे ठरवते, तरी प्रत्यक्षात पतीबद्दलच्या प्रेमामुळे व करुणेने त्याच्याबरोबरच राहून समजून घेत त्याला साथ देते. पुढे जॉन नॅशला गणिताचा नोबेल पुरस्कार मिळतो. त्याला दीर्घायुष्य लाभते.

शेष कल्याणीच्या सहवासात सुधारतो, नॉर्मल आयुष्य जगतो. अशी सूचक धारणा आपल्याला आनंद देत असली तरी मधूनच त्याची हिंसक लहर उचल खाऊ शकते, त्याचे मन भासांबाबतीत उसळी घेऊ शकते, ही दुखरी जाणीव आपण विसरू शकत नाही. मात्र त्याच्या संशोधनाच्या स्वप्नाचे काय होते, ते सत्यात येण्याइतपत तो बरा होतो का याविषयी आपल्याला काही अंदाजही बांधता येत नाहीत.

जॉन पूर्ण बरा होत नाही, तरी त्याच्या बुद्धिमत्तेचा पुरेपूर उपयोग करून संशोधनकार्य करत राहतो, त्यात यशस्वीही होतो, नाव कमावतो, अनेक पिढ्यांना गणित शिकवतो. यासाठी त्याचे सगळे सहकारी, मित्र आणि त्याचे वरिष्ठही त्याच्या या आजाराला समजून घेत असतात. त्या सर्वांच्या मदतीने

तो कारकीर्द पुरी करतो व अखेरीस नोबेल पुरस्कार प्राप्त करतो.

शेषही पूर्ण बरा होत नसला तरी जीवनाचा आनंद घेण्याची स्थिती त्यालाही लाभत असेलच.

दोन्ही नायक अंतर्मुख स्वभावाचे, सच्च्या दिलाचे आणि प्रामाणिक वर्तणुकीचे आहेत. स्किझोफ्रेनियामुळे त्यांच्या वैयक्तिक आयुष्यांत मोठाच फरक पडलेला आहे. त्यांच्या सहवासातल्या प्रेमाच्या माणसांनाही याची झळ सोसावी लागली आहे. पण त्यांच्यामुळेच अखेरपर्यंत दोन्ही नायक परिस्थितीला सामोरे जाऊन तग धरत ती निभावून नेण्यात यश मिळवून जगत राहिले, हे जास्त मोलाचे!

***

## २)

## चित्रपटातील व्यावसायिकता

चित्रपट मुके होते तेव्हा तो बनवणे हा व्यवसाय नव्हता. त्याला छंद, नाद (किंवा भ्रमसुद्धा) समजले जात होते. त्या काळी नाटक हा व्यवसाय जोरात होता. अनेक नाटक कंपन्या नट-नट्यांना त्यांच्याकडे दरमहा वेतनावर कामाला ठेवत असत. तसेच मग चित्रपटांबाबतही होऊ लागले. या नट-नट्यांना इतर कंपन्यांकडे काम करण्याची मुभा नसे, एकनिष्ठच राहावे लागे. चित्रपट बोलू लागल्यानंतर कंपन्या वाढत गेल्या. हौस वा आवड म्हणून चित्रपट तयार करणाऱ्यांची चांगली प्रसिद्धीही होऊ लागली. सर्वांत मोठी गोष्ट घडली ती संगीताबाबत, संगीत नाटकांना टक्कर देणारे संगीतप्रधान चित्रपट बनण्यास सुरुवात झाली. गायक नटांची चलती झाली. त्यानंतर लवकरच पार्श्वगायन (playcack) हा प्रकार उदयाला आला आणि अनेक अभ्यासू व प्रतिभाशाली संगीतकार, गायक चित्रपटांमुळे प्रकाशात आले, प्रसिद्ध झाले.

नाटकांची गरज वेगळी होती. एक जिवंत, सळसळता अनुभव असायचा तो. प्रत्येक प्रयोगासाठी भरपूर एनर्जी लागायची. चित्रपटात भूमिका करणे तुलनेत सोपे वाटत होते. कॅमेऱ्याची सवय होऊन एकदा शूटिंग झाले की ॲक्टर्स मोकळे होऊन जायचे. नाटकाची प्रॉपर्टी गोळा करणे, सांभाळणे, गावोगावी प्रयोगासाठी ती वाहून नेणे तसे जिकिरीचे होते. चित्रपटासाठीही असेच सुरुवातीला करावे लागले. मग स्टुडिओ निघाले. तिथेच सेट लावून शूटिंग होऊ लागले. नेपथ्य वगैरे नाटकासारखेच असायचे. पौराणिक विषयांवरच्या कथा असायच्या. हळूहळू सामाजिक विषय चित्रपटात दिसू लागले. त्या काळातल्या अस्पृश्यता, सावकारी/जमीनदारी यांमुळे होणारे शोषण/अन्याय यांभोवतीच्या कहाण्या चित्रपटांतून पुढे येऊ लागल्या. तरीही, अनेक प्रेक्षकांसाठी चित्रपटाचे संगीत हाच मोठा आकर्षणबिंदू असायचा. उदा. सुजाता, दो बिघा जमीन.

संगीतामुळे चित्रपटांची मनोरंजनशक्ती जास्त होतीच. नृत्य, रहस्य, नाट्यमयता, गुन्हेगारी, हाणामारी अशा अनेक घटकांमुळे चित्रपटांची लोकप्रियता उत्तरोत्तर वाढत गेली. चित्रपटसृष्टी अनेक अनुभव घेत घेत आपले स्वरूप बदलत राहिली. ढोबळ गोष्टी, घटना यांप्रमाणेच तरल, काव्यमय कथाही लिहिल्या जाऊ लागल्या. त्यामुळे मुद्राभिनयाला जास्त महत्त्व आले, जे नाटकात कधी फारसे होत नव्हते. उदा. तीसरी कसम, अनुभव, मौसम, थोडासा रूमानी हो जाये.

अशा कित्येक बाबींमुळे चित्रपट एक मोठा उद्योग/व्यवसाय म्हणून गणला जाऊ लागला.

आपोआपच त्यासाठी काही नियम पाळले जावे लागायचे, ज्यांची मग एक कायदेशीर यादीच तयार झाली. व्यावसायिकता या शब्दामधून दोन अर्थ प्रतीत होतात. Commercialism Professionalism. पहिला शब्द म्हणजे धंदेवाईकपणा अर्थात फक्त पुरेपूर पैशांचा विचार. दुसरा शब्द त्या उद्योगासाठी लागणारा दर्जेदार कच्चा माल आणि त्याचा पुरवठा होण्यासाठी घ्यावा लागणारा प्रामाणिक शोध आपल्या डोळ्यांसमोर उभा करतो. हा दर्जा आणण्यासाठी अथक परिश्रम आणि एक पॅशन असावी लागते, त्याची एक अदृश्य प्रतिमा दिग्दर्शकाच्या मनात निर्माण झालेली असावी लागते. ती प्रत्यक्षात येण्यासाठी जे अविश्रांत प्रयत्न कलावंतांकडून केले जातात, त्यांची पारदर्शकता चित्रपट पाहताना जाणवत राहते. उदा. गुरुदत्तचे व श्याम बेनेगलचे चित्रपट.

चित्रपटाची तांत्रिक अंगे खणखणीत असावीत, यासाठी जागरुकतेने तंत्रज्ञ-कलाकार निवडावे लागतात. पटकथा, संवाद, फोटोग्राफी, पार्श्वसंगीत, वेषभूषा, अभिनय/कोरियोग्राफी यांचा प्रथम सखोल अभ्यास करावा लागतो. चित्रपटांचे प्रत्यक्ष चित्रीकरण होण्यापूर्वी लोकेशनचा सर्वांगीण विचार व्हावा लागतो. केवळ एकाच व्यक्तीची दृष्टी त्यासाठी उपयोगाची नसते. अनेकानेक जाणकारांच्या व्हिजन्सची उपयुक्त अशी अनुभवी व्हर्जन्स तिथे फायद्याची ठरू शकतात. हैदराबादची रामोजी फिल्मसिटी ही अशी जागा निर्माण करू शकते. शोलेसारखा तद्दन व्यावसायिक चित्रपट अशाच कृत्रिमपणे तयार केलेल्या रामगड नावाच्या गावात शूटिंग करत बनवला गेला आहे.

चित्रकृती ही कलाकृती म्हणून नावाजली जाण्यासाठी पहिल्यांदा कथा, कथेतून जे सांगावयाचे आहे तो आशय (substance) घट्ट असावा लागतो. या बाबतीत सत्यजित राय हा बापमाणूस होता. त्यांच्या स्कूलमध्ये घडलेले अनेक जण आज या क्षेत्रात नाव कमावून आहेत. व्ही. शांताराम, राज कपूर, संजय भन्साळी यांची व्यावसायिकता भव्यदिव्य सेट्स आणि देखावे यांमध्येच लपलेली (किंवा उघड झालेली म्हणा) आहे.

जब्बार पटेल, विशाल भारद्वाज, अनुराग कश्यप व नागराज मंजुळे यांचे चित्रपट हे कमाल व्यावसायिकतेचे उदाहरण मानता येतील. 'उंबरठा', 'मकबूल', 'गँग्ज ऑफ वासेपूर', 'फँड्री' ही उदाहरणे त्यासाठी पुरेशी ठरतात. अलीकडे परमव्रत चटर्जीने उत्तम बंगाली चित्रपट केले आहेत. बंगाली सिनेमांमध्ये परमव्रत चटर्जीचे नाव सध्या अग्रभागी घेतले जाते. दिग्दर्शक व अभिनेता म्हणून उच्च प्रतीची कामगिरी त्याच्या नावावर आहे. त्याचे सिनेमे मनोविकार, त्यांची कारणे, परिणाम, पोषक परिस्थिती यांवर भाष्य करणारे असतात. त्यांत आधुनिक जग व त्यातली माणसे यांचे बारकाईने चित्रण केलेले आहे. इंग्रजी सबटायटल्समुळे ते आपल्याला चांगले समजतात. उदा. शोनार पहार, समांतरल, मयूराक्षी, मंदबासार गल्प वगैरे.

'रुख' (बंगाली दिग्दर्शकः अतनु) या हिंदी सिनेमात मनोज वाजपेयीची भूमिका छोटी असली तरी लक्षात राहते. स्मिता तांबे, इला भाटे व इतर आणखीही मराठी कलाकार आहेत. ध्रुव या टीनेजरची मनःस्थिती, मानसिकता, विचार करण्याची पद्धत आणि नंतर कळलेली वस्तुस्थिती या बाबी परिणामकारकपणे मांडल्या आहेत. मनोज वाजपेयीने 'स्वामी' या चित्रपटात जूही चावलाच्या साथीने केलेली प्रेमळ नवरा, बाप व सद्गृहस्थाची भूमिका अत्यंत प्रभावी वाटली.

दीप्ती नवललिखित व दिग्दर्शित 'दो पैसे की धूप चाराने की बारिश' हा एक वेगळाच सिनेमा पाहण्यात आला. तो अगदी बांधून ठेवणारा तर आहेच, पण कथा नेहमीपेक्षा जास्त भावणारी असल्यामुळे खूपच आवडून गेला. शिवाय, सर्वच प्रसंगांमध्ये खास दिग्दर्शकीय (काव्यमय तरी

व्यवहार्य) अशी दृष्टी जाणवली, जी कलावंतांनी अगदी नीटपणे पोचवली, त्यामुळे अधिकच पटला. या निष्ठुर जगाने नाकारलेली तीन माणसे एकत्र येऊन आपले खास विश्व तयार करण्यात यशस्वी होतात, आनंदी राहू व जगू लागतात. या सिनेमात एका unconventional relationship चं lovely family मध्ये अगदी नकळत कसं रूपांतर होतं , हे जरूर पाहण्यासारखं आहे.

सचिन कुंडलकरच्या 'कोबाल्ट ब्लू' या कादंबरीवरचा त्याच नावाचा चित्रपट नक्कीच उठावदार झाला आहे. हा migration चा प्रभाव आहे. घर, कॉलेज, मित्र, वातावरण बदलल्यावर तरुण मुले-मुली त्यांच्याशी जुळवून घेत स्वतःही कशी टप्प्याटप्प्याने वाढत जातात, हे जाणवते. समुद्राची निळाई व जंगलाची हिरवाई एकत्रितपणे कोबाल्ट ब्लू या रंगाने भारलेली खोल अनुभूती देऊन जाते. कुंडलकरचा हा सिनेमा प्रेक्षकाला निःशब्द करतो.

मीनाकुमारी, संजीवकुमार, वहिदा रहमान, मेहमूद, नूतन, स्मिता पाटील, गिरीश कार्नाड, नासिरुद्दिन शहा, शबाना आझमी, अमोल पालेकर, अमिताभ, तब्बू, सुमित्रा भावे, अतुल कुलकर्णी, गीतांजली कुलकर्णी, मनोज वाजपेयी, इरफान खान, नवाजुद्दिन सिद्दिकी, परेश मोकाशी, सचिन कुंडलकर, राधिका आपटे, नागराज मंजुळे, विकी कौशल ही गांभीर्याने चित्रपट करणारी काही नावे... आणखीही खूप आहेत, लगेच आठवली ती दिली. नवाजुद्दिनने लेखक मंटो जितक्या ताकदीने साकारला, तितक्याच बारकाव्यांनिशी ठाकरे हा राजकारणी व कुशल संघटक माणूससुद्धा उभा केला. राधिका आपटेने साकारलेली रवींद्रनाथ टागोरांची विनोदिनी (चोखेर बाली) अविस्मरणीय आहे. या सर्व व्यक्तींचे साधारण वर्तनसुद्धा नेहमीच आदर्श चित्रपटकर्मी म्हणून कायम लक्षात राहणारे आहे. मराठीत दादा कोंडके, विक्रम गोखले, अशोक सराफ, सचिन पिळगावकर, स्मिता तळवलकर, गजेंद्र अहिरे, सुबोध भावे ही व्यावसायिक मंडळी अजूनही भाव टिकवून आहेत. गांभीर्याने चित्रपट करणाऱ्यांच्या रांगेतले अलीकडेच प्रसिद्धी पावलेले निपुण धर्माधिकारी हे नवीन नाव सध्या चर्चेत आले आहे. त्याचे 'बापजन्म' आणि 'मी वसंतराव' हे चित्रपट अनुभवण्यासारखे आहेत.

हृषीकेश मुखर्जी, वासू चटर्जी, गुलजार, श्याम बेनेगल, गोविंद निहलानी, विशाल भारद्वाज, नागेश कुकनूर, मधुर भांडारकर, सुमित्रा भावे, अनुराग कश्यप, वरुण ग्रोव्हर, नीरज घायवान, नागराज मंजुळे ही चित्रपटाशी कट्टर एकनिष्ठ अशी मंडळी... यांच्यापैकीच काही जणांनी केलेले आनंद, रजनीगंधा, आँधी, मंथन, आक्रोश, अर्धसत्य, पिंजर, डोर, देवराई, अस्तु, हैदर, मसान, राझी, २०० हल्ला हो, झुंड हे केवळ चित्रपट नसून संवेदनशील प्रेक्षकांच्या मनावर जोरदार आघात करून त्यांच्या सदसद्‌विवेकबुद्धीला झिणझिण्या आणणारे अनुभव देणाऱ्या या अतर्क्य कहाण्या आहेत. हीच खरी व्यावसायिकता म्हणावी...आजच्या जगाचे वास्तव मांडणारा professionalism यालाच म्हणता येईल.


माझ्या अल्प आवाक्यात जे मावले ते चिमूटभर तुमच्यापुढे जसे मांडता आले, तसे समजून घ्यावे ही विनंती.

❑



# घडवीन असे मी वृत्त...

## योगिता जाधव



Ted Hughes!! ब्रिटिश कवी.... सातवी-आठवीत हातात आलेल्या कविता, जुन्या वळणाच्या आणि समजण्यापलीकडच्याही! नंतर कधीतरी The cell jar वाचून Sylvia Path* च्या प्रेमात पडणं साहजिकच होतं आणि Ted Hughes ला दोष देणंही झालंच... वयाचे असमंजस परिणाम!

वाढत्या वयाबरोबर त्याच गतीने नसली तरी थोडीफार वाढलेली शब्दांची समज पुन्हा एकदा कवितेच्या वाटेवर घेऊन गेली. त्या कवितांचे नवनवे अर्थ आकळू लागले. आणि कविता लिहिणे ही process नक्की काय, कशी याची उत्सुकता वाटत राहिली. कवीच्या मनात साठलेले शब्द, भावना, कोरलेले वैयक्तिक, सामाजिक आघात याचा परिपाक कवितेत येत असावा ही एक प्रामाणिक समजूत! (मित्रयादीत खूप सारे कवी-लेखक आहेत ते जाणतातच) पण प्रत्यक्षात कविता लिहायला घेऊन बसल्यावर कवीची होणारी उलघाल तो स्वतःच सांगू जाणे!! या अशा अशक्य उलघालीचं वर्णन Hughes च्या The Thought-Fox कवितेत सापडलं.... तसं असंख्य कवींनी लिहिलेलं असावंच; पण हे फारच आवडलं, खरं वाटलं....

१९५७ साली लिहिलेल्या Hughesच्या सुरुवातीच्या classic कवितांपैकी एक! The Thought-Fox हा कविता सुचताना, रचताना एका कवीने मांडलेला शब्दबांधणीचा अनुभव! यात प्रामुख्याने येतं ते fox हे simple metaphor. Fox, owl, horse ही प्रतीकं मराठी साहित्यात फारशा चांगल्या अर्थाने घेतली जात नाहीत पण जुन्या इंग्लिश साहित्यात fox आणि owl ही स्थितप्रज्ञता आणि अभ्यासू वैचारिक प्रतिभेसाठी आवर्जून वापरली जातात..... आणि horse विचारांची गती दाखवण्यासाठी!! (काही मराठी कवितांमधे घोडा येतो .... ग्रेस आणि कुसुमाग्रज यांनी वापरलेला आठवतोय.)

विशेषतः fox हे metaphor तर inspiration आणि creativity साठी वापरलं जातं. (नेटिव्ह अमेरिकन्स आणि अलास्कनस् त्यांच्या गाण्यांमध्ये fox हे metaphor चपळतेचं आणि सूक्ष्म निरीक्षकाचं प्रतीक म्हणून वापरतात. माणसाच्या आसपास न भिता राहणारा आणि तरीही न माणसाळणारा प्राणी त्याच्या या वेगळ्या गुणांसाठी काही भाषांत प्रसिद्ध आहे. Coyoteचा पण उल्लेख येतो. पण metaphor म्हणून दोघांत फार फरक केला जातो.)

The Thought Fox हीच कविता का? याला फारसं बरं उत्तर नाही. एक आहे की या कवितेत fox या कल्पनेचं किंवा रूपकाचं slow crystallisation होतं तसं ते रूपक उजळलंय. कार्बनचं फार slow crystallisation झालं की हिरा तयार होतो म्हणतात. तशीच साध्या सोप्या शब्दांचं उजळणं या कवितेत आलंय....

**I imagine this midnight moment's forest :**
**Something else is alive Beside the clock's loneliness And this clank page where my fingers move.**

मध्यरात्रीच्या या भयाण वेळी मी (विचारांच्या) जंगलात भटकतोय. घड्याळाची निरर्थक टिकटिक, कोऱ्या पानांची अस्वस्थ फडफड, त्यावरून फिरणारी बोटं.... अजूनही काहीतरी आहे तिथं! वाहणारं आणि जिवंतपणाची जाणीव करून देणारं..... कवीच्या एकटेपणाच्या domain मध्ये काहीतरी लखलखतंय! नवीन कवितेच्या जन्माची नांदी...

**Through the window I see no star :**
**Something more near**
**Though deeper within darkness**
**Is entering the loneliness**

नीरव, अंधारयुगासारख्या वाटणाऱ्या या रात्रीत निर्जन, नाकारल्या वेळी अंधारापेक्षा काहीतरी गहन पण सूक्ष्म माझ्या एकटेपणाच्या लेण्यामधे शिरू पाहतंय.... शब्द, सूर, ध्वनी आसपासच आहेत अगदी सख्यासोबत्यांसारखे आणि तरीही फक्त शब्दांबरोबर खेळ सुरू झालेत!

**Cold, delicately as the dark snow**
**A fox's nose touches twig, leaf;**

**Two eyes serve a movement, that now**
**And again now, and now, and now**

या अनासक्त वेळी fox चं क्षणिक दर्शन....जसा fox सावकाश नजरेसमोर येतोय त्याच गतीने शब्द उतरायला लागलेले आहेत. आधी फक्त विस्कळीत शब्द... नंतर त्याचंच थोडं मूर्त स्वरूप.. डोळ्यांसारखं! स्वतःच स्वतःला जोखणारं काही... अगदी समोरच बसलेलं!! व्यक्त होण्याच्या प्रचंड अंतःप्रेरणेतून काहीतरी आकारास येऊ पाहणारं

**Sets neat prints into the snow**
**Between trees, and warily a lame**
**Shadow lags by stump and in hollow**
**Of a body that is cold to come**

नेहमीच्याच निरर्थक होऊ पाहणाऱ्या (lame) अक्षरांचे मनावर पडत चाललेले नवीन ठसे, मेंदूत पसरलेल्या निष्क्रिय जंगलामधे एखाद्या टेकडीवरून घरंगळत येऊन समोर अचानक उभे ठाकावेत तसे तयार झालेलं काही.... त्या शब्दांची, त्यातल्या नव्या अर्थाची ओळख (shadow) पटायला लागलीय....

**Across clearings, an eye,**
**A widening deepening greenness,**
**Brilliantly, concentratedly, Coming about its own business.**

आता तो शब्दांचा fox मोकळ्या वातावरणात समोर स्पष्ट दिसू लागलाय. वाक्यं कागदावर उतरायला लागलीत. त्यांच्यामधून अर्थांचे आकार घडायला सुरवात झालीय. अगदी fox च्या हिरव्या डोळ्यांना कसं सावज स्पष्ट दिसतं तितक्याच एकाग्रतेने स्पष्ट अभिव्यक्ती स्वतःहून जमत चाललीय....

**Till, with a sudden sharp hot stink of fox,**
**It enters the dark hole of the head.**
**The window is starless still; the clock ticks,**
**The page is printed.**

Sudden sharp hot stink.... कविता लिहून पूर्ण होण्याचं सर्जनशील यश! ते यश, ती मनासारखी रचना जमल्याची धुंदी हळूहळू मेंदूवर पसरत मनाला शांत करत चाललीय... बाहेरच्या जगात फारसा बदल झालेला नाही. ते तसंच starless आहे आणि घड्याळाची टिकटिक ही तशीच सुरू आहे. पण अंतर्मनात आनंदच आनंद!! कविता जन्माला आलीय... the page is printed!

ही कविता तशी साधी-सोपी म्हणावी लागेल अशीच! Abyssal म्हणावी इतकी गहन, खोल नाही. तरीही वाचल्यावर विचार करायला लावणारी विशेषतः भाषाभाषांमधील रूपकं आणि प्रतीकांच्या फरकामुळे थोडा सखोल विचार होतो इतकंच! काव्यनिर्मिती आणि त्या अनुषंगाने येणारं लेखन, त्याचा

विस्तीर्ण ऊहापोह जगातल्या अगदी प्रत्येक भाषेमध्ये झालेला आहेच. त्यावर असलेल्या काही कविता सहजच समोरून धावत गेल्या, पण त्या विचारात घ्याव्या आणि कवितेच्या अर्थबांधणीत त्यांचा वापर करावा असं यावेळी मनापासून वाटलं नाही. हे फक्त to look into heart of words असं करण्याचा एक प्रयत्न!

या कवितेबद्दल मनात जे काही साठले होतं, ते मात्र लिहिण्याच्या ओघात कुठेतरी हरवलं अशी एक प्रामाणिक तक्रार स्वतःशीच होतेय. जे कविता वाचून समजलं होतं, त्यापेक्षा वेगळेच काहीतरी लिहून गेलेय... शेवटी स्वतःच्या कवितेबद्दल फक्त कवीच म्हणू शकतो... I have not lived in vain; I can die a solvent man!!

❑

* Sylvia Plath ( ही अमेरिकन) ही Ted Hughes (ब्रिटिश)ची बायको. तिशीत तिने आत्महत्या केली. तिच्या कृत्याबद्दल Ted Hughes ला जबाबदार धरून अमेरिकेत त्याच्यावर काही वर्षं बहिष्कार होता. (वाचकांनी टाकलेला असल्यामुळे त्यात फारसा दम नव्हताच.) नंतर काही गोष्टी उलगडत गेल्यामुळे Ted Hughes बद्दल तयार झालेला तिरस्कारही वाचकांच्या मनातून मावळला.

**'वर्णमुद्रा' २०२०**
**(एकत्रित सात अंक मुद्रित स्वरूपात उपलब्ध आहेत.)**




**मूल्य ₹ ५५०/- (पोस्टेजसह)**

**संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स,**
**शेगाव, जिल्हा बुलढाणा**
**९९२३७२४५५०**
**नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसअॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.**

**अकाउंट डिटेल्स :**
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

**किंवा**



# जॅक केरुऑकची मुलाखत

## अनुवाद - डॉ. स्मिता घैसास



*केरुऑकांकडे फोनच नाहीये. आमच्या टेड बेरिगननं कितीतरी महिन्यांपूर्वी जॅक केरुऑकशी संपर्क साधून त्याला मुलाखतीसाठी कसंबसं राजी केलं होतं. आता त्या भेटीची वेळ साधारणतः येऊन ठेपलीयसं वाटल्यावर तो आणि त्याचे दोन मित्र केरुऑक यांच्या निवासस्थानी थेट येऊन पोचले होते. एरम् सारोयन आणि डन्कन मक्नॉफ्टर हे ते साथी! मात्र केरुऑकांचं दार ठोठावल्यावर, जॅक त्यांना घरात घेतोय न् घेतोय तोच त्याची खमकी बायको तिथं अवतरली. जॅकला धरून मागे ओढतच एकीकडे तिनं या तिघांना तत्काळ बाहेरचा रस्ता दाखवला.*

*या प्रसंगाविषयी बोलताना टेड म्हणतो :*

*जॅक आणि मी गडबडून एकदमच एकसाथ बोलू लागलो... पॅरिस रिव्ह्यू!.. वगैरे तपशील आम्ही सांगू पाहत असतानाच डन्कन् आणि एरम् मात्र हळूच कारच्या दिशेला सटकू पाहत होते! आता सगळंच मुसळ केरात असं वाटू लागलं होतं, तरीही मी माझ्या मते सभ्य, सुसंगत, शांत, अगदी मैत्रीत वगैरे बोलतात तशा थाटात माझं म्हणणं रेटून सुरूच ठेवलं. शेवटी श्रीमतीजींनी आम्हांला वीस मिनिटं द्यायचं कबूल केलं एकदाचं. तेही दारूबिरू चालणार नाही, हे बजावूनच.*

*आत गेल्यावर मात्र बाईंची आमच्या हेतूविषयी खात्री पटली असावी. आम्ही काहीतरी महत्त्वाचं उद्दिष्ट घेऊन आलोय हे जसजसं स्पष्ट होत गेलं, तसतशी त्यांच्या वागण्यातही एक ऋजुता जाणवू लागली, आणि जॅक केरुऑकच्या मुलाखतीतला एक मोठा अडथळा दूर झाला. तर म्हणे व्हायचं असं की, 'ऑन द रोड' या पुस्तकाचा सुप्रसिद्ध लेखक जॅक केरुऑक असतो तरी कुठे... म्हणत अनेक भुरटे लोक यांच्या घरी यायचे... दिवसदिवस मुक्काम ठोकायचे. दारूबिरू पिऊन तर संपवायचेच, पण सगळ्यात त्रासदायक गोष्ट म्हणजे ते जॅकला त्याच्या महत्त्वाच्या कामांपासून विचलित करायचे. पण आम्ही तिथे असताना, जसजशी संध्याकाळ होत गेली, आणि आमच्या हेतूबद्दल बाईंची खात्री दृढावली, तसतसं वातावरण निर्मळ होत गेलं. हळूहळू आम्हांला स्टेला केरुऑक ही बाई किती सौम्य स्वभावाची आणि काहीशी लोभसही आहे, असंही वाटू लागलं...*

*जॅकचा जादूई आवाज ही एक अतिशय विलक्षण गोष्ट म्हणावी लागेल. त्याचं साहित्य जसं आपल्याला क्षणार्धात विस्मयचकित करतं, किंचित अस्वस्थतेची अनुभूती देतं, अगदी तोच तसाच दमदार वाण त्याच्या त्या आवाजातूनही पाझरतो. आपला भोवताल व्यापण्याची क्षमता असलेला तो आवाज आमच्या त्या मुलाखतीवरही स्वामित्व न गाजवता, तरच नवल!*

*आता मुलाखतीकडे वळू या...*

मुलाखतकर्ता : हे फूटस्टूल इथे असं ठेवूयात का?

स्टेला : हो. चालेल.

जॅक : (मुलाखतीची तयारी न्याहाळत) अरे देवा! तुला तर काहीच जमत नाहीये बेरिगन!

मुलाखतकर्ता : अरे, मी काही या टेपरेकॉर्डिंगमधला/ध्वनिमुद्रणातला तज्ज्ञ वगैरे नाही, जॅक, मीही तुझ्यासारखी नुसती तोंडपाटिलकी करण्यातच हुश्शार! चला! सुरू करू या!

जॅक : (शीळ घालत) चला तर मग!

मुलाखतकर्ता : तर सुरुवातीला... बरं का! गंमत म्हणजे... मी वाचलेलं तुझं पहिलं पुस्तक म्हणजे... आता बहुतेकजण 'ऑन द रोड' वाचतात खरं तर, पण मी मात्र ते...

जॅक : अरेच्च्या! खरं सांगतोस? 'डॉक्टर सॅक्स' वाचलंस?

मुलाखतकर्ता : मी ते लायब्ररीतून आणून वाचलं होतं.

जॅक : बापरे! तू 'डॉक्टर सॅक्स' वाचलंस? खरंच? आणि 'ट्रिस्टेसा'ही? काय सांगतोस??

मुलाखतकर्ता : विश्वास ठेव अगर नको ठेवूस! मी ही पुस्तकं वाचलीयत! आणि मी 'रिम्बाल्ड'ही वाचलंय बरं! माझ्याकडे 'व्हिजन्स ऑफ कोडी'ची प्रत आहे. आणि तीही कोणती माहिताय? खुद्द रॉन पॅजेनं टल्सा, ओक्लाहोमामध्ये विकत घेतलेली!

जॅक : रॉन पॅजे गेला खड्ड्यात! का ते सांगू? त्यानं एक मासिक सुरू केलं होतं, बरं का! 'व्हाईट डोव्ह रिव्ह्यू' नावाचं...बहुतेक कान्सास सिटीमध्ये... की टल्सा माहिती नाही... ओक्लाहोमामध्ये टल्साच असेल बहुतेक. तर म्हणे, आमच्या मासिकाच्या प्रथम आवृत्तीसाठी तुमची एखादी दीर्घ कविता पाठवा! मग मी 'द थ्रॅशिंग डोव्हज्' पाठवली... नंतर अजून एक पाठवली... तर या नालायकानं ती दुसरी स्वीकारलीच नाही! का? तर याचं ते मासिक आधीच सुरू झालं होतं म्हणे! म्हणजे हे भXवे कसे कुणाची पाठ खाजवल्यासारखं करत फायदा घेतील, सांगता येत नाही. कवी म्हणे! तो कसला आलाय

कवी? खरे महान कवी कोण, मला विचार!

मुलाखतकर्ता : बरं, मग तुझ्या मते कोण आहेत बरं ही कवी मंडळी?

जॅक : आता बघ... तो विल्यम बिसेट. व्हॅन्कूवरचा... तो आहे. 'ॲन इंडियन बॉय'वाला... बिल् बिसेट् का बिसोनेट... काय बरं नाव त्याचं...

सारोयान : आपण जॅक कॅरुऑकबद्दल बोलूयात हो!

जॅक : (स्वतःबद्दल) जॅक ना! तो काही बिल् बिसेट्पेक्षा महान नाही म्हणता येणार. मात्र नाणं खणखणीत आहे त्याचं!

मुलाखतकर्ता : आपण तुझ्या प्रकाशकांपासून सुरुवात करू या का? तू प्रकाशक कसे...

जॅक केरुऑक : तर, माझ्या सगळ्या प्रकाशकांना, पार माल्कम कौली पासूनच्यांना माझं लिखाण जसंच्या तसं ठेवायचं, ही सूचना मी दिलेली असते. आता कारणं काही असोत, पण त्या काळी, जेव्हा मी 'ऑन द रोड' आणि 'द धर्मा बम्स' लिहिली, तेव्हा माझ्या शैलीनुसारच ती लिहिण्याचा अधिकार मला नव्हता. त्यामुळे मग माल्कम कौलीनं माझ्या लिखाणात अक्षरशः अगणित सुधारणा केल्या! हजारो निरर्थक स्वल्पविराम अन् काय काय... आता पाहा.. 'शेयन, वायोमिंग'मध्ये हा असा स्वल्पविराम कशासाठी? काय मोठी महत्त्वाची गोष्ट आहे ही? साधं सरळ 'शेयन वायोमिंग' लिहिलं तर काय बिघडणार आहे? अरे या अट्टाहासापायी मी त्या 'बम्स'च्या हस्तलिखितावर तब्बल पाचशे डॉलर्स खर्च केले! व्हायकिंग प्रकाशनाचं बिल! कशासाठी? तर या सुधारणांसाठी! हा हा हा हो! हसू की रडू मी? आणि तू विचारतोयस की मी प्रकाशकांबरोबर कसं काम करतो? हल्ली तर ना! त्यांनी तारखा, गावांची नावं वगैरे बरोबर आहेत ना इतपत पाहिलं, तरी मी भरून पावलो म्हण! लिखाण तार्किकदृष्ट्या कुठं फसलं नाही ना, इतकं झालं त्यांच्याकडून तरी बास. म्हणजे बघ, माझ्या आताच्या पुस्तकात मी चुकून 'फर्थची सामुद्रधुनी' असा उल्लेख केला होता. प्रकाशकाच्या सल्ल्यावरून पुन्हा पडताळलं तर लक्षात आलं की मी खरं तर 'क्लाईडची सामुद्रधुनी' पार केली होती! तर अशा गोष्टी .. किंवा मी ॲलिस्टरचं स्पेलिंग चुकवलं होतं एकदा... मधलं एक अक्षर गाळलं होतं... किंवा मी फुटबॉलच्या खेळातली अंतरं, क्षेत्रफळं वगैरे बारीक बारीक तपशील चुकीचे टाकले होते, ते त्याच्या ध्यानात आले... हे ठीक आहे. कारण असं आहे की या अशा सुधारणा केल्या नाहीत तर तुम्ही वाचकांसमोर जे लिखाण ठेवता, त्यातून लेखकाच्या प्रत्यक्ष लिहितानाच्या मनोव्यापाराचाचं दर्शन त्यांना घडतं! ज्या घटना पेश केल्यायत, त्या संबधीचा प्रांजळ कबुलीजबाबच असतो तो! अपरिवर्तनीय, निखळ कबुलीजबाब! आणि तो महत्त्वाचा आहे. कसा ते सांगतो, बघ! आता समज आपण असे सगळे बारमध्ये बसलोय, आणि एकजण अगदी रंगात येऊन आपल्याला त्याची भन्नाट कहाणी सुनावतोय हं! आपण सगळे ऐकतोय, मधून मधून हसून त्याला दाद देतोय.. बरं का? तर मध्येच

- **माझ्या सगळ्या प्रकाशकांना, पार माल्कम कौलीपासूनच्यांना माझं लिखाण जसंच्या तसं ठेवायचं ही सूचना मी दिलेली असते.**
- **माल्कम कौलीनं माझ्या लिखाणात अक्षरशः अगणित सुधारणा केल्या! हजारो निरर्थक स्वल्पविराम अन् काय काय... आता पाहा.. 'शेयन, वायोमिंग'मध्ये हा असा स्वल्पविराम कशासाठी? काय मोठी महत्त्वाची गोष्ट आहे ही?**

- **या अशा सुधारणा केल्या नाहीत तर तुम्ही वाचकांसमोर जे लिखाण ठेवता, त्यातून लेखकाच्या प्रत्यक्ष लिहितानाच्या मनोव्यापाराचाचं दर्शन त्यांना घडतं! ज्या घटना पेश केल्यायत, त्या संबधीचा प्रांजळ कबुलीजबाबच असतो तो! अपरिवर्तनीय, निखळ कबुलीजबाब! आणि तो महत्त्वाचा आहे. कसा ते सांगतो, बघ! आता समज आपण असे सगळे बारमध्ये बसलोय, आणि एकजण अगदी रंगात येऊन आपल्याला त्याची भन्नाट कहाणी सुनावतोय हं! आपण सगळे ऐकतोय, मधून मधून हसून त्याला दाद देतोय.. बरं का? तर मध्येच कधी थांबून तो आपलं आधीचं वाक्य 'सुधारून' सांगायची तसदी घेतो का? त्यामुळे त्या कथनाचा प्रभाव, त्याची लय उणावते ना! समज तो नाक शिंकरायला मध्येच थांबला... तर तो पुढच्या वाक्याचा विचार करत असतो ना! मागचा विचार नाही करत!**
- **माझा सगळा उमेदीचा काळ मी संथगतीने उजळण्या, रटाळ सुधारणा करत वाया घालवलाय... हे खोड, ते सुधार... किती तो शिळ्या कढीला ऊत आणत...**

कधी थांबून तो आपलं आधीचं वाक्य 'सुधारून' सांगायची तसदी घेतो का? त्यामुळे त्या कथनाचा प्रभाव, त्याची लय उणावते ना! समज तो नाक शिंकरायला मधेच थांबला... तर तो पुढच्या वाक्याचा विचार करत असतो ना! मागचा विचार नाही करत!

आणि मग ते पुढचं वाक्य जेव्हा एका फटक्यात त्याच्या वाणीतून मुक्त होऊन आपल्यापर्यंत पोचतं, तेव्हा ते त्याला हवं तस्संच एकदाच बोललेलं असतं. त्यानंतर तो त्या वाक्यातून मांडलेल्या विचारांशी फारकत घेतो. म्हणजे शेक्सपिअरच्या शब्दांत सांगायचं तर 'कायमचं मौन' पाळायची आणच घेतो म्हणा ना! कारण त्याच्या दृष्टीनं त्या विचाराची लाट त्यानं पार केलीय. पाणी जसं खडकावरून वाहून गेल्यानंतर पुन्हा माघारी फिरत नाही, तसंच म्हण! समय रेषेवरून कधी कुणी उलट चाललंय का? आणि बरं का, मला एकूणच वेळकाळाचा जो तिटकारा आहे ना, तो मी 'ऑक्टोबर इन द रेलरोड अर्थ'मधल्या लिखाणात दाखवून दिलाय. प्रायोगिक स्वरूपाचं लिखाण आहे ते! (त्या लेखनाच्या वेळेस जॅक रेलरोडवर ब्रेकमन होता. सॅन फ्रान्सिस्कोमध्ये रेल्वे कामगार). एखादं आगगाडीचं इंजिन कसं खडखडाट करत, भसाभसा वाफ सोडत मालगाडीचे अनेक जड डबे खेचत असतं आणि पार टोकाला ती कलकलाट करणारी केबिन, तो सगळा जामानिमा ढकलायला हातभार लावत असते. माझा लिहिण्याचा खाक्या काहीसा तसाच होता! आणि अजूनही मला तीच धडाकेबाज पद्धत आवडते. त्या ओघात आणि वेगात लिहिताना विचार जर निर्मळ, प्रांजळ कबुलीजबाबासारखे असतील, आणि जगण्याबद्दलचं एक रसरशीत जिवंत चैतन्य त्यात असेल तर हे आजही शक्य आहे रे! अरे बाबा, माझा सगळा उमेदीचा काळ मी संथगतीने उजळण्या, रटाळ सुधारणा करत वाया घालवलाय... हे खोड, ते सुधार... किती तो शिळ्या कढीला ऊत आणत, ओढून ताणून अटकळी बांधत केलेला अंतहीन भासणारा अट्टाहास... अक्षरश: दिवसागणिक एक वाक्य लिहून होईल तर शपथ! आणि लिहिल्यावरही ते वाक्य असं निर्जीव, टुक्कार वाटायचं. च्या मारी, त्यात काही दमच नसायचा.. कलेचा आत्मा म्हणजे तिच्या गाभ्यातील ओसंडू पाहणारी भावना. एखाद्या कलाकृतीतून भावना पाझरत नसेल तर ती चैतन्यहीन होऊन जाते. तसाच काहीतरी प्रकार व्हायचा बघ. कला ही धूर्तपणे, हुशारीनं भावना लपवत

घडणारी गोष्ट नाहीच रे!

मुलाखतकर्ता : बरं मग 'ऑन द रोड' लिहिताना जी उस्फूर्त शैली तू वापरलीयेस, तिची प्रेरणा काय? ती कुठून मिळाली?

जॅक केरुऑक : मी 'ऑन द रोड'ची शैली, ती तशी उस्फूर्त लिहिण्याची कल्पना बघ, आपला पट्ठ्या नील कसॅडीकडून घेतली, असं म्हणायला हवं. तो मला जी पत्रं लिहायचा ना, ती अशी, म्हणजे भन्नाट, सुसाट, बेधुंद, प्रांजळ मनोव्यापारांची निखळ कबुली देणारी आणि त्याच वेळी अत्यंत तपशीलवार लिहिलेली, एक अजबच रसायन असायचं ते! ती वाचताना मला गोएथनं दिलेली तंबी, किंवा भविष्यवाणीच म्हणा हवं तर, 'भविष्यकाळातील पाश्चिमात्य साहित्य हे कबुलीजबाबाच्या स्वरूपाचं असेल,' हे सतत आठवायचं पाहा! आणि दोस्तोव्हस्कीनं तरी काय, हेच तर सांगितलं होतं! नाही का? बिचारा जर अजून थोडा जगला असता तर स्वतःचे शब्द खरे करत तसं लिहिलंही असतं त्यानं! 'द लाईफ ऑफ अ ग्रेट सिनर'मध्ये... मोठा प्रोजेक्ट योजला होता त्याने तो. पण काय... तर गम्मत म्हणजे बघ, आपल्या कसॅडीनं देखील तरुणपणी लिहिताना बरं का, ते फालतू हळुवार, काळजीपूर्वक लिहायचे प्रयत्न केले होते! ते सगळं 'हस्तकलेसारखं' छिन्नी मारत घडवणं वगैरे हागरेपणाचा त्याला आला कंटाळा! माझ्यासारखाच! कारण पाहा तो विचारांचा पाणलोट, तो लोंढा जसा उरापोटातून फुटून बाहेर येऊ पाहतो ना, तसा कागदावर उतरत नव्हता रे! मला त्याच्या शैलीतून एक प्रकाशझोताची अनुभूती मिळाली! ते वेस्ट कोस्टवरचे भXवे म्हणतात ना की मला 'ऑन द रोड'ची कल्पना कसॅडीकडून मिळाली, ते खरं नाही, ते अत्यंत क्रूर असं असत्य आहे! धादांत असत्य! खरं काय ते मी सांगतो तुला. त्यानं मला लिहिलेली पत्रं ही त्याच्या लहानपणीच्या काळासंबंधी, वडिलांबरोबरच्या, किंवा नंतर तो टीनएजर असतानाच्या काळाचं वर्णन करणारी आहेत, म्हणजे आम्ही भेटलो त्यापूर्वीचा काळ. खूप आधीचा काळ. आता हे म्हणतात काय, तर त्यानं मला तेरा हजार शब्दांचं पत्रं लिहिलं! तर नाही! ते तसं नाहीये!

ते तेरा हजार शब्द माझ्या पत्रातले नव्हते. ते त्याच्या एका कादंबरीतले होते. 'द फर्स्ट थर्ड' नावाची कादंबरी, जी त्यानं मला कधी दाखवलीसुद्धा नव्हती. ती त्याच्याकडेच होती. त्यानं मला जे पत्र पाठवलं ना, म्हणजे मुख्य पत्रं, ते तब्बल चाळीस हजार शब्दांचं लांबलचक होतं. एखाद्या छोट्या कादंबरीसारखंच. माझ्या वाचनात आलेली सगळ्यात महान कलाकृती म्हणेन मी त्या लिखाणाला. अमेरिकेतल्या कुठल्याही लेखकापेक्षा सरस लेखन! म्हणजे, आता मला माहिती नाही, पण, बघ अगदी, मेल्व्हिल, ट्वेन, डिझार, वूल्फ... या सगळ्या महान मंडळींना अस्वस्थ करेल, असं होतं ते प्रकरण. तर त्या ॲलन गिन्सबर्गनं बघ, माझ्याकडून ते पत्र वाचायला उसनं मागून घेतलं.

(This letter was later found. Links: https://time.com/3613118/joan-anderson-letter/ and this one : https://www.sensitiveskinmagazine.com/joan-anderson-letter-neal-cassady/)

मग त्यानं स्वतःचं वाचून झाल्यावर एका गर्ड स्टर्न नावाच्या माणसाला ते वाचायला दिलं. तो राहायचा एका हाऊसबोटीवर कॅलिफोर्नियामध्ये, सॉसालिटो गावात. १९५५ सालातली गोष्ट आहे ही.

- **कला ही धूर्तपणे, हुशारीनं भावना लपवत घडणारी गोष्ट नाहीच रे!**

तर या नालायकानं ते पत्र टाकलं हरवून! बोटीच्या कठड्यावरून पडलं बहुतेक ते पाण्यात!

नील आणि मी, बरं का, त्या पत्राला 'जोन अँडरसनवालं पत्र' म्हणायचो! काय काय होतं त्यात खरंच.. 'पूल हॉल'मध्ये घालवलेला ख्रिसमसचा वीकएंड, हॉटेल रूम्स, डेनव्हरचा तुरुंग.. अगदी हसून पुरेवाट होईल असं वर्णन, पण शोकात्मही... आणि ती कोण एक विधवा बाई? तिचं चित्रं काढलेलं बरं का, अगदी तिच्या मापांसकट! काही विचारू नकोस! वाचकाला कळायला हवं ना सगळं? जर ते पत्र सापडलं असतं ना? तर नीलच्या कॉपीराईटखाली प्रसिद्ध झालं असतं. पण खरंतर मला पाठवलेलं पत्रं ही माझी मालमत्ता की नाही? तांत्रिकदृष्ट्या! तो एमर्सन काय किंवा तो बोटीवरचा माणूस काय, त्याने इतका निष्काळजीपणा करायला नको होता! ते हरवलेलं पत्र मिळालं ना, तर नीलला काही न्याय मिळाला असं होईल बघ! तर त्या वेळी आम्ही दोघे टेप रेकॉर्डरवरही बोललोय. असे काही सुसाट की काही विचारू नकोस! ही १९५२ सालची गोष्ट बरं! आम्ही सारखे बोलायचो, आणि ते बोलणं ऐकायचो... हे करता करता आम्हांला आमच्या अशा खास बोलीचं रहस्य गवसलं. आणि आम्हांला उमगलं की त्या वयातला आवेग, तणाव, हर्षोन्मादी च्यू Xपणा व्यक्त करायचा हाच एक मार्ग आहे!

हे एवढं उत्तर पुरे का आता?

मुलाखतकर्ता : मग 'ऑन द रोड' नंतर तुझ्या शैलीत कसकसा बदल होत गेला, सांगशील का?

जॅक केरुऑक : कसली शैली? हां हां.. ती 'ऑन द रोड'ची शैली म्हणतोस होय? तर त्या कॉवलीनं माझ्या मूळ लिखाणाचं काय माकड केलं ते तुला सांगितलं ना? तेव्हा त्याला काही म्हणायची माझी टाप नव्हती, पण त्यानंतर मात्र माझ्या लिखाणाचा खेळखंडोबा करायला मी कुणाला वाव दिला नाही. नंतरची पुस्तकं मी म्हणेन तश्शी– जशी लिहिली तश्शी– प्रकाशकांनी छापली. शैली बदलत गेली... 'रेलरोड अर्थ'ची जी खास प्रायोगिक शैली होती, सुसाट, बेबंद अशी ती गतिमान लेखनशैली, ती 'ट्रिस्टसा'मध्ये सापडणार नाही. 'ट्रिस्टसा'– ते लिखाण आत वळलेल्या नखासारखं पावलागणिक खुपणारं , काहीसं गूढ म्हणावंसं... नंतर दोस्तोव्हस्कीचं 'नोट्स फ्रॉम अंडरग्राउंड' घे ... तसाच जुनून मिरवणारं कबुलीजबाबी शैलीशी साधर्म्य असणारं, लिखाण 'द सबटरनेन'मध्ये सापडेल... आणि या तिन्हीचा परिपाक म्हणावीशी परिपूर्ण शैली तुला 'द बिग सर'मध्ये आढळेल पाहा. मी म्हणेन, 'बिग सर' ही एक सरळसोट कथा आहे. मृदुमुलायमतेनं ओतप्रोत अशी... आणि 'स्टोरी इन पॅरिस'चं काय सांगू तुला? हाताशी दारूचा ग्लास ठेवून लिहिलेलं माझं पहिलं पुस्तक ते! कॉनॅक आणि माल्ट लिकर अशी जवळ असायची लिहिताना... आणि ते 'बुक ऑफ ड्रीम्स' विसरू नको हां! ते म्हणजे अक्षरश: अर्धवट झोपेतून जागा झालेला, कसं एका तारेत असल्यासारखं लिहिलं ना.. तसं आहे... तुफ्फान तोडलंय मी ते. पेन्सिलीनं लिहिलंय. गादीजवळच बसून लिहिलं, हां पेन्सिलीनं! आहेस कुठं? काय ते ताम्बारलेले, डबडबलेले डोळे... धुंदीत स्वप्नावस्थेतच असायचो बहुतेक, एक पागल नशा चढलेली सतत... कसले कसले तपशील अचानकच उमाळत लिहिता लिहिता टपकायचे... आणि त्यांचा अर्थही तेव्हा नीट लागायचा नाही. मग नंतर जागं झाल्यावर कॉफी वगैरे घेऊन ते पाहिले की मग काय, स्वप्नांचे तर्क, त्यांची रचना स्वप्नांच्याच बोलीभाषेत समोर साकार झालेली असायची! आणि सरतेशेवटी पाहा, मध्यमवयीन म्हणण्याइतका मोठा झालो तेव्हा मात्र मी थोड्या स्थिरावलेल्या संथ गतीनं 'व्हॅनिटी ऑफ ड्युओलूझ' लिहिलं... तोवर जरा माणसाळलो बहुतेक... इतकी वर्षं असंच गूढ अमूर्त लिहिलं ... आधीच्या वाचकांनी हे पुस्तक जर वाचलं, तर एक ठेहराव नक्की जाणवेल त्यांना. माझ्या आयुष्यात,

विचारांत, दहा वर्षांनी काय काय स्थित्यंतरं झालेली हे पाहायचं असेल ना, तर हे पुस्तक वाचावं. शेवटी माझ्याकडे वाचकांना द्यायला दुसरं आहे तरी काय रे? मला काय दिसलं आणि मी ते कसं पाहिलं याच्या खऱ्याखुऱ्या कथानापलीकडे आहे तरी काय माझ्याकडे त्यांच्या समोर ठेवायला?

मुलाखतकर्ता : 'व्हिजन ऑफ कोडी'चे काही भाग तू डिक्टेट केले आहेस म्हणे? मग ती तशी तू डिक्टेट करायची, आणि कुणीतरी नोट्स घ्यायची ही पद्धत नंतर कधी वापरलीस का?

जॅक केरुऑक : नाही नाही, 'व्हिजन्स ऑफ कोडी'चे कुठलेही भाग असे डिक्टेट वगैरे केलेले नाहीत. मी टेप केलेलं नील कसॅडीबरोबरचं संभाषण टाईप केलं होतं तेव्हा. नील कसॅडी म्हणजेच कोडी त्याच्या अगदी सुरुवातीच्या काळातल्या आठवणी एल ए मधल्या पराक्रमांबद्दल बोललेलं टेप केलं होतं. चार भागांत आहे ते. आणि ते एकदाच तसं केलं. पुन्हा त्या वाटेला गेलो नाही. कारण, बघ... ते नीट झालंच नाही काम माझ्या मते. सगळं लिहून झाल्यावर ते काही आम्हांला आवडलं नाही खरंतर... नील आणि मी बोललो खरं, पण ते मध्ये मध्ये सारखं आपलं, हं अहं आणि ओह... आणि सगळ्यात भयानक प्रकार म्हणजे ती टेप फिरतीये आणि इलेक्ट्रिसिटी खर्च होतीये याची उगाच धास्ती! ती जास्त वाया जाऊ नये म्हणून काळजी! कुणी सांगितलंय! पण माहीत नाही... कदाचित ते हळूहळू करावं लागेल आता. थकलोय तसा... आणि डोळ्यांनाही नीट दिसत नाही आजकाल. हा एक भेडसावणारा मुद्दा आहे! असो! अलीकडे सगळे तेच करतायत, असं ऐकलं खरं... पण मी तरी अजून खरडत असतो! मॅकलुहान म्हणत होता, आपण जास्त करून त्या तशा तोंडी पद्धतीनंच लिहायला लागू म्हणून... बघू... मशीनमध्ये तोंड घालून बोलणं जमेल हळूहळू सगळ्यांनाच.

मुलाखतकर्ता : आणि ते...'यित्चीयन सेमी ट्रान्स'चं काय? उस्फूर्त लिखाणासाठी तसं ते ध्यानस्थ असणं पोषक असतं, म्हणतात ना?

जॅक केरुऑक : बरा विषय निघाला! अरे, थोबाड चालू असताना, अखंड बडबडत असताना ध्यानस्थ कोण असेल? लेखन हे तरी मौनावस्थेत ध्यान लावून करायची गोष्ट आहे माझ्या मते. तुला तो 'ला डोलस विटा'मधला प्रसंग आठवतोय? तो पाद्री भयानक खवळतो बघ? ज्या झाडाखाली लहानग्या मुलांना मेरी माता दिसली, ते झाड पाहायला येड्यांच्या झुंडी येतात तेव्हा? तो काय म्हणतो? आठवतंय? तो म्हणतो, या असल्या खुळसट धुमश्चक्रीत, ओरड्यात, धक्काबुक्कीत दृष्टान्त वगैरे मिळत नसतो! तो मिळायचा तर मौन धारण करून ध्यानस्थ व्हावं लागेल!

> • **धुंदीत स्वप्नावस्थेतच असायचो बहुतेक, एक पागल नशा चढलेली सतत... कसले कसले तपशील अचानकच उमाळत लिहिता लिहिता टपकायचे... आणि त्यांचा अर्थही तेव्हा नीट लागायचा नाही. मग नंतर जागं झाल्यावर कॉफी वगैरे घेऊन ते पाहिले की मग काय, स्वप्नांचे तर्क, त्यांची रचना स्वप्नांच्याच बोलीभाषेत समोर साकार झालेली असायची!**

मुलाखतकर्ता : तू कुठेतरी म्हटलंयेस... की हायकू हा कवितेचा प्रकार उस्फूर्तपणे लिहिता येत नाही. त्यावर पुनःपुन्हा संस्करणाची, सुधारणांची गरज असते... हे तुझ्या सगळ्या कवितांबाबतीत होतं? आणि तसं असेल, तर मग तुझ्या गद्य आणि पद्यलेखनाच्या पद्धतीत असा फरक का?

जॅक केरुऑक : सगळ्या नाहीत. पण एक सांगायचं तर.. हायकू प्रकारच्या कवितांना ना... तसं

संस्करण लागतं. त्यांना पुनःपुन्हा आकार द्यावा लागतो. हे सांगू शकतो मी. कारण काय आहे की त्या अगदी काटकसरीनं लिहाव्या लागतात बघ. म्हणजे त्यात कसलाही पर्णभार, फुलोराबिलोरा बसत नाही. तुझी भाषा, लय वगैरेला स्थान नाही. बस, तीन ओळींचा खेळ सारा. आणि त्यातूनच तुला काय असेल ते भावचित्र वाचणाऱ्यासमोर उभं करायचंय. म्हणजे जुनेजाणते म्हणवणारे तरी हे असंच करून गेलेत...

आता हे उदाहरण घे–

**परित्यक्त नौकेत**
**गारपीट**
**डुचमळतीय ती इतस्ततः...**

ही 'शिकी' या कवीनं लिहिलेली हायकू आहे.

पण मी जेव्हा माझ्या कवितांची कडवी लिहीत होतो... तेव्हा मी काय केलं माहितीये? मी ते सगळं गद्यलेखनासारखंच ते बडवलं! म्हणजे ऐक, वहीची पानं असतात ना? त्यांची लांबी हीच वापरून काम केलं. म्हणजे कविता किती मोठी असावी, तिचा ढाचा काय असावा, हे पानाच्या आकारावरून बेतायचं! अरे, ते संगीतकार नाही का? म्हणजे जॅझ प्रकार माहितीये ना? ते कसे साचेबद्ध लिहितात? ठरावीक बार्समध्ये ओळी बसवायच्या असतात... एका कोरसमध्येच मावेल, हे पाहावं लागतं. हां, ओळी एकीतून दुसऱ्या कोरसमध्ये सांडू शकतात कधी कधी, पण ते कोरसपण संपलं की त्याला थांबवावं लागतं, ती रचना तिथे संपलीच पाहिजे. तसंच! आणि शेवटी असं आहे बघ, की कवितेत ना? तुम्ही काहीही म्हणू शकता खरंतर! तुम्हांला पूर्ण स्वातंत्र्य! तिथे कथाकथनातली बंधनं कुठे असतात? आपण छुपे श्लेष वगैरे बिनधास्त घुसवू शकतो कवितेत, नाही का? म्हणून गद्य लिहिताना मी नेहमी म्हणतो, आता इथे कवितेसारखं काही गोलमाल नाही चालणार! मुकाट्यानं कथानकाचा गुंता सरळ करा आधी!

*(तेवढ्यात इथे आम्हाला ड्रिंक्स सर्व्ह केली गेली.)*

मुलाखतकर्ता : पण आता तू हायकू कशी लिहितोस, ते सांग जरा!

जॅक केरुऑक : हायकू? तुला हायकू ऐकवू? त्याचं कसंय की एक भली मोठी गोष्ट – अख्खी कथाच तीन ओळीत दामटून बसवायची असते आपल्याला! आधी एक हायकूचा स्थलकाल निर्माण करावा लागतो. म्हणजे... आता पाहा एक पान ... हिला (कुणाला? स्टेलाला ? बायकोला? कळत नाहीये.) सांगितलं परवाच तसं...

**एक पान ...**
**चिमणीच्या पाठीवर पडलं ...ऑक्टोबरच्या वादळी वाऱ्यात...**

तर ते भलं मोठं पान छोट्याशा चिमणीच्या पाठीवर पडलं, हे तीन ओळीत कसं कोंबशील? त्या जपानी भाषेत सतराच उच्चारांत बसवावं लागतं सगळं. आपल्याला ते बंधन नाही. अमेरिकन बोलीत

किंवा इंग्लिशमध्ये ते उच्चारावयवांचं बकवास कौतुक सांभाळावं नाही लागत. ते एक बराय.

तर मग तू म्हणशील, छोटीशी चिमणी... पण चिमणी तर छोटीच असते, सगळ्यांना माहीत आहे हे.. पाहिलेल्या असतात.. मग नुसतंच म्हणायचं–

**चिमणी...**
**मोठ्ठं पान पाठीवर पडलेली**
**वादळवारा**

पण हे कायतरीच वाटतंय. छे! नकोच हे!

असं म्हणू

**एक इवलीशी चिमणी**
**जेव्हा शिशिरातील गळलेलं पान पाठीला डकलं**
**वादळवाऱ्यानं कुठूनसं आणलं**

हां! झाली बघ! हायकू! पण नाही यार! फार लाम्बलचक वाटतीये ... बेरिगन, तुला कळतंय का मला काय म्हणायचंय ते?

मुलाखतकर्ता : हो, एखादा शब्द कमी करता येतोय का पाहावा लागेल म्हणजे, ‘जेव्हा’ हा शब्द कशाला पाहिजे? तो काढून टाकू!

**चिमणी**
**शिशिराची पानगळ अचानक पाठीवर आलेली**
**वादळवाऱ्यानं आणलेली**

जॅक केरुऑक : हां! जमलं की तुला बरोब्बर! तो ‘जेव्हा’ उगाचच घातला होता मी.

**चिमणी**
**शिशिराची पानगळ**
**अचानक पाठीवर**

भले शाब्बास! पण नाही रे! ते ‘अचानक’ कुठून आणलंस आता? ‘अचानक’ म्हणायची काय गरज आहे?

**चिमणी**
**शिशिराची पानगळ पाठीला चिकटलेली**
**वाऱ्यातून आलेली**

- **माझ्याकडे वाचकांना द्यायला दुसरं आहे तरी काय रे? मला काय दिसलं आणि मी ते कसं पाहिलं याच्या खऱ्याखुऱ्या कथनापलीकडे आहे तरी काय माझ्याकडे त्यांच्या समोर ठेवायला?**
- **लेखन हे तरी मौनावस्थेत ध्यान लावून करायची गोष्ट आहे माझ्या मते.**
- **हायकू प्रकारच्या कवितांना ना... तसं संस्करण लागतं. त्यांना पुन:पुन्हा आकार द्यावा लागतो.**

अस्संऽऽ!! (वहीत लिहून घेतो.)

मुलाखतकर्ता : तो 'अचानक' उगाचच अतिरिक्त प्रकारचा शब्द होता खरा! गरज नव्हती त्याची. आता हे छापशील, तेव्हा तळटीप टाकशील की नाही? मला विचारून लिहिलंयस म्हणून? एकदोन प्रश्नोत्तरं झाली ना आपली इथवर येईपर्यंत?

जॅक केरुऑक : बरं, बेरिगननं दखल घेतलेली हायकू, एवढं बास ना? (लिहून ठेवतो)

मुलाखतकर्ता : तू बऱ्याच कविता लिहीत असशील? हायकूव्यतिरिक्त इतर प्रकारचं काव्यही लिहितोस?

जॅक केरुऑक : नाही रे, हायकू लिहायला अवघड असते. मी आपला लांबच लांब येड्या कविता लिहितो. रेड इंडियन येडछाप कविता? तुला ऐकायच्यात माझ्या येडछाप इंडियन कविता?

मुलाखतकर्ता : इंडियन म्हणजे कुठल्या?

जॅक केरुऑक : अरे, नेटिव्ह अमेरिकन टाईपच्या! इरक्वॉय! माझ्याकडे पाहिलंस तर कळेल *(ऑन द रोड आणि द धर्मा बम्स या दोनही पुस्तकांत नेटिव्ह अमेरिकन्स महत्त्वाची भूमिका निभावतात. त्यातील नायकांना त्यांच्या 'साक्षात्कारी क्षणापर्यंत पोचवण्यात त्यांचा मोठा सहभाग असतो. काहींनी म्हटलंय, केरुऑक जितका दाखवतो तितका क्रांतिकारी विचारांचा वगैरे नव्हताच. त्यानेही टिपिकल युरो- अमेरिकन चष्म्यातूनच इतर वर्णीयांकडे पाहिलंय. असो.)*

*(वहीतून वाचतो)*

**हिरवळीवरून दुकानाकडे जाताना**
**पंचेचाळीसवर्षीय (तो) शेजाऱ्यांना ऐकू येईलसं म्हणतोय**
**''आई गं, मला लागलं बघ. दुखतंय. विशेषत: त्या चिळकांडीमुळे.''**

मुलाखतकर्ता : क्काय?

जॅक केरुऑक : अरे... नीट ऐक

**बघ ना आई मला लागलं**
**आणि दुखतंय... मी दुकानांत चाललो होतो**
**पण हिरवळीवरून जाताना पडलो आणि मग आईला हाळी देत ओरडलो,**
**आईऽऽऽ, बघ नाऽऽऽ**

आणि मग मी त्यात भर घालत पुढे म्हटलंय, ''विशेषतः, त्या चिळकांडीमुळे.''

मुलाखतकर्ता : ओहो !तू त्या स्प्रिंकलरच्या कारंज्यावर पडलास वाटतं ... म्हणून चिळकांडी

जॅक केरुआॅक : नाही! माझ्या बापाची चिळकांडी आईत उडालेली....XXX

मुलाखतकर्ता : एवढ्या अंतरावरून?

एवढ्या अंतरावरून?

जॅक केरुआॅक : हात टेकले मी तुझ्यासमोर... माहिती होतं, नाहीच कळणार तुला .

*(वहीतून वाचून दाखवू लागतो).*

इथे गॉय चा अर्थ जॉय म्हणजे आनंद असा आहे तर ... *(बहुतेक नेटिव्ह अमेरिकन म्हणजेच रेड इंडियन तसा उच्चार करत असावेत.)*

मुलाखतकर्ता : जीन्सबर्गला पाठव ही कविता!

जॅक केरुआॅक : *(वहीतून पुढे वाचत...)*

**तथाकथित आनंदी मंडळी दांभिक असतात**
**म्हणजे आनंदाच्या तरंगदीर्घतेला फसवेपणाचे टेकू लागतातच**
**थोडंसं षड्यंत्र, काही थापा... किंचित लपवाछपवी**
**थोडा दांभिकपणा, आणि फसवेपणा असं सारं...**

यात (नेटिव्ह) इंडियन्स (बसत) नाहीत आणि त्यांचं (निरागस) स्मितहास्यही

मुलाखतकर्ता : इंडियन्स नाहीत? म्हणजे काय म्हणायचंय तरी काय?

जॅक केरुआॅक : तुला माझ्याबद्दलचा जो छुपा आकस आहे ना मनात, बेरिगन, त्याचं मुख्य कारण म्हणजे ते फ्रेंच - इंडियन युद्ध असणार *(जॅक स्वतः फ्रेंच-कॅनेडिअन आई-वडिलांना झालेला मुलगा होता.)*

मुलाखतकर्ता : असेलही तसं सारोयान. मी होरॅस मानच्या तळघरातला तुझा एक फोटो पाहिला होता एकदा. फुटबॉलसंदर्भातला होता बहुतेक. कसला जाड्या होतास रे तेव्हा.

स्टेला: टऽऽफी टऽफी, ये ग माझी मनीमाऊ

जॅक केरुआॅक : स्टेला, आम्हांला अजून एक दोन बाटल्या तरी दे ना, *(बराच वेळ बसू अजून बहुतेक)* हां! आता मला यांच्यापैकी कुणी सैल सोडलं ना, तर त्यांचा खून पाडणार आहे मी! अरे! तेव्हा प्रत्येक फुटबॉल गेमच्या आधी मी दोन-तीन **हॉट फज संडे** हाणायचो सहज! मग काय होणार! बूम! *(सुटलो आडवातिडवा!)* लू लिट्ल होता ना.

मुलाखतकर्ता : कोलंबिया युनिव्हर्सिटीत असतानाच तुझा कोच होता तो ना?

जॅक केरुआॅक : होय, लू लिट्ल माझा कोलंबियातला कोच. माझा बाप बरं का, त्याच्याकडे गेलो, आणि म्हणे ''काय रे लाम्बनाक्या, चोरटा, साळसूद आला मोठा, माझ्या पोराला का घेत नाही रे? आमचा टी जॉ *(जॅकचं घरगुती टोपणनाव)* आला आर्मीच्या टीममध्ये खेळायला, तर तुझं काय जातं रे हरामखोरा ? त्याला त्याच्या लॉवेलमधल्या दुष्मनाला धडा शिकवायचाय? येऊ दे की त्याला!'' मग लू लिट्ल म्हणाला, ''त्याची तयारी झाली नाहीये अजून! कसं घेणार?'' तर बाप म्हणतो कसा?'' कोण

म्हणतं तयारी नाही?'' (लू लिट्ल म्हणाला), ''कोण म्हणजे? मी म्हणतोय!,'' मग बाप भडकलाच. ''काय रे ए लाम्बनाक्या, केळ्यासारखं नाक घेऊन उगाच? तुझी हिम्मत? जा, तोंड काळं कर कुठंतरी मसणात!'' लूच्या ऑफिसातून पाय आपटत बाहेर आला, तोंडात ही भलीमोठी सिगार, बरं का? आणि मला म्हणाला, ''चल रे इथे नको थांबू! बाहेर पड आधी इथून!'' तर असे आम्ही दोघं कोलंबियातून बाहेर पडलो! आणि जेव्हा मी नेव्हीत होतो ना, युद्ध चालू होतं, १९४२ ची गोष्ट, तर तेव्हा सगळ्या ॲडमिरल बिडमिरल लोकांसमोर हा मला म्हणतो, ''जॅक, तुझंच बरोबर आहे! जर्मन आपले शत्रू नाहीत, ते मित्र आहेत! आणि हे येणारा काळ सिद्ध करेलच!'' अन ते सगळे ॲडमिरल अवाक् रे! तोंडाचा आ मिटेना त्यांचा! पण माझा बाप कुणाचं ऐकेल म्हणतोस काय? छे! शक्यच नाही! त्याच्याकडे असं काय होतं? एवढी हिम्मत कुठून यायची? तर काही नाही. हे भलं मोठं पोट! *(हातवारे करून पोटाचा आकार दाखवतो)* आणि ते घेऊन हा आपला धाडधड्डाम करत असा काही आविर्भाव आणायचा ना! *(इथे केरुऑक उभा राहून पोट जोरात अगदी तट्ट फुगवून मोठ्ठा स्फोटक आवाज काढत म्हणतो, धाडधड्डाम!)* एकदा बरं का, हा आणि माझी आई हातात हात घालून चालले होते. लोअर ईस्ट साइडला होते ते *(बहुतेक न्यू यॉर्क किंवा लॉवेल असेल, कळत नाही)* १९४० ची गोष्ट हं ... तर समोरून राबाई *(ज्यू धर्मगुरू)* साखळी करून आले. असे... हालत डुलत आपले. आता हा माझा बाप आणि त्याची बायको येतायत समोरून तर जागा देतील की नाही? पण छे! ते काही या माझ्या ख्रिश्चन बापाला भाव देईनात. तर हा लगेच धड्डम धाड फुटलाच की! त्यांच्यातल्या एका रॅबायला गटारात लोळवले न् मगच पुढे गेला आईला घेऊन!

- **हायकू लिहायला अवघड असते, मी आपला लांबच लांब येड्या कविता लिहितो.**
- **गद्य लिहिताना मी नेहमी म्हणतो, आता इथे कवितेसारखं काही गोलमाल नाही चालणार! मुकाट्यानं कथानकाचा गुंता सरळ करा आधी!**

बेरिगन, तुला आवडो नावडो, हीच माझी कहाणी आहे. असाच आमचा इतिहास आहे! आम्ही कुणाकडून काही बुलशीट घेत नाही ऐकून, मीही नाही घेणार, लिहून ठेव हवं तर...

बरं .. ही माझीच वाईन आहे ना?

मुलाखतकर्ता : ते 'द टाऊन ॲंड द सिटी'त उस्फूर्त रचनेच्या तत्त्वानुसार लिहिलंयस का?

जॅक केरुऑक : त्याचा काही भाग तसा लिहिलाय हो, साहेब! पण मी त्याची आणखी एक आवृत्तीही लिहिलीय.. फरशीखाली पुरून लपवून ठेवलीय ती! बरोजकडे सोपवलीय

मुलाखतकर्ता : हो, मी बऱ्याच अफवा ऐकल्यायत त्या पुस्तकाबद्दल! सगळ्यांना बघायचंय ते पुस्तक.

जॅक केरुऑक : ते म्हणजे 'ॲंड द हिप्पोज वेअर बॉएल्ड इन देअर टॅंक्स'! द हिप्पोज ... कारण मी आणि बरोज एकदा रात्री बारमध्ये बसलो होतो. आणि बातमीदार बडबडत होता . कायकाय ऐकू येत होतं... तर इजिप्तनं कुठंतरी हल्ला केला वगैरे... आणि तेवढ्यात बातमी आली की लंडनमधल्या प्राणिसंग्रहालयात मोठी आग भडकली आहे आणि पसरत गेली. आणि त्या आगीमुळे झू मधले हिप्पो अक्षरश: टॅंकमध्ये उकळले गेले! आता बातमीदार कसे बोलतात माहिताय तुला... ''आणि हिप्पोज

त्यांच्याच पाणथळीच्या जागेत उकळले, गुड नाईट ऑल!'' (कसलं सोयरसुतक नाही त्यांना. बडबडायचं फक्त). तर यातलं विडंबन बिल (विलियम बरोज) च्या तल्लख डोक्यात आलं. तसला उपहास, एकूणच बारकावे त्याला कळतातच.

मुलाखतकर्ता : तू टँजिए मध्ये असताना खरंच त्याचं पुस्तक – 'नेकेड लंच 'टाईप केलं होतंस?

*(या मोरोक्कोमधील शहरात आधी विलियम बरोज गेला. त्यानं मेक्सिकोमध्ये चुकून एका पार्टीत बायकोला गोळी मारली आणि ती गेली. कुठला तरी खेळ खेळताना ही दुर्घटना घडली. तर तिथून पळून तो मोरोक्कोमध्ये आला असताना त्याला भेटायला पुस्तक लिहिण्यास मदत करायला जॅक गेला होता. एकच महिना राहिला.)*

जॅक केरुऑक : नाही. फक्त पहिला भाग. पहिली दोन प्रकरणं मी टाईप केली. अरे, तिथं झोपायला पाहिलं तर वाईट स्वप्नं पडायची रे! तोंडातून काय काय ते बलोन सॉसेजेस बाहेर येतायत असली... विचित्र! ते त्याचं पुस्तक टाईप कारण हेच एक दुःस्वप्न म्हण ना! तर मी म्हणायचो बिल! (मला नाही जमत हे) तर तो म्हणायचा कर टाईप मुकाट्यानं! मी तुझ्यासाठी, च्या मारी, इथं उत्तर आफ्रिकेत असूनसुद्धा केरोसीनचा स्टोव्ह आणलाय! तर त्या अरबांना तिकडं मिळत नाही सहसा तसला स्टोव्ह... म्हणून विशेष गोष्ट ती! मी तो पेटवायचो आणि मग झोपायला काहीतरी बेडिंग *(इथं बहुतेक त्याच्या इतर छंदांचाही रेफरेंस असू शकतो. पण तितका स्पष्ट नाही)*, पॉट असायचं तिकडे त्याला कैफ म्हणायचे... किंवा मग हशीश घ्यायचो... तिकडं हे सगळं कायदेशीर आहे बरं का, चालतं. आणि मग टक टक टक टक... चालायचं... मग झोपायला पाहिलं तर... तोंडातून काय काय बाहेर येतंय, असं वाटायचं... मग शेवटी ते सगळे कोण कोण आले.

तिथं ॲलन जीन्सबर्ग... अन् त्यांनी सगळा बट्ट्याबोळ केला त्या लिखाणाचा. बरोजला हवं होतं तसं टाईप नाही केलं त्यांनी.

मुलाखतकर्ता : ग्रोव्ह प्रकाशन त्याची बरीच पुस्तकं – म्हणजे ऑलिम्पिक प्रेसची होती ती, आता बदल करून, त्यात भर घालून प्रसिद्ध करतेय, म्हणे.

जॅक केरुऑक : अं ... माझ्या मते ना, बरोजनं आपल्या भग्न हृदयांना रिझवेल असं 'नेकेड लंच' सारखं काही नंतर लिहिलंच नाही. काही तरी 'ब्रेक अप' नावाचा प्रकार करतो म्हणे. म्हणजे एका पानावर कायतरी गद्य लिहायचं, मग दुसऱ्या पानावर लिहायचं, ते दुमडायचं बरं का, आणि मग कापायचं आणि जोडायचं. अरे, काय बकवास आहे हा!

मुलाखतकर्ता : मग 'जंकी'बद्दल काय मत आहे तुझं?

जॅक केरुऑक : हां! ते मात्र अभिजात साहित्यकृती म्हणावसं आहे! हेमिंग्वेसारखं. किंवा त्याहूनही सरसच म्हणेन मी! त्यात एक असा प्रसंग आहे बरं का, डॅनी एका रात्री माझ्या घरी आला आणि म्हणाला, ''विल्यम, मला तुझा सॅप दे बरं जरा!'' सॅप म्हणजे काय माहितीये ना तुला?

सारोयान : सॅप म्हणजे ते ब्लॅकजॅक ना? *(सॅप किंवा ब्लॅक हे एक स्वसंरक्षणासाठी बाळगायचं शस्त्र.)*

जॅक केरुऑक : हो, ब्लॅकजॅकच. तर बिल म्हणतो, मी माझा अगदी तळातला ड्रॉवर उघडला आणि सगळ्या नव्याकोऱ्या शर्टांखाली असलेलं ब्लॅकजॅक बाहेर काढलं. डॅनीला म्हटलं, आता हरवू नकोस हे डॅनी!. डॅनी म्हणाला, अजिबात नाही हरवणार, तू मुळीच काळजी करू नको! आणि अर्थातच बाहेर गेला नं ते हरवून टाकलं!

सॅप ब्लॅकजॅक ... म्हणजेच मी... सॅप ब्लॅकजॅक

मुलाखतकर्ता : अरे, ही तर हायकू झाली. सॅप ब्लॅकजॅक ... म्हणजेच मी... सॅप ब्लॅकजॅक, लिही लिही. लिहून ठेव ती!

जॅक केरुआॅक : नाही!

मुलाखतकर्ता : बरं, मग मी लिहितो! चालेल ना, मी ही ओळ कुठे वापरली तर?

जॅक केरुआॅक : घाल तुझ्या ह्याच्यात आणि पेटवून दे!

मुलाखतकर्ता : छे! तुझा ना, मुळी सहयोगतत्त्वावर विश्वासच नाही! कधी मिळून काम केलं आहेस कुणाबरोबर? प्रकाशक सोडून?

जॅक केरुआॅक : बिल कनॅस्ट्राच्या लॉफ्टमधे... केलंय ना मिळून काम... काही ब्लॉन्ड पोरींवर.

मुलाखतकर्ता : तो तोच का? सबवे ट्रेनमधून उडी मारून उतरणारा? ऍस्टर प्लेस 'होम्स गो' मधला? *(या घटनेदरम्यान हा बिल मेला.)*

जॅक केरुआॅक : हो हो, तोच. तर तो एकदा मला म्हणतो, ''आपण सगळे कपडे काढून रस्त्यावरून पळू या चल!'' पाऊस पडत होता बरं! सिक्सटीन्थ स्ट्रीट, सेव्हन्थ अवेन्यू. मी म्हटलं, ''मी तर बाबा निदान शॉर्ट्स तरी ठेवणार अंगावर...'' तर हा म्हणाला, ''बरं, पण मी एकही घालणार नाहीये!'' आणि मग आम्ही दौडत गेलो की रस्त्यावरून तसेच! सिक्स्टीन्थ स्ट्रीट ते सेव्हन्टीन्थपर्यंत! आणि मग धावत जिना चढून वर आलो! कुणी पाहिलं नाही आम्हांला!

मुलाखतकर्ता : किती वाजले होते तेव्हा?

जॅक केरुआॅक : पहाटेचे ३ का ४ ... पण अरे, पूर्ण नागडा होता तो. आणि हा पाऊस पडत होता. सगळे होते तिथं ... आणि हा फुटलेल्या काचांवर नाचत होता. 'बाख' वाजवत... हा बिल ना... कधी कधी छपरावरून घरंगळत जायचा. सहा जिने होते त्या इमारतीला, इतक्या उंचावरून, बरं! आणि आम्हांला विचारणार. ''पडू का मी? पडू?'' आणि आम्ही आकांतानं ''नको नको, बिल!'' ओरडायचो तो इटालियन होता. ते असेच असतात जंगली रासवट!

मुलाखतकर्ता : तोही लेखक होता का? काय, करायचा काय, हा प्राणी?

जॅक केरुआॅक : कधी मला म्हणायचा, ''जॅक, ये माझ्याबरोबर! आपण या पीपहोलमधून बघू या मज्जा'' आणि मग आम्ही त्याच्या पीपहोलमधून काय काय गमती बघत असायचो! कधी काही बाथरूममध्येसुद्धा! मी म्हणायचो, ''मला यात मुळीच रस नाहीये बिल!'' आणि तो वैतागून म्हणायचा, ''तुला कशातच रस नसतो!'' कधी कधी दुसऱ्या दिवशी ओडेन यायचा. दुपारी कॉकटेल्सचा कार्यक्रम व्हायचा. मग! तो बरोबर चेस्टर कलमनला आणायचा, टेनेसी विल्यम असायचा...

मुलाखतकर्ता : मग तेव्हा नील कसॅडी पण होता का? तू या बिल कनॅस्ट्राबरोबर असायचास तेव्हा नीलची ओळख झाली होती?

जॅक केरुआॅक : हो हो, अर्थात. अं... त्याच्याकडे पॉट असायचा ना. तो म्हणजे पॉटवाला आनंदी गडी होता आमचा.

मुलाखतकर्ता : नील लिहीत का नाही? काय मत आहे तुझं याबद्दल?

जॅक केरुआॅक : लिहिलंय, अरे, त्यानं! सुरेख लिहितो तो. माझ्यापेक्षा छान! नील ना... जरा गंमतशीर प्राणी आहे... खरा अस्सल कॅलिफोर्नियन! धमाल करायचो आम्ही! पेट्रोल पंपावरच्या कामगारांना जितकी मजा येत असेल ना. तशा पाच हज्जार लोकांपेक्षा जास्त मजा आम्ही केलीय!

*(जॅकच्या भटकंतीचा याच्याशी काहीतरी संबंध आहे. त्यावेळी ते पेट्रोल पंपावर थांबायचे, पेट्रोल भरून पुढे जायचे, कधी तिथंच झोपायचे.. वगैरे वगैरे... आता त्यामुळे त्याला पेट्रोल स्टेशनवरचा माणूस सगळ्यात नशीबवान, मज्जा करणारा वाटायचा का? काही ऐकलं तर नाही. 'द रोड'मध्ये काहीतरी उल्लेख आहे बहुतेक त्या भटकण्याचा. page 32 of On the Road : Under a tremendous old tree was a bed of green lawn-grass belonging to a gas station. I asked the attendant there if I could sleep there, and he said sure)*

मला भेटलेला सगळ्यात बुद्धिमान माणूस कोण असेल तर तो नील कसॅडी! अगदी पक्का ख्रिश्चन बरं का! कॉयरमध्ये गायचा तो, माहितीये! डेन्वरच्या कॅथॉलिक चर्चमध्ये! आणि आज दैवी शक्तीबद्दल म्हणून मला जे काही माहिती आहे असं मी समजतो ना किंवा जे काय असेल नसेल ते... ते सगळं मला त्यानंच शिकवलंय.

मुलाखतकर्ता : आणि एडगर केस... त्याचं काय?

जॅक केरुऑक : नाही... एडगर केसबद्दल त्याला माहिती व्हायच्या आधी, जो काही आयुष्याचा हिस्सा त्यानं माझ्याबरोबर घालवला, म्हणजे त्या भटकंतीत माझ्या वाट्याला आला, तेव्हा मला सांगितलंय हे त्यानं (एडगर केसकडून नील पौर्वात्य तत्त्वज्ञान शिकला). तर आम्ही रोड ट्रिपवर असायचो आणि नील म्हणे, ''देव आहे, हो की नाही जॅक? आपल्याला माहिताय!'' मग मी म्हणायचो, ''यस्सर! आहेच तो!'' मग तो म्हणे, ''काहीही वाईट होणार नाही आपलं. बरोबर? तो आहे!'' आणि मग आम्ही जात राहायचो पुढे पुढे हुम्म्म्म या बुम्म्म्म करत *(बहुतेक कार ड्रायव्हिंग इंडिकेट केलंय इथे)* तो ना, अक्षरश: परिपूर्ण पुरुष होता. म्हणजे नेहमीच. तसाच आहे तो. अजुनी कधी भेटतो ना आम्ही, तेव्हा त्याच्या समोर एक शब्द जास्तीचा उच्चारायची टाप नसते माझी!

मुलाखतकर्ता : तू तो फुटबॉल खेळायचा त्याचं वर्णन केलं आहेस 'व्हिजन ऑफ कोडी'मध्ये, नाही का?

जॅक केरुऑक : हो तो चांगला खेळाडू होता. त्यानं दोन बिटनिक्सना पकडले. जीन्स घातलेले दाढीवाले पाहून. याला खात्री की ते याच्याचसारखेच म्हणून! *(Wikipedia: Beatniks were members of a social movement in the mid-20th century, who subscribed to an anti-materialistic lifestyle. They rejected the conformity and consumerism of mainstream American culture and expressed themselves through various forms of art, such as literature, poetry, music, and painting. They also experimented with spirituality, drugs, sexuality, and travel.)*

- **बरोजनं आपल्या भग्न हृदयांना रिझवेल असं 'नेकेड लंच' सारखं काही नंतर लिहिलंच नाही. काही तरी 'ब्रेक अप' नावाचा प्रकार करतो, म्हणे. म्हणजे एका पानावर कायतरी गद्य लिहायचं, मग दुसऱ्या पानावर लिहायचं, ते दुमडायचं बरं का, आणि मग कापायचं आणि जोडायचं. अरे काय बकवास आहे हा!**

तर हे नॉर्थ बीच सॅन फ्रान्सिस्कोमध्ये झालं, बरं का! हा तेव्हा रेलरोडवर काम करायचा. हा त्यांना म्हणतो, ''मला जायचंय, फटाफट चला, पटापट मला घेऊन! अरे सव्वादोन वाजले, मला दोन-

वीसला तिथं पोचलं पाहिजे ना! चला! अरे त्या ट्रेनवर जायचंय तिथून ते कुठं बरं, हां! सॅन होजेला ट्रेन पोचवायचीय वेळेत जावं लागत बरं! चला चला. पोचवा मला. ड्राइव्ह कराल ना? चला लवकर!'' तर ते दोघे म्हणाले, ''जरूर जरूर, पोरा! जाऊ या की!'' तर नील म्हणतो, ''हां! हे कसं! हा घ्या पॉट! मारा दम!'' ते मग म्हणाले, ''आम्ही आमच्या भल्यामोठ्या दाढ्यांमुळे तुला तुझ्यासारखेच महान लोक वाटलो नाही का? बिटनिक्स? पण आम्ही पोलीस आहोत! कळलं? आणि तुला आम्ही अटक करतोय! आला मोठा!''

मग काय गेला तुरुंगात! मग न्यू यॉर्क पोस्टच्या एकानं तिथं त्याची मुलाखत घेतली, बरं का! तर याचा मला निरोप, ''त्या केरुऑकीला म्हणावं, तुला जर माझ्याबद्दल अजून काही वाटत असेल तर एक टाईपरायटर पाठव मला!'' मग मी ॲलन जीन्सबर्गला शंभर डॉलर पाठवले बुवा आणि नीलला तो टाईपरायटरही मिळाला एकदाचा! त्यानं त्यावर टिपण लिहायला सुरुवात तर केली, पण ते लोक ना, त्याला ते लिहिलेलं बाहेर काही पाठवू देईनात! आता तो टाईपरायटर कुठेय, मला काहीच माहिती नाही... तो आमचा गेनेटही तसाच, बघ. ते 'आवर लेडी ऑफ द फ्लॉवर्स' त्या तसल्या हागिरड्या जागेत– तुरुंगातच तर लिहिलं त्यानं! आख्खं लिखाण तिथेच. तो एक महान लेखक ज्याँ जेने ... तो एक ना सतत म्हणजे अखंड लिहीतच असायचा. इतका की लिहितालिहिता संपून जाईल... अक्षरशः अंथरुणाला खिळेपर्यंत... अगदी खतम होईपर्यंत लिहीत राहिला पठ्ठ्या. शेवटी फ्रेंच तुरुंगातही लिहीतच राहिला. प्रत्येक भाग, प्रत्येक प्रकरण हे मरमरून लिहिलं त्यानं. मरेस्तोवर लिहिलं. आणि मग संपला खेळ.. सार्त्रनं दखल घेतली, हां, पण त्याची. हे नमूद केलंच पाहिजे. महत्त्वाचं आहे...

मुलाखतकर्ता : ती त्याचीही एक वेगळीच उस्फूर्त शैली म्हणता येईल का?

जॅक केरुऑक : अं... मीही तुरुंगात राहून लिहू शकलोच असतो तसा रोज रात्री बसून, आपलं राजा बबड्या सोन्या असल्या गोष्टी... सुंदर असतं तेही, पण ना गेनेट हा सगळ्यात प्रामाणिक लेखक म्हणेन मी.. म्हणजे केरुऑक आणि बरोजनंतर तोच अस्सल लिहिणारा म्हणावा लागेल ... म्हणजे तो माझ्याआधी आला अर्थात. माझ्यापेक्षा मोठा. बरोजच्या वयाचा आहे तो. मीही कधी अप्रामाणिक नव्हतो... पण ना, तुला सांगतो... च्यायला, मी मजा केलीये आयुष्यात. स्वच्छंद फिरलो या देशात, मोकळा अगदी... तसं गेनेटचं नाही मात्र... त्याचं म्हणजे शोकात्म सुंदर लिखाण म्हणावं लागेल... त्यामुळे तो लेखनासाठीचा सरताज मी त्यालाच देईन... आणि ते सन्मानार्थ पुष्पचक्र–बिक्र काय जे असेल, तेही त्यालाच. ते त्या रिचर्ड विल्बरलाही जात नाही आणि रॉबर्ट लॉवेललाही नाही. अं हं! ते आमच्या गेनेटलाच, नंतर बरोजलाही देता येईल. शिवाय ॲलन जीन्सबर्ग, हं, आणि विशेषतः ग्रेगरी कॉरसोला पण!

मुलाखतकर्ता : जॅक, पीटर ओर्लोवोस्कीबद्दल काय वाटतं तुला? त्याचं लिखाण आवडतं ?

जॅक केरुऑक : पीटर ओर्लोवोस्की माठ आहे. रशियन माठ ... खरं तर रशियन पण नाही, तो पोलिश माठ आहे.

मुलाखतकर्ता : पण त्यानं तर काही सुरेख कविता लिहिल्यायत ...

जॅक केरुऑक : अरे वा! खरं की काय? तेच्यायला... कसल्या कविता रे?

मुलाखतकर्ता : 'सेकंड पोएम' नावाची कविता आहे त्याची.

जॅक केरुऑक : हो का? माझा भाऊ गाडीत मुतलेला... आणि मी चाललो आता सबवेला... जिथे कुणी दोघे चुंबनात रमलेले... हीच का?

मुलाखतकर्ता : नाही रे... ती नाही का... भूमी रंगवायला ती झाडून काढण्यापेक्षा जास्त सर्जनशीलता लागते.

जॅक केरुआॅक : किती हागरेपणा करावा माणसानं खरंच!!! ही काय कविता आहे... हे त्या दुसऱ्या माठासारखंच आहे. तोही पोलिशच होता, काय नाव बरं त्याचं ... अपॉलनेअर का काहीतरी. माथेफिरूच होता. पण मला ना... माथेफिरू आवडतात. त्यांच्या कविताही आवडतात... हो! कळलं ना तुला, बेरिगन ? हो! आवडतात मला! पण माझी अभिरुची विचारशील तर ती मात्र ग्रेगरीलाच झुकतं माप देईल, बघ!

ए! ते मला दे की एक!

मुलाखतकर्ता : काय? या गोळ्या? तुला हव्यात?

जॅक केरुआॅक : हो! दे ना! काय म्हणायचं यांना? फोर्कड क्लॅरीनेट्स ? *(इथे ग्रेगरीच्या कवितेतील शब्द प्रयोग आहे. त्याच्या एका कवितेत मुलीचा अनुनय करताना जर नेहमीच्या रूढ प्रथा न वापरता म्हणजे डिनर-मुव्ही असे डेटिंगचे प्रकार नाहीत. भयानक पद्धतीने - स्मशानात घेऊन गेलो, बाथटबमधले वेअरवूल्फ, आणि बहुतेक ड क्लॅरीनेट्स -चिरफाटलेल्या सनया - म्हणजे भयानक आवाज करणाऱ्या? कळत नाही. पटवायचा प्रयत्न केला तर ती राजी होईल का? तिचे आईवडील काय करतील? मग मी तसाच बिनलग्नाचा राहिलो तर... अशा आशयाची मॅरेज नावाची कविता आहे. एकूणच बीट जनरेशन ही रूढींना फेकून देऊ पाहणारी होती. त्यातूनच ही सगळी साहित्यनिर्मिती!)*

मुलाखतकर्ता : नाही, याला ओबिट्रोल म्हणतात. नीलनं सांगितलं मला. त्यानं सवय लावली

जॅक केरुआॅक : ओव्हरटोन्स ?

मुलाखतकर्ता : ओव्हरटोन्स ? नाही... ओव्हरकोट्स!!

सारोयान : ते काय बरं म्हणलंयस तू? ग्रोव्ह अँथॉलॉजीच्या शेवटी? तू एखादी ओळ मुद्दाम लांबवतोस.. म्हणजे मग तिच्या शेवटी शेवटी गूढ प्रतिमा उमटतात असं काहीतरी.

जॅक केरुआॅक : हा बघ खरा आर्मेनियन! कसा विचारतोय ... कसं आहे, आहे ना... चिखल... गाळ ... दलदल हे ज्या 'त्रिभुज प्रदेशात' असतील ना तिथून... त्या अस्सल तळागाळातून कवितेचा उगम होतो बघ ... *(बहुतेक असं म्हणायचं आहे. आर्मेनियन विस्थापित होते. जिनोसाईडला घाबरून निर्वासित झालेले. एरम सारोयान आर्मेनियन होता)*

हे बघ...

'रस्त्यावरून जाताना

- **मला भेटलेला सगळ्यात बुद्धिमान माणूस कोण असेल तर तो नील कसॅडी! अगदी पक्का ख्रिश्चन बरं का! कॉयरमध्ये गायचा तो माहितीये! डेन्वरच्या कॅथॉलिक चर्चमध्ये! आणि आज दैवी शक्तीबद्दल म्हणून मला जे काही माहिती आहे असं मी समजतो ना किंवा जे काय असेल नसेल ते... ते सगळं मला त्यानंच शिकवलंय.**
- **तो एक महान लेखक ज्याँ जेने ... तो एक ना सतत म्हणजे अखंड लिहीतच असायचा. इतका की लिहिता लिहिता संपून जाईल... अक्षरशः अंथरुणाला खिळेपर्यंत... अगदी खतम होईपर्यंत लिहीत राहिला पठ्ठ्या. शेवटी फ्रेंच तुरुंगातही लिहीतच राहिला.**

एक तळं दिसलं. तिथं लोक माझा पार्श्वभाग कापून घेत होते
ते १७००० पाद्री जॉर्ज बर्न्ससारखे गाणारे' (हा गायक, कॉमेडियन डान्सर होता)
आणि मग पाहा लिहायचं ...
'मी माझ्यावरच विनोद करतोय
आता माझीच हाडं पुरतोय या जमिनीत
आणि आता मी ग्रेट अमेरिकन जॉन होणारे!'
'येतोय मी परत जमिनीवर'
आणि मग आपण आधी कुठे होतो हे आठवायचं आणि मग बोंबलायचं
'अहाहा टा डा टा डा टा डा टा डा.... त्या टर्कीच्या मायला!' *(अर्मेनिया आणि टर्कीचं युद्ध झालं होतं म्हणून असेल? )*

बघ... कविता संपवताना शेवटची कळीची ओळ आठवली की नाही! मध्यावर भरकटायला होतं... पण शेवटी आठवतं.

सारोयान : खरंच!

जॅक केरुऑक : गद्य आणि पद्य दोन्हीला हे लागू होतं .

मुलाखतकर्ता : पण गद्यात आपण कथाकथन करत असतो ना... *(हे खरं तर जॅकच आधी म्हणालाय)*

जॅक केरुऑक : गद्यात आपण परिच्छेद करतो ना. प्रत्येक परिच्छेद ही एक कविताच असते.

मुलाखतकर्ता : आणि ते गेर्टरूड स्टाईनचं लिखाण? ते आवडतं तुला?

जॅक केरुऑक : नाही तितकंसं आवडलं कधी... मला 'मेलानकथा'चं आवडतं थोडंफार... मी ना खरं तर शाळेत जाऊन पोरांना शिकवलं पाहिजे. का सांगू.. या ज्या गोष्टी आहेत ना मला माहिती असलेल्या, त्या शिकता येत नाहीत शाळेत वगैरे! त्याच्यासाठी तुमचा बाप माझ्या बापासारखा भंकस असावा लागतो!

- **पीटर ओर्लोवोस्की माठ आहे. रशियन माठ ... खरं तर रशियन पण नाही, तो पोलिश माठ आहे.**
- **कसं आहे, आहे ना... चिखल... गाळ ... दलदल हे ज्या 'त्रिभुज प्रदेशात' असतील ना तिथून... त्या अस्सल तळागाळातून कवितेचा उगम होतो बघ ...**

मुलाखतकर्ता : ते न्यू इंग्लंडमध्ये जन्मलेल्यांना जमतं फक्त! तसल्या बापांच्या घरी जन्म घेणं.

जॅक केरुऑक : बरं, माझा बाप म्हणाला होता, म्हणजे त्याचं मत होतं की तुझा बाप मात्र भंकस नव्हता हं!

सारोयान : मलाही नाही वाटत माझा बाप भंकस होता म्हणून...

जॅक केरुऑक : माझा बाप म्हणायचा... ''तो विलियम सारोयान ... तो अजिबात भंकस माणूस नाहीये! पण तो ना एकदम हागीरडा आहे!'' मी खूप भांडलोय त्याच्याशी यावरून, बरं! पण ना ते 'डेरिंग यंग मॅन ऑन द ट्रॅपीझ' होतं ना... ते मात्र भंकस आहे हं!

सारोयान : अरे, तेव्हा वय काय होतं त्याचं ... किती लहान पोऱ्या होता तो तेव्हा!

जॅक केरुऑक : हो... पण त्याच्यात ना एक अशी वखवख होती. भूक! तिथं टाइम्स स्क्वेअर मध्ये... ट्रॅपीझवरून झुलत, उडत. बाप रे! काय सुंदर गोष्ट रे ती! लहानपणी भारी आवडायची मला.

जीव टाकायचो मी त्यावर!

मुलाखतकर्ता : तुला विल्यम सारोयानची ती गोष्ट माहीत असेल ना? एका गावात एक नेटिव्ह अमेरिकन येतो... आणि तो एक कार भाड्यानं घेऊन एका लहान मुलाला ती चालवायला देतो, बघ, ती गोष्ट..

स्टेला : हं, ती कॅडिलक.

जॅक केरुआॅक : कोणतं गाव असतं ते?

सारोयान : फ्रेस्नो ... फ्रेस्नो गावातली गोष्ट.

जॅक केरुआॅक : बरं ... असेल. तुला ती रात्र आठवतेय का? मी गाढ झोपेत होतो. आणि तू माझ्या खिडकीबाहेर! पांढऱ्या घोड्यावर बसून आला होतास...

सारोयान : द समर ऑफ द ब्युटिफुल व्हाईट हॉर्स.

जॅक केरुआॅक : आणि मी खिडकीबाहेर पाहिलं, आणि म्हटलं, हे काय चाललंय? तर तू म्हणालास, माझं नाव एरम, आणि मी बघ पांढऱ्याशुभ्र घोड्यावरून आलोय.

सारोयान : अरे, तो तर मुराद.

जॅक केरुआॅक : बरं, चुकलं ... तू म्हणालास, माझं नाव मुराद! बरोबर? नाही रे! असं नव्हतं काही! मी एरम होतो आणि तू मुराद!. तू मला म्हणालास, चल ऊठ, जागा हो आणि मला तर अजिबात उठायचं नव्हतं... मला झोपून राहायचं होतं... अरे 'माय नेम इज एरम' हे तर त्या पुस्तकाचं नाव ना! तू एका शेतकऱ्याकडून... आणि तू मला उठवलंस ना... तुझ्याबरोबर घोडेस्वारीला जायचं म्हणून! असंच झालं होतं! हां!

सारोयान : अरे नाही बाबा! त्या मुरादनं, त्या मूर्खानं घोडा चोरलेला... मी नाही!

जॅक केरुआॅक : ए, हे काय दिलंयेस रे तू मला?

सारोयान : ओबेट्रोल!

जॅक केरुआॅक : ओऽऽ ओबीज आहेत होय!

मुलाखतकर्ता : बरं .. ते जाऊदे आता सारोयान, हेमिंग्वे , आणि वूल्फ वगैरे जाऊ देत... जॅझ आणि बॉपचा काय आणि कसा प्रभाव होता तुझ्यावर?

जॅक केरुआॅक : हां जॅझ आणि बॉप ... तर तो टेनरच्या पट्टीत गाणारा कसा.. असा श्वास ओढून घेत रोधून ठेवतो, आणि मग प्राणपणाने तो तुकडा त्या सॅक्सोफोनमध्ये फुंकत उमटवतो! अगदी दम निघेपर्यंत. आणि हे जेव्हा घडतं ना, तेव्हा त्यानं त्याची एक स्टेटमेंट केलेली असते, बघ. आपली बाजू जगासमोर मांडलेली असते. तसंच.. मी माझी वाक्यं अशीच श्वासांच्या तुकड्यांत विभागतो. माझ्या मनोव्यापाराचे श्वासांनी विलग केलेले तुकडे... श्वासांच्या लयीत मोजलेली त्यांच्यातली अंतरे... मी ही थेअरी मांडली. श्वास हे मापक वापरून ती रचलेली लयदार वाक्यं, ही माझी कल्पना. तो ओल्सन – काय म्हणतो, ते सोड. ही थेअरी मी मंडळी, बरोज आणि जीन्सबर्गच्या सांगण्यावरून १९५३ मध्ये मांडली. त्यात मग जॅझचा बेफाटपणा, रासवटपणा , त्यातला हर्षविनोद ... सगळं उतरलं, बघ. आणि मग ते विश्लेषण आणि काय काय.. ते नाही का... जेम्स खोलीत शिरला आणि त्यानं सिगारेट पेटवली. त्याला वाटलं, जेनला हा फारच संदिग्ध इशारा वाटेल की काय .. वगैरे असलं रटाळ गुऱ्हाळ... तर ते तसलं काय नसतं आमच्यात. हो! सारोयान, बोलायचं तर तो मला मी पौगंडावस्थेत असताना आवडायचा. टीनएजर म्हणून काही आवडी असतात ना... त्यानं मला एकोणिसाव्या शतकातून खेचून

बाहेर काढलं, म्हणेन मी. ज्या गाळात फसलो होतो ना... काहीतरीच वाचत बसलेलो... त्यातून त्यानं मला ओढून वर आणलं. त्याची विनोदबुद्धी असेल का अजून काय, मला माहिती नाही, पण त्यानंच वाचवलं मला. त्याचा तो रुबाब, तो आर्मेनियन बाज, म्हण, का काय म्हण .. आता हेमिंग्वेही मला मोहवून टाकायचाच हं . त्या स्वच्छ पांढऱ्या कागदावरचे त्याचे शब्दांचे मोती माझ्यासमोर असं काही हुबेहूब चित्र उभं करायचे, ना! .. पण वूल्फ! अरे बापरे, ते अमेरिकन वादळच म्हण, च्यामायला. त्याच्यामुळे मला अमेरिका हाच मुळी एक विषयकेंद्र म्हणून दिसायला लागला.. अगदी लख्खपणे.

मुलाखतकर्ता : आणि चित्रपट? त्यांचाही काही परिणाम असेलच?

जॅक केरुऑक : हो तर! तसा आपल्या सगळ्यांवर सिनेमाचा प्रभाव असतोच. माल्कम कौली एकदा म्हणाला, बरं का! तो तसा तीक्ष्ण आकलन असलेला माणूस आहे, हं! तर म्हणाला की 'डॉक्टर सॅक्स'मध्ये सारखा सारखा लघवीचा उल्लेख आहे! आणि ते साहजिकच आहे, कारण बघ, ते लिहायला मला अशी नीट जागाच नव्हती! मी ते लेखन टॉयलेट सीटवर बसून केलंय! मेक्सिको सिटीत एका टाइल्स लावलेल्या छोट्या टॉयलेटमध्ये. कारण माझ्या अपार्टमेंटमध्ये इतके कोण कोण असायचे. मग त्यांच्यापासून सुटका हवी तर टॉयलेटमध्येच जावं लागायचं! त्या लिखाणाची शैलीही बघ, अशी भ्रमिष्ट तारेत असल्यासारखी आहे. कारण का, सांग! मी ते 'पॉट'वर बसून लिहिलं ना! हा हा हा! कसा वाटला हा श्लेषविनोद? आवडला की नाही! हाहाहा!

मुलाखतकर्ता : आता जरा झेन तत्त्वज्ञानाच्या प्रभावाबद्दल सांगशील?

जॅक केरुऑक : मला खऱ्या अर्थानं भारावून टाकलं असेल तर ते महायान बुद्धाच्या तत्त्वज्ञानाने! प्राचीन भारतातील गौतम... म्हणजे स्वतः; बुद्ध ... शाक्यमुनी हे फार प्रभावी ठरले माझ्या बाबतीत. हे बुद्धाचं, किंवा बोधिसत्त्व म्हण, तत्त्वज्ञान चीन, जपानमध्ये गेल्यानंतर त्याचं रूपांतर झेनमध्ये झालं. म्हणजे जे काही त्या सगळ्या प्रवासातून उरलं त्याला आपण झेन म्हणतो. आता झेनमधलंदेखील ज्या भागानं मला, म्हणजे माझ्या लिखाणाला खरोखर प्रभावित केलं, ते हायकूमध्ये दिसून येणारं झेन तत्त्वज्ञान. तुला म्हटलं तसं, तीन ओळींत, सतरा उच्चारांत मावणारं, शेकडो वर्षांपूर्वी बाशोसारख्या लोकांनी लिहिलेल्या संक्षिप्त कविता त्या! हं, त्या बाशोंवर अशी एक सरळ लाईन असते, बरं का... लिहिताना लक्षात ठेव! शिकी हे अलीकडचे महाभाग – तेही मास्टर्सच. छोटसंच वाक्य अतीव गोड वाटणारं, त्यातून एखादा अनवट विचार अचानक उसळी मारून समोर उभा ठाकतो... हायकू अशी असते. स्वत:लाच आश्चर्यचकित करून सोडणारी. खूप स्वातंत्र्य आणि मजा असते यात. मन असं हलत झुलत फांदीवरच्या पक्ष्यासारखं घरंगळत जातं, तसंच वाटतं वाचताना... पण मी अंगीकारलेलं बौद्ध तत्त्वज्ञान, म्हणजे गंभीरपणे लिखाणात ओवलेलं जे तत्त्वज्ञान आहे, ते प्राचीन भारतातून घेतलेलं म्हणावं लागेल. आणि ते धार्मिक आहे, त्यात कळकळ आहे, ते किंचित भाबडंही असेल. या बाबतीत जवळजवळ

- **तो टेनरच्या पट्टीत गाणारा कसा.. असा श्वास ओढून घेत रोधून ठेवतो, आणि मग प्राणपणाने तो तुकडा त्या सॅक्सोफोनमध्ये फुंकत उमटवतो! अगदी दम निघेपर्यंत. आणि हे जेव्हा घडतं ना, तेव्हा त्यानं त्याची एक स्टेटमेंट केलेली असते, बघ. आपली बाजू जगासमोर मांडलेली असते. तसंच.. मी माझी वाक्यं अशीच श्वासांच्या तुकड्यांत विभागतो.**

- **तो मला मी पौगंडावस्थेत असताना आवडायचा. टीनएजर म्हणून काही आवडी असतात, ना... त्यानं मला एकोणिसाव्या शतकातून खेचून बाहेर काढलं, म्हणेन मी. ज्या गाळात फसलो होतो, ना... काहीतरीच वाचत बसलेलो... त्यातून त्यानं मला ओढून वर आणलं. त्याची विनोदबुद्धी असेल का अजून काय, मला माहिती नाही, पण त्यानंच वाचवलं मला. त्याचा तो रुबाब, तो आर्मेनियन बाज म्हण, का काय म्हण .. आता हेमिंग्वेही मला मोहवून टाकायचाच, हं. त्या स्वच्छ पांढऱ्या कागदावरचे त्याचे शब्दांचे मोती माझ्यासमोर असं काही हुबेहूब चित्र उभं करायचे ना! .. पण वूल्फ! अरे बापरे, ते अमेरिकन वादळच म्हण, च्यामायला. त्याच्यामुळे मला अमेरिका हाच मुळी एक विषयकेंद्र म्हणून दिसायला लागला.. अगदी लख्खपणे.**
- **आपल्या सगळ्यांवर सिनेमाचा प्रभाव असतोच. माल्कम कौली एकदा म्हणाला, बरं का! तो तसा तीक्ष्ण आकलन असलेला माणूस आहे, हं! तर म्हणाला की 'डॉक्टर सॅक्स'मध्ये सारखा सारखा लघवीचा उल्लेख आहे! आणि ते साहजिकच आहे, कारण बघ, ते लिहायला मला अशी नीट जागाच नव्हती! मी ते लेखन टॉयलेट सीटवर बसून केलंय!**

कॅथॉलिसिझमसारखंच म्हण ना! मूळ बौद्ध तत्त्वज्ञान सांगतं की तुमच्या हृदयात जाणीवपूर्वक आणि अखंड करुणा असू द्या... बंधुभाव, 'परमित् दान' म्हणजेच दानाची परिपूर्णता समजून घ्या. तू ऐकलं असशील ना? ते किडामुंगीवरही पाऊल पडणार नाही, याची काळजी घेतात.. विनम्रता भिक्षाटन यावर भर असतो. तो करुणेने ओथंबलेला बुद्धाचा गोड चेहरा.. (तो मुळात आर्य होता बरं का, म्हणजे पर्शिअन मूळ, योद्धेच ते, पूर्वेकडचा नव्हता, जरी तसा दाखवला जातो तरी.) आता मूळ बौद्ध धर्मात, त्या धर्मशाळेत येणाऱ्या पोरांना कुणी हे सांगत नसे की तिथे माणसांना जिवंत गाडतात. त्यांना फक्त सौम्यपणे ध्यान करायला प्रोत्साहन द्यायचे, दयाळूपणे वागायला सांगायचे... तर मग झेनची सुरुवात अशी झाली तर बुद्धानं सगळ्या भिक्षूंना एके दिवशी प्रवचनासाठी एकत्र केलं, महायान 'चर्च'चा कुलपिता निवडण्यासाठी. आणि काही न बोलता फक्त हात उंच करून एक फूल सगळ्यांना दाखवलं. सगळे हैराण झाले. पण काश्यपीय मात्र विचलित झाला नाही. आता या नावावरही त्या आडव्या रेघा मार बरं! त्यानं मंद स्मित केलं फक्त आणि तो महायान पंथाचा पहिला कुलपिता झाला. ही कल्पना त्या चिन्यांना फार आवडली. मग सहावा कुलपिता जो होता – हुई नून्ग नावाचा, त्याचं म्हणणं होतं, 'आरंभी काहीच अस्तित्वात नव्हतं.' त्याला बुद्धाचा सगळा उपदेश सूत्रात बांधलेला – अरे सूत्र म्हणजे धागाच शब्दश:! तर प्रवचनाचे धागे! त्याला ते सगळं फाडून टाकायचं होतं! कारण 'आरंभी काहीच नाही!' त्यामुळे झेन ही थोडी अशीतशीच मवाळ सांगोवांगीतून आलेली विचारधारा म्हणावी लागेल. म्हणजे कुठेतरी त्यांचाही एखादा शहाणा भिक्खू असेल उपदेश करणारा. पण आपण ज्याच्याबद्दल ऐकतो ना, ते जरा चक्रमच असतात! आता मी नाही गेलेलो जपानला... तुझा तो महाऋषी योगी. तो याच तत्त्वज्ञानाचा शिष्य खरं तर. संस्थापक कसला तो! काही नवीन नाही केलेलं त्यानं. जॉनी कार्सन शोवर तर त्यानं बुद्ध हा उल्लेखसुद्धा केला नाही! त्याचा बुद्ध म्हणजे मिया असणार! *(हा बहुतेक मिया फारोचा उल्लेख असावा. ही सेलेब्रिटी कार्सनच्या शोवर आली होती, म्हणून.)*

मुलाखतकर्ता : ए, पण तू जीझसबद्दल काहीच कसं लिहिलं नाहीयेस? बुद्धाबद्दल लिहिलं, पण

जीझसबद्दल नाही. असं का? जीझस पण महानच ना?

जॅक केरुआॅक : मी लिहिलं नाही? जीझसबद्दल? थोडक्यात म्हणजे तू खोटारडा दांभिक तोतया आहेस कुणीतरी! माझ्या घरी येऊन मला.... आणि ते.. अरे, जे जे मी लिहिलंय ते सगळं जीझसबद्दलच आहे! मी एव्हरहार्ड मर्क्युरीयन आहे! जीझसचा सेनापती!

सारोयान : बरं, मग आम्हाला जीझस आणि बुद्ध यांच्यात काय फरक आहे, ते तरी सांग!

जॅक केरुआॅक : चांगला प्रश्न विचारलास. काही फरक नाही!

सारोयान : काहीच नाही?

जॅक केरुआॅक : पण ना, मूळ भारतीय बुद्ध आणि तो व्हिएतनामचा बुद्ध यात मात्र फरक आहे हं! तो व्हिएतनामी बुद्ध नुसताच आपलं डोकं भादरून पिवळे कपडे घालतो. आणि कम्युनिस्टांसारखी आंदोलनं करत असतो. मूळ अस्सल बुद्ध जो होता ना तो गवतावरूनसुद्धा चालायचा नाही. त्या तृणपात्यांना इजा होऊ नये म्हणून! गोरखपूरमध्ये त्याचा जन्म झाला. तो पर्शिअन आक्रमकांच्या टोळ्यांच्या सल्लागाराचा मुलगा. त्याला योद्ध्यांचा ऋषी म्हणायचे. आणि काय नव्हतं त्याच्याकडे? सतरा हजार युवती समोर नाच करत हातात फुलं घेऊन त्याच्या अवतीभोवती त्यानं त्या फुलांचा गंध घ्यावा म्हणून आर्जवं करत घोटाळत असत, आणि तो त्यांना हाकलून देत असे. पण एकतिसाव्या वर्षी त्याला या सगळ्याचा कंटाळा आणि तिटकाराच आला . त्याचा बाप त्याला बाहेरच्या जगात काय चाललंय, याचा पत्ता लागू देत नसे. म्हणून मग हा एके दिवशी घोडा घेऊन बापाला न जुमानता गेला बाहेर आणि त्याला एक बाई मरताना दिसली... मग एका माणसाला घाटावर जाळताना त्यानं पाहिलं... मग तो म्हणाला, ''हे काय आहे काय सगळं ? हे मरण? क्षय? असा नाश होणं?'' तर त्याचा नोकर म्हणाला, ''असंच तर असतं सगळं. तुमच्या पित्याने हे सगळं तुमच्यापासून दडवून ठेवलं होतं इतकंच!''

हा तिरीमिरीत म्हणाला, ''काय? पिताजींनी असं केलं?आधी माझा घोडा आण. त्यावर खोगीर घाल! आणि चल माझ्याबरोबर जंगलात!'' मग ते जंगलात गेल्यावर त्यानं नोकराला म्हटलं, ''माझ्या घोड्यावरचं खोगीर काढ. ते तुझ्या घोड्याच्या पाठीवर टाक. त्याचा लगाम हाती घेऊन चालवत माझा घोडा राजमहालात परत घेऊन जा. माझ्या बापाला म्हणावं, मी त्याला पुन्हा कधीही भेटणार नाही!'' तो नोकर – छन्न त्याचं नाव, बिचारा रडू लागला. ''महाराज, तुम्ही कधीच मला दिसणार नाही..'' पण त्याला यानं गप्प करून हाकलून काढलं. जा इथून, नीघ म्हणून! सात वर्षं राहिला तो त्या अरण्यात. आधी दातावर दात घासून पहिले. स्वत:ची उपासमार करून पाहिली... काही झालं नाही. मग म्हणाला, ''मला मृत्यूचं कारण काळेस्तोवर मी हे माझे दात असे घट्ट एकावर एक आवळून ठेवीन.'' तो तसा पाप्री नदीतून धडपडत चालला असताना त्याला मूर्च्छा आली. मग एक लहान मुलगी त्याच्याजवळ येऊन

- **मला खऱ्या अर्थानं भारावून टाकलं असेल तर ते महायान बुद्धाच्या तत्त्वज्ञानाने!**
- **मूळ बौद्ध तत्त्वज्ञान सांगतं की तुमच्या हृदयात जाणीवपूर्वक आणि अखंड करुणा असू द्या... बंधुभाव, 'परमित् दान' म्हणजेच दानाची परिपूर्णता समजून घ्या. तू ऐकलं असशील, ना? ते किडामुंगीवरही पाऊल पडणार नाही, याची काळजी घेतात.. विनम्रता, भिक्षाटन यावर भर असतो. तो करुणेने ओथंबलेला बुद्धाचा गोड चेहरा..**

म्हणाली, ''महाराज, हे दूध तरी प्या!'' ते त्यानं घेतलं, म्हणाला, ''चांगलंच ताजतवानं वाटतंय आता, धन्यवाद, मुली!'' मग तो एका उंबराच्या झाडाखाली बसला. हा असा (पद्मासन घालून दाखवतो), मग म्हणाला, आता मी या आसनात बसतो, आणि दात असे घट्ट आवळून घेतो. मरणाचं कारण कळेस्तोवर मी असाच मांडी घालून इथेच बसणार... मग रात्रीचे दोन वाजले... एक लक्ष राक्षसांनी / पिशाच्चांनी त्याच्यावर हल्ला केला. पण हा ढळला नाही आपल्या निश्चयापासून, बरं! मग तीन वाजले, निळ्या भुतांनी त्याच्यावर शिव्यांचा भडिमार केला (मी स्कॉटिश ना! मग असंच सांगणार!), चार वाजले.. मग पिसाटलेले माथेफिरू आले तिथं. कुठून सांग? न्यू यॉर्कच्या रस्त्यांवर ती गटारांची झाकणं असतात, बघ त्यातून हा असा वाफेचा फवारा येतो, नाही का? तर तसे हे भोकांमधून याहूऊऊउ करत आले त्याला घाबरावयाला. हा तसाच बसलेला... मग सहा वाजले... मग मात्र शांतता. सगळीकडे सन्नाटा. पक्षी किलबिल करू लागले... आणि मग हा म्हणाला, आहा! आता कळलं! मृत्यूचं कारण जन्म हेच तर आहे! सोपंय की नाही? मग तो वाराणसीतल्या एका रस्त्यावरून चालू लागला. असेच तुझ्यासारखे लांब केस वाढले होते त्याचे! तेवढ्यात तिकडून तीन माणसं आली, बरं का! एक म्हणाला, ''हा बघ, बुद्ध! हा आपल्याबरोबर जंगलात होता उपासमार करून घेत! हा जेव्हा त्या आसनावर बसेल ना? तेव्हा याचे पाय धुऊ नका!'' मग बुद्ध त्या आसनावर बसला आणि एकाने पळत जाऊन घाईघाईनं त्याचे पाय धुतले! ''अरे, कशाला पाय धुतले त्याचे?'' बुद्ध म्हणाला, ''आता मी वाराणसीच्या गल्लीबोळांत जाऊन धिंडोरा पिटणार आहे..'' ''कसला धिंडोरा?'' ''आयुष्याचा! म्हणजे मृत्यूचं कारण जन्म हे आहे, हे मला सगळ्यांना सांगायला हवं!'' ''म्हणजे काय बाबा?'' ''थांब, दाखवतोच तुला!''

तोवर तिथे एक बाई तिच्या मृत बाळाला घेऊन त्याच्याकडे आली. बुद्धाला म्हणाली, ''तू तर भगवान आहेस, ना? मग माझ्या बाळाला परत आण, ना!'' बुद्ध तिला म्हणाले, ''हे मी करेन, पण त्या आधी तू मला श्रावस्ती नगरीतील असं एक कुटुंब दाखव की ज्यांच्या घरात गेल्या पाच वर्षांत एकही मृत्यू झालेला नाही. अशा घरातून एक मोहरी मागून आण आणि मला ती दे. मग मी तुझं मूल नक्की परत आणेन.'' ती गावभर फिरली. श्रावस्ती हे वीस लाख लोकांचं शहर होता बाबा! तेव्हा ते वाराणसीपेक्षा मोठं होतं. अन् परत येऊन म्हणाली, ''असं एकही कुटुंब नाही की ज्यांच्या घरी मृत्यू झालेला नाही!'' बुद्ध म्हणाले, ''मग आता तरी त्या बाळाला पुरून टाकशील?''

- **मी लिहिलं नाही? जीझसबद्दल? थोडक्यात म्हणजे तू खोटारडा दांभिक तोतया आहेस कुणीतरी! माझ्या घरी येऊन मला.... आणि ते.. अरे, जे जे मी लिहिलंय ते सगळं जीझसबद्दलच आहे!**
- **सारोयान : बरं, मग आम्हाला जीझस आणि बुद्ध यांच्यात काय फरक आहे, ते तरी सांग!**
- **जॅक केरुआॅक : चांगला प्रश्न विचारलास. काही फरक नाही!**

मग बुद्धाचा द्वेष्टा भाऊ देवदत्त – म्हणजे जीन्सबर्ग बरं का! मी बुद्ध आणि जीन्सबर्ग देवदत्त! त्यानं हत्तीला दारू पाजली. हा भला मोठा अगडबंब हत्ती व्हिस्की पिऊन माजलेला. तो जोरात अशी सोंड उचलून (हात उंच करून दाखवतो), कर्ण वाजवल्यासारखा चाल करून गेला की! मग समोरून बुद्ध आले. आणि गुडघ्यावर असे बसले त्या हत्तीसमोर, असे (बसून दाखवतो), आणि काय आश्चर्य, बघ. हत्तीही गुडघे टेकून त्यांच्यासमोर बसला! ते म्हणाले ''शांत हो! असा कर्कश्श आवाज नको करूस.

दुःखाच्या दलदलीत फसलाहेस रे तू!'' हत्तीचा प्रशिक्षकच जसा बुद्ध! त्याचं ऐकलं हत्तीनं! मग देवदत्तानं एक मोठी शिळा त्यांच्यावर ढकलून दिली! लागतच होती डोक्याला, पण थोडक्यात चुकली, बूम – धाडकन आदळली! बुद्धाला कळलं, हे देवदत्ताचंच काम! मग बुद्ध अशा येरझाऱ्या घालू लागले त्याच्या शिष्यांसमोर (फिरू लागतो). त्यांच्या मागे त्यांचा अजून एक भाऊ होता आनंद नावाचा. आनंदचा अर्थ प्रेम. याचा बुद्धावर फार जीव होता. हे तुरुंगात असंच फिरावं लागतं, पाहा! मला माहितीये. मी बुद्धासारखाच फिरायचो! आपली तब्येत नीट ठेवायची, तर अशाच फेऱ्या माराव्या लागतात

तर मला बुद्धाच्या बऱ्याच कथा माहिती आहेत तशा.. पण तो दर वेळी नक्की काय म्हणाला, ते मात्र मला सांगता येणार नाही! हां! पण एकदा त्याच्यावर एक माणूस थुंकला होता, तेव्हा काय म्हणाला, माहिती आहे? बुद्ध म्हणाला ''तुझं हे गैरवर्तन माझ्या काहीच कामाचं नाही, ते जरा परत घेतोस का?'' तर असा तो बुद्ध फार भारी होता!

(पियानो वाजवू लागतो. पुन्हा ड्रिंक्स येतात)

सारोयान : अरे! हे काहीतरी खास दिसतंय!

मुलाखतकर्ता : माझी आई वाजवायची ही धून! आता हे नोट्स कसे उतरवायचे पानावर, ते नाही कळत मला. पण आम्ही तुझ्या पियानोवादनाचं रेकॉर्डिंग करू मग... तर मग मिस्टर पेडरवस्की? पुन्हा वाजवाल का तो तुकडा आमच्यासाठी? की '**अलूट**' प्ले करता? *(पेडेअरव्हस्की हा संगीतकार आणि पियानिस्ट होता. अ लू ट ही एक फ्रेंच कॅनेडियन धून आहे.)*

जॅक केरुऑक : नाही! मी फक्त आफ्रो–जर्मेनिक संगीत वाजवणार! मी ना, चक्रम डोक्याचा आहे! अरे! त्या ओबिटल्सच्या गोळ्या आणि व्हिस्की मिळून काय काय होईल रे डोक्यात???

मुलाखतकर्ता : आता आम्हांला सांग, कर्मकांड, अंधश्रद्धा याबद्दल तुझं काय मत आहे? तुझ्या स्वतःच्या अशा काही अंधश्रद्धा आहेत का कामाबाबतीत?

जॅक केरुऑक : होतं एक रिच्युअल पूर्वी माझंही... मी एक मेणबत्ती लावून तिच्या उजेडात लिहायचो. आणि रात्री लिहून झालं की ती विझवून टाकायचो. शिवाय लिहायला सुरू करायच्या आधी गुडघे टेकून प्रार्थनाही करायचो! एका फ्रेंच चित्रपटात दाखवलं होतं, तसं. तो एक जॉर्ज फ्रिड्रिक हँडलबद्दलचा सिनेमा होता कुठलासा. पण आजकाल ना लिहायचाच उबग आलाय मला... अंधश्रद्धा म्हणशील तर... पौर्णिमेचा चंद्र असतो ना, तो मला फार संशयास्पद वाटतो हल्ली! आणि ९ या आकड्याबद्दल जरा चिकटून असतो मी. खरं तर मी मीन राशीचा आहे, तर मला सात आकडा शुभ असं म्हणतात. पण मला ९ च बरा वाटतो. मी नऊ वेळा टाच डाउन्स करतो. म्हणजे बाथरूममध्ये मॅटवर शीर्षासन करतो आणि ९ वेळा जमिनीला पायाचे अंगठे टेकवतो! हे सगळं तोल सांभाळत, हां! म्हणजे हे जे मी करतो ना ते योगापेक्षासुद्धा हं! म्हणजे खरं तर एक चमत्कारच आहे ॲथलेटिक्समधला! आणि मी एवढा तोल सांभाळत असतो, तरी मला बेताल असंतुलित म्हणतात.. खरं तर मलाही वाटतं, माझं डोकं फिरत चाललंय म्हणून. मग रिच्युअल काय तर जीझसची प्रार्थना करतो, झालं... माझं डोकं ताळ्यावर ठेव म्हणजे मला माझ्या कुटुंबाची– म्हणजे अर्धांगवायू झालेली आई, माझी बायको आणि या नेहमीच्याच मांजरी, यांची काळजी घेता येईल... एवढंच.

मुलाखतकर्ता : तू 'ऑन द रोड' तीन आठवड्यांत टाईप केलंस. 'द सबटरेनिअन्स' तर ३ दिवस

- **मला बुद्धाच्या बऱ्याच कथा माहिती आहेत तशा.. पण तो दर वेळी नक्की काय म्हणाला, ते मात्र मला सांगता येणार नाही! हां! पण एकदा त्याच्यावर एक माणूस थुंकला होता, तेव्हा काय म्हणाला, माहिती आहे? बुद्ध म्हणाला, ''तुझं हे गैरवर्तन माझ्या काहीच कामाचं नाही, ते जरा परत घेतोस का?'' तर असा तो बुद्ध फार भारी होता!**
- **काय घडलं, याचा विचार करावा लागतो... मग मित्रांना भल्यामोठ्या कहाण्या ऐकवायच्या. मग पुन्हा त्यावर रवंथ करायचा मनातल्या मनातच... मग फावल्या वेळात तुकडे जुळवायचे सगळे.. मग घरभाडं द्यायची वेळ येते, तेव्हा स्वतःला दामटून टाइपरायटरशी बसवायचं... किंवा वही उघडून बसायचं, पेन घेऊन.. आणि मग संपवायचं ते! तसं बळंच केलं म्हणून काही बिघडत नाही. कारण सगळी कथा मनात जुळलेली असते . आता हे कसं किती चांगलं होईल ते मेंदू किती मजबूत त्यावर अवलंबून आहे . म्हणजे फुशारकी नाही मारत, पण एका मुलीनं मला सांगितलेलं एकदा... की माझा मेंदू अगदी पोलादी पकडीसारखा मजबूत आहे म्हणून!**

आणि ३ रात्रींत सलग लिहून काढलंस. काय विलक्षण वेग आहे हा! अजून जमतं का तुला हे असं? लिहिण्यापूर्वीची प्रक्रिया, म्हणजे तुझ्या डोक्यात काय घडत असतं, ते जरा सांगशील का? म्हणजे हा जो भन्नाट स्पीड आहे, ना? तर ते तसं टाइपिंग सुरू करण्यापूर्वी कितीसा भाग डोक्यात आधीच तयार असतो?

जॅक केरुऑक : काय घडलं, याचा विचार करावा लागतो... मग मित्रांना भल्यामोठ्या कहाण्या ऐकवायच्या. मग पुन्हा त्यावर रवंथ करायचा मनातल्या मनातच... मग फावल्या वेळात तुकडे जुळवायचे सगळे.. मग घरभाडं द्यायची वेळ येते, तेव्हा स्वतःला दामटून टाइपरायटरशी बसवायचं... किंवा वही उघडून बसायचं, पेन घेऊन.. आणि मग संपवायचं ते! तसं बळंच केलं म्हणून काही बिघडत नाही. कारण सगळी कथा मनात जुळलेली असते . आता हे कसं किती चांगलं होईल ते, मेंदू किती मजबूत त्यावर अवलंबून आहे . म्हणजे फुशारकी नाही मारत, पण एका मुलीनं मला सांगितलेलं एकदा... की माझा मेंदू अगदी पोलादी पकडीसारखा मजबूत आहे म्हणून! म्हणजे आम्ही बोलताना तिनं काही म्हटलं असेल तर मी ते विसरायचो नाही. आम्ही बरळत बरळत अगदी लाखो मैल भरकटलो ना तरी ती तासाभरापूर्वी काय बोलली ,हे मला तसंच्या तसं आठवायचं. म्हणजे कळतंय का कसं ते. एखाद्या वकिलाचं मन कसं काम करेल, तसंच! सगळं मनात तयारच असतं . फक्त भाषा त्या त्या वेळी बदलते. आता तू जे म्हणालास ना, ती पुस्तकं – ऑन द रोड, सब टरेनिअन्स, त्या वेगानं नाही बाबा जमत मला आता. ते 'सब'च्या वेळी तीन रात्रींत सगळं लिहिणं म्हणजे विक्रमच होता ऍथलेटिक आणि मानसिकही तू पाहिलं असतंस ना मला नंतर, तर कळलं असतं तुला! असा हा कागदासारखा पांढरा फटफटीत पडलो होतो मी. पंधरा पौंड वजन कमी झालं होतं आणि काय विचित्र दिसत होतो, आरशात पाहिलं तर... आता मी एका बैठकीत ८००० शब्द लिहितो. आणि मग एका आठवड्यानंच पुन्हा बैठक जमवतो... मध्ये काही नाही. आराम करतो, गाणी गातो... मला कंटाळाच येतो लिहायचा. कारण मी असा शिस्तीत अगदी दार बंद करून माझं आता काम चाललंय, मला कॉफी पाठवा, म्हणून आठ तास बसून अगदी अक्षरकिडा वगैरे असल्याचा आव कुठून आणू? नि हे सगळं करून काय साधायचं तर

उगाच स्वत:च लादून घेतलेली बकवास लोकांच्या माथी मारत, जगात काहीतरी उदास रटाळ छपाईत भर घालायची? उशी भरून फुगवायला तरी उपयोग होईल का त्या कागदांचा? ते राजकारणी लोक बघ, तीन शब्दांत सांगायचं ते पंधराशे शब्द वापरून सांगतात... तसं नाही जमत मला. म्हणजे मला माझाच कंटाळा आला तर ते किती भयानक असेल? नाही करत मी तसलं काही.

सारोयान : तू शब्द वापरण्यापूर्वी सगळं डोळ्यांसमोर आणून 'पाहतोस' का? म्हणजे शब्दप्रयोग करायच्या आधी पाहून मग ती भावना उतरवतोस? की कसं ? म्हणजे ट्रिस्टस्सामध्ये...

जॅक केरुऑक : आता हा काय इंडियाना युनिव्हर्सिटीतला रायटिंगवरचा सेमिनार चाललाय का?

सारोयान : तसं नाही, पण...

जॅक केरुऑक : त्यात, अरे... मी काही जास्त केलं नाही. ती मुलगी पडते ना डोक्यावर, तिच्याबरोबर तिची वेदना अनुभवली फक्त. आठवतंय? ती डोक्यावर पडते आणि मेलीच असती ती, पण वाचते. नेटिव्ह अमेरिकन अगदी प्युअर एस्पारांझा विलेनउवानाव, तीच मस्त इंडियन पोरगी. म्हणजे अर्धी स्पॅनिश आणि अर्धी इंडियन जन्मानं. काय सुरेख होती , वा!. नुसतं सुरेख हाडपेर आणि ती त्वचा. खरी सौन्दर्यवती. शेवटी पटवलीच मी तिला... आता हे पुस्तकात नाही लिहिलं मी, पण मी पटवली तिला. ती म्हणते, श, श्श! त्या घरमालकाला ऐकू जाईल.. आणि मी फार आजारी आहे, अशक्त आहे वगैरे.. मी म्हणालो, मला माहिती आहे. मी तर पुस्तक लिहितोय अख्खं. तू कशी आजारी आणि अशक्त आहेस वगैरे..

मुलाखतकर्ता : मग हे सगळं लिहायचंस खरं तर... कसं काय नाही लिहिलंस?

जॅक केरुऑक : कारण क्लॉडच्या बायकोनं मला सांगितलं, ते लिहू नको, त्यानं पुस्तकाची हवाच जाईल म्हणून. पण हे काय मी विजय मिळवल्यासारखं नाही सांगत, हं! विझत आली होती. ती एम अँड एम घ्यायची, म्हणजे मॉर्फिन. आणि मी आपला तिच्या मागे पळतोय, अपटाऊन ते डाउनटाऊन ते झोपडपट्टीत. काही विचारू नकोस. तिला गाठलं न् म्हणलं, हे घे तुझा माल, तर ती म्हणे ''श्श्श् चूप!'' आणि मग एक शॉट घेतला मॉर्फिनचा. मग मी म्हणालो हीच ती वेळ आणि मग काय, मग मी माझा XX... झालं माझं काम. पण मेक्सिकोसाठी हे चांगलंच कारण होतं, हं!

- **मी एका बैठकीत ८००० शब्द लिहितो. आणि मग एका आठवड्यानंच पुन्हा बैठक जमवतो... मध्ये काही नाही. आराम करतो, गाणी गातो... मला कंटाळाच येतो लिहायचा. मोठी महत्त्वाची गोष्ट आहे ही?**

स्टेला : ये, मनू... पुन्हा बाहेर गेला वाटतं...

जॅक केरुऑक : मस्त होती. तुला आवडली असती. तिचं खरं नाव एस्पेरांझा होतं. अर्थ माहिताय?

मुलाखतकर्ता : नाही. राहू दे.

जॅक केरुऑक : एस्पेरांझा म्हणजे आशा. स्पॅनिश भाषेत. आणि ट्रिस्टस्सा म्हणजे दुःख. अन् तिचं खरं नाव आशाच होतं. आता ती मेक्सिकोच्या पोलिस चीफची बायको आहे.

स्टेला : नाही काही. चीफशी कुठं लग्न झालंय तिचं...

जॅक केरुऑक : तू एस्पेरांझा आहेस का? तुला काय माहीत? नाही, तू नाहीच एस्पेरांझा, हे मी तुला सांगतो!

स्टेला : नाहीच. मी नाहीच तशी.

जॅक केरुआॅक : अशी बारीक. चवळीची शेंग.

स्टेला : एका लेफ्टनंटशी झालंय तिचं लग्न, तूच सांगितलयेस मला.

जॅक केरुआॅक : छान आहे ती. आता कधीतरी भेटणार आहे मी तिला.

स्टेला : बघते, कसा भेटतोयस? मेले तरी बेहत्तर !

मुलाखतकर्ता : तू ट्रिस्टस्सा लिहिलंयस, तेव्हा खरंच मेक्सिकोमध्ये होतास? ते नंतर नाही लिहिलंस?

जॅक केरुआॅक : पहिला भाग... मेक्सिकोत असताना लिहिला. आणि दुसरा भागही मेक्सिकोतच. १९५५ मध्ये आणि १९५६. पण याचं काय एवढं ? मी काही तो चार्ल्स ओलसन नाही! महान कलाकार ना तो!

मुलाखतकर्ता : आम्ही फक्त तथ्यं गोळा करतोय रे!

जॅक केरुआॅक : तो चार्ल्स ओलसन देईल तुम्हाला सगळ्या तारखा. मला नाही जमत. तो सांगेल त्याला तो हाऊंड कुत्रा कुठे दिसला, केव्हा... काय ते ग्लुसेस्टरमध्ये! मग तो त्या कुठल्या बीचवर गेला असताना, कोण काय झक मारत होतं... कसला तो बीच? व्हॅन्कूव्हर! नाही का? कुठली डिगडॉग नदी. नदी न् ते डॉगटाऊन! तर हे तसं काही नाहीये. हे ना, हे आहे हागणदारी. मेरिमार्कच्या तीरावरील हागीरडं गाव. आणि मी काही या हागणदारीवर कविता लिहून माझ्या गावाचा अपमान नाही करणार. ओके? हां, आता मीही सहा फूट सहा इंच असतो ना, तर मग मी काहीही लिहू शकलो असतो, नाही का?

मुलाखतकर्ता : आजकाल कुणाकुणाच्या संपर्कात असतोस तू? कुणाशी जमतं का? मैत्री वगैरे?

जॅक केरुआॅक : जॉन क्लेलॉन होम्सबरोबर असतो पत्रव्यवहार थोडा. पण अलीकडे कमीच. मी जरा आळशीच होत चाललोय. मी माझ्या चाहत्यांच्या पत्रांनाही उत्तरं नाही देऊ शकत. कारण माझ्याकडे काही सेक्रेटरी नाहीये. नोट्स घ्यायला ते टाईप करायला, स्टॅम्प्स, इन्व्हलपस् आणून पाठवायला... आणि खरं तर माझ्याकडे त्यांना द्यायला अशी उत्तरंही नाहीतच. आणि मी एकटा जन्मभर हेच करू? मी त्या राजकारण्यांसारखा हसत, शेकहॅण्ड करत.. फालतू बकवास देत घेत जगू नाही शकत. मी लेखक आहे. मला माझं मन थोडं रितं ठेवावं लागतं. एकांत लागतो त्याला. ग्रेटा गार्बोसारखा. पण मी बाहेर जातो ना कधी, किंवा अचानक पाहुणे येतात, तेव्हा खूप माकडपणा करतो. मज्जा!

❑

(भाग दोन पुढील अंकात)

## । केरुऑकचा अनुवाद अनुभव ।

भडक कपडे घालून 'दम मारो दम' करणारे हिप्पी Hippie आपल्याला तसे परिचित असतात. पण त्यांच्याही आधी म्हणजे पन्नासच्या दशकातील Beat generation बद्दल मला तरी फारसं काही माहीत नव्हतं. हिप्पीज् सारखेच हेही रूढी झुगारून देणारे नशेडी, मस्तीत जगणारे. पण मुख्य फरक हा, की यांच्यातील बरेचजण literary talent लाभलेले होते. त्यातील बऱ्याचजणांनी साहित्यनिर्मिती केली आणि अमेरिकन लिटरेचरमध्ये ते साहित्य एक वेगळंच स्वतंत्र genre होऊन राहिलं.

'वर्णमुद्रा'च्या श्री. मनोज पाठकांनी या Beatniks पैकी एका प्रसिद्ध माणसाची दुसऱ्या beatnik नं घेतलेली अफलातून मुलाखत माझ्या निदर्शनास आणली, आणि 'याचं मराठी रूपांतर कराल का?' म्हटलं तेव्हा मी उडालेच. एकतर साहित्य हा formally अभ्यासाचा विषय नाही. त्यात या मॅनची भाषा, विषय, आणि जगणं... अजिबातच relatable नाही.

तरीही comfort zone मधून बाहेर आल्याशिवाय नवीन काही शिकणं, समजणं होत नाही, ही खूणगाठ पक्की होती.

त्यामुळे जॅक केरुऑकची ही टेड् बेरिगननं घेतलेली मुलाखत वाचायला घेतली. अत्यंत विस्कळीत, नशेत, तारेत असल्यासारखं बोलणं, शिव्या, अति 'पुरुषी' भाषा... या सगळ्यांतून काहीकाही gems म्हणावेत असे तुकडे मिळाले. लेखनप्रक्रियेची जी थिअरी या मुलाखतीतून उलगडलीय, ती एक क्षण थांबून विचार करायला भाग पाडते, हे नक्की. वेगवेगळ्या प्रश्नांच्या निमित्तानं उत्तरं देताना, स्वतःला defend करताना, काही postulates मांडताना तो जे काही म्हणतो त्यातील पॅशन जर भिडलं, तर हे आवडू शकतं. पण कोळशाच्या खाणीतून हिरे शोधण्याइतकंच ते (निदान माझ्यासाठी तरी) अवघड होतं. कारण ती भाषाशैली त्याच्यासारखीच सुसाट खळाळत वाहणारी, आणि त्याच्यासारखीच जटिल. Complex and layered. Not easy to decipher.

पण म्हटलं, आपल्याकडे दोन्ही भाषांची native fluency आहे, आणि थोडंसं का होईना, पण साक्षीभावानं इतरांच्या जगण्याकडे पाहायची वृत्तीही. शिवाय एखाद्या संभाषणाचा मूड पकडून ते सादर करण्यासाठी लागणारं आपलं आकलनही तपासायची ही छान संधी होती. त्या निमित्तानं केरुऑक आणि त्याच्या समकालीनांच्या अनेक पुस्तकांचे संदर्भ पाहिले गेले. काही interesting, काही disgusting. काही करुणात्मक, तर काही धमाल.

एक challenging project सुरू करून काही अंशी तरी conclude ही करू शकले, याचा आनंद नक्की आहे. त्यादरम्यान 'हे जमणार नाही!' अशा स्थितीत गेलेही. पण परत सुरू करू शकले. पाठकांनी वेळोवेळी बराच patience आणि विश्वास दर्शवला, प्रोत्साहन दिलं. श्री. लव्हेकरांनी काही भाग वाचून 'हे जमलंय!' म्हटल्यामुळे धाडस वाढलं. Thank you!

**– स्मिता घैसास**



# तत्त्वभान दर्शन




'वर्णमुद्रा'प्रकाशित आणि श्रीनिवास हेमाडेलिखित 'तत्त्वभान' विषयी प्रा. डॉ. सुरेंद्र दरेकर यांनी लिहिलेल्या एकूण दहा परिचय-लेखांपैकी हा दुसरा लेख या अंकात देत आहोत. पहिला लेख मार्च-एप्रिल २०२४ च्या अंकात प्रसिद्ध झाला.

**मनोज सुरेंद्र पाठक**

## तत्त्वभानच्या निमित्ताने – २
## तेथ अभिप्रावो अभिप्रायातें विये

प्रसिद्धी दिनांक : ०९ डिसेंबर २०२३

'तत्त्वभान' पुस्तकातील एक लक्ष्यवेधी लेख म्हणजे 'भारतीय उत्तराधुनिकतेचा दार्शनिक' हा लेख (दि. १७ एप्रिल २०१४) कॉम्रेड शरद पाटलांच्या विचारांची ओळख करून देणारा आहे. मार्क्सवादाची भारतीय दार्शनिक परंपरेशी सांगड घालून वर्ण-वर्ग-जात-स्त्रीदास्याचा अंत करण्याच्या हेतूने मार्क्स-फुले-आंबेडकरवादी रूपातील मुक्तीचे नवीन तत्त्वज्ञान रचू पाहणारा आधुनिक विचारक' या परिभाषेत कॉम्रेड पाटील भारतीय आणि अर्थातच मराठी विचारविश्वालाही सुपरिचित आहेत. 'तत्त्वभान' मालिका

चालू असतानाच्या काळात १२ एप्रिल २०१४ रोजी कॉम्रेड शरद पाटील यांचे निधन झाले. या लेखाच्या निमित्ताने लेखक श्रीनिवास हेमाडे यांनी कॉम्रेड पाटील यांना 'विचारांजली' वाहून 'तत्त्वभान' काळसुसंगत असल्याचे सिद्ध केले आहे.

प्रस्तुत लेखात, इंग्रजी विद्येच्या भारतातील आगमनाच्या स्वातंत्र्योपूर्वोत्तर काळात अस्तित्वात असणाऱ्या परंपरानिष्ठ उच्चनिम्न भारतीय लोक समुदायावरील परिणामांची दार्शनिक अंगाने मांडणी केली आहे. त्याकाळातच जडवाद, मार्क्सवाद व त्या अनुषंगाने स्त्रीवाद या विचारसरणी येथे आल्या. या विचारसरणींच्या अनेक महत्त्वपूर्ण मुद्यांची चर्चा या लेखात केलेली आहे. चर्चेच्या ओघात लेखकाने परिवर्तनशील आधुनिकतेसोबतच विचारार्थ घेतलेले उत्तराधुनिक परिप्रेक्ष्य मला महत्त्वपूर्ण वाटते.

मराठी वैचारिकतेची वाटचाल व वर्तमान स्थिती पाहता साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक विश्लेषणात कॉम्रेड पाटील यांच्या दृष्टिकोनाचा कळत नकळत वापर करूनही त्याविषयी फारसे सख्यत्व नसल्याचे, किंबहुना त्याविषयी मराठी विचारकांना काहीसा रोष/आकस असल्याचे निदर्शनास येते. केवळ वाङ्मयीन समीक्षाविषयक नवीन दृष्टिकोन पाहिले तरी, या विचारधारेची केवळ अपरिहार्य विद्याशाखीय गरज म्हणून दखल घेत, भारतीय परिस्थितीत ते कसे गैरलागू आहे, हे पटविण्याकडे एकूण विश्लेषणाचा कल दिसून येतो. याची अलीकडची दोन उदाहरणे म्हणजे मी डॉ. सदानंद मोरे यांच्या गौरवग्रंथ समारंभ निमित्ताने पुणे विद्यापीठात आयोजित परिसंवादात त्यांच्या 'गर्जा महाराष्ट्र' या महाराष्ट्र संभाषिताची सम्यकमीमांसा व चिकित्सा करणाऱ्या पुस्तकाचे अंशतः भाषिक वळणाच्या अंगाने उत्तराधुनिक दृष्टिकोनातून केलेले परीक्षण (ते आता 'सक्षम समीक्षा' दिवाळी २०२३ अंकात प्रसिद्ध झालेले आहे.). यावर दोन समीक्षकांनी हे भारतीय परिस्थितीत विसंगत वाटते, स्वरूपात परखड आक्षेप घेतले होते. विस्तारभयास्तव येथे त्याच्या तपशिलात जाता येणार नाही. दुसरे उदाहरण म्हणजे परवा रत्नागिरी येथे भरलेल्या प्रगतिशील लेखक संमेलनातील समीक्षासत्राचे घेता येईल. या संमेलनातील समीक्षाविषयक चर्चा मी लक्षपूर्वक ऐकली. तीन चर्चकातील मतांच्या परस्पर विरोधाचा गोंधळ व दुर्बोधतेच्या नावाखाली व्यासंगी अभ्यस्त वृत्तीचा अधिक्षेप सोडता मला ती बऱ्यापैकी उत्तराधुनिक वळणाची वाटली. फक्त ती भाषिक वळणांच्या (linguistic turn) बर्गमन आणि स्ट्रॉसनच्या सामान्य भाषा-संभाषिताला (OLD) धरून व्हायला हवी होती (याबाबत भालचंद्र नेमाडे, श्याम मनोहर कळीची भूमिका बजावतात).

बाकी उत्तराधुनिकतेला अध्याहृत असलेली आत्मसंदर्भीयतेचा विचार करता ही आत्मसंदर्भीयता; ज्ञानशास्त्रीय व नैतिक सापेक्षता, अनेकता, सारसंग्रहात्मकता इत्यादी सर्वच गृहितकृत्यांना स्पर्शून जाणारी होती. विचारप्रणाली सामाजिक मूल्ये व इतिहासाचा संस्कृतीवरील परिणाम जोखण्याच्या दृष्टीने 'चिकित्सा' हा आत्मसंदर्भीयतेचा अंगभूत गुणच असल्याने त्याचाही काही प्रश्न नव्हता. वस्तुनिष्ठ वास्तव नैतिकतेत ही नेहमीच मानवी प्रकृती, तर्कबुद्धी, भाषा व प्रगती इत्यादींबाबतच्या रूढ असणाऱ्या सार्वभौम कल्पनांची कठोर (निर्मम) तपासणी अपेक्षित असते. ती समीक्षेच्या चिकित्सक पवित्र्यातूनच शक्य होत असते.

चर्चेत आलेल्या फ्रेडरिक जेमसनच्या मतानुसार उत्तराधुनिकता ऐतिहासिक भूतकाळाला विनिमित होऊ शकणाऱ्या एका पोकळ सत्त्वहीन कृतक शैलीच्या (pastiche - मिश्रशैलीची कलाकृती) उपभोग्य वस्तुरूप मालिकेत रूपांतरित करीत असते. त्यामुळे भांडवलशाहीला विरोधी विचारांच्या रूपसाध्यतेलाच मर्यादा घातल्या जातात. असो.

लेखक श्रीनिवास हेमाडे यांनी या प्रस्तुत लेखात 'भारतीय दार्शनिक आणि सांस्कृतिक जीवन केवळ ब्राह्मणी परंपरेचा निर्वाह करणारे नसून यात समांतर अब्राह्मणी चेतनाही महत्त्वाचे कार्य करत कळीची भूमिका बजावते याचे मौलिक भान कॉम्रेड शरद पाटलांच्या चळवळीने दिल्याचे' म्हटले आहे. या मागे कॉम्रेड पाटलांचा दृष्टिकोन 'उत्तराधुनिक तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत विरचनावादी आणि पुनर्रचनावादी' म्हणता येईल' असे हेमाडे यांचे प्रतिपादन आहे. महाभारत, रामायण, पुराणे आणि मिथके इत्यादींच्या पारंपरिक महाकथनांच्या (Grand Narratives) भाराखाली दबलेली स्त्री-शूद्रांच्या समांतर साहित्यातून दिसून येणारी अब्राह्मणी परंपरा शर्थीने मुक्त करण्याचे श्रेय ते पाटलांना देतात.

परंतु लेखक हेमाडे यांचे हे मत एका अर्थाने अध्यारोपित स्वरूपाचे आहे आणि म्हणून त्या मताची साधकबाधक चिकित्सा होणे गरजेचे आहे. मला या संदर्भात प्रा. मे. पुं. रेगे यांनी 'नवभारत'मध्ये केलेली व नंतर 'सत्यशोधक मार्क्सवादी' या मुखपत्राच्या अंकात आलेली 'मार्क्स-फुले- आंबेडकर' संश्लेषणविषयक परखड मीमांसा आठवते.

कॉम्रेड शरद पाटील जाणीवपूर्वक उत्तराधुनिक विश्लेषणपद्धतीकडे वळले असते तर कदाचित ते आणखी एखादी नवी अन्वेषणपद्धती शोधू शकले असते. आता या सौत्रान्तिक मार्क्सवादी पद्धतीचा विकास करण्याचे उत्तरदायित्व त्यांच्या अनुयायांवर असून त्याबाबत ते कुचराई करणार नाहीत हा श्रीनिवास हेमाडे यांनी त्यांच्या मांडणीत दाखवलेला आशावाद मला महत्त्वाचा वाटतो. या दिशेने वाटचाल होणे नितांत गरजेचे आहे.

**प्रा. डॉ. सुरेंद्र दरेकर**

❑




**तत्त्वभान**

**श्रीनिवास हेमाडे**

**किंमत : ₹ ६८०/-**

**सवलतीत ₹ ६००/- ला पोस्टेजसह घरपोच मिळेल.**

**संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, जिल्हा बुलढाणा**
**९९२३७२४५५०**
**नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसअॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.**

**अकाउंट डिटेल्स :**
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा



# ‘उद्या’ : भविष्यभीतीचं भयावह चित्र

## अभिषेक वाघमारे




**परिचय**

दिवंगत लेखक नंदा खरे यांची ‘उद्या’ ही चर्चित कादंबरी एक Dystopian प्रकारची कादंबरी आहे. Dystopia ला मराठी प्रतिशब्द नाही, त्यामुळे तूर्त या प्रकाराला भविष्यभीती कथा म्हणूया.

भविष्यभीती कथा म्हणजे आजच्या व्यवस्थेमधील अ-व्यवस्थांचं, वाढत्या असंतुलनांचं, विकृतींचं भविष्यात केलेलं प्रोजेक्शन जे बऱ्याचदा वाचकाला नैराश्याकडे, हतबलतेकडे ओढत घेऊन जातं. ‘उद्या’ या कसोटीवर पुरेपूर उतरते. लेखकाच्या मते आजच्या चित्राचं उद्याच्या पडद्यावर त्याला दिसणारं projection हे भयावह आहे, जे त्याने छोट्याशा प्रस्तावनेत मांडलं आहे आणि ते पुरेसं निराशाजनक आहे. यासाठी लेखकाने वैशिष्ट्यपूर्ण पात्रनिवड आणि त्यांच्या माध्यमातून उलगडत जाणारं कथानक यांचा चांगला वापर केला आहे. ‘वर्णमुद्रा’च्या चोखंदळ वाचकांनी ही कादंबरी आधीच वाचलेली असणार हे गृहीत धरून मी प्रस्तुत लेखात कथानकाच्या तपशिलात जाणं टाळलेलं आहे.

कादंबरीतली मुख्य पात्रं म्हणजे सुदीप जोशी, जो भाषांतराचं रटाळ काम करणारा एक किरकोळ कारकून आहे; अरुण आणि अनू सन्मार्गी हे एक सरळमार्गी पोलिस अधिकारी जोडपं आहे. सानिका धुरू ही एक शोध-पत्रकार आहे तर भाकरे गुरुजी हे विदर्भातले एक निवृत्त शिक्षक आहेत. यांशिवाय

‘भरोसा’ आणि ‘विकास’ नावाची अजस्र कॉर्पोरेशन्स हीसुद्धा महत्त्वाची पात्रं आहेत. चाणाक्ष वाचकांना ही आजच्या कोणत्या दोन प्रसिद्ध भारतीय कंपन्यांची पर्यायवाची नावं आहेत ही वेगळं सांगण्याची गरज नाही.

सुदीपच्या कथेतून कारकुनाचं आयुष्य, तंत्रज्ञानाने सर्वसामान्य माणसाच्या जगण्यावर केलेले अतिक्रमण; शहरी मानवी आयुष्याला आलेली क्षुद्रता; उद्ध्वस्त झालेली कुटुंबव्यवस्था; एकूणच जगण्यातला बेचवपणा दाखवला आहे. अखेरीस ना धड कारकून ना धड शेतकरी अशा अवस्थेत सुदीपची कथा संपते.

सन्मार्गी जोडप्याच्या कथेला सर्वाधिक आयाम आहेत. दोघेही एकच वेळी तंत्रज्ञही आहेत आणि सरकारी अधिकारीही आहेत. नंतर तेच भरोसा कॉर्पच्या आमिषाला बळी पडून स्वतःचा सुखातला जीव दुःखात टाकून घेतलेले उच्चभ्रू प्रस्थापित आहेत.

सानिका धुरू ही एक गोंधळलेली पत्रकार आहे. हे कादंबरीतले सगळ्यात कमजोर पात्र आहे. चारगाव कम्यूनमध्ये काय चालतं हे वाचकाला कळणं आणि कादंबरीच्या शेवटापर्यंत पोचण्यास जो एक कथात्म टेकू आवश्यक असतो, त्या पलीकडे कादंबरीच्या मुख्य विषयवस्तूसंदर्भात या पात्राचं अधिक काही प्रयोजन नाही.

भाकरे गुरुजी हे एक ओल्ड स्कूल सज्जन गुरुजी आहेत जे त्यांच्या वैयक्तिक वकुबाने जेवढं काही चांगलं मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करू शकतील तेवढं करत आलेले आहेत. पण नंतर पैसा, व्यसनं इत्यादींच्या मागे वाहवत जाणारा समाज पाहून काहीच न करता येऊन हताशपणे बघत राहण्याची वेळ येणं ही त्यांची शोकांतिका आहे.

**पार्थिव वैशिष्ट्ये आणि आंतरिक वैशिष्ट्ये :**

गंभीर प्रकारच्या कथात्म साहित्याची चिकित्सा करताना ती कुठल्या बिंदूंभोवती केंद्रित ठेवायची याचा विचार करणं आधी आवश्यक आहे. हे दोन बिंदू म्हणजे पार्थिव वैशिष्ट्ये आणि आंतरिक वैशिष्ट्ये.

**पार्थिव वैशिष्ट्ये:**

लेखनकृतीची एकूण शैली, भाषानिवड, पात्रनिवड, नाट्यात्मकता, वेग इत्यादी पार्थिव वैशिष्ट्ये होत. या बाबतीत ही कादंबरी प्रत्येक निकषावर आजवरच्या कादंबरीच्या प्रचलित Format पेक्षा, मराठी वृत्तपत्रांच्या ऑनलाइन क्लिक-बेटिय भाषेत सांगायचं तर, नक्कीच ‘हट के’ आहे.

**पात्रनिवड** : वैशिष्ट्यपूर्ण पात्रनिवड याविषयी आधीच उल्लेख केलेला आहे.

**भाषानिवड** : चारही मुख्य पात्रांची भाषा प्रयत्नपूर्वक वेगळी ठेवली आहे. त्यामुळे त्यांची पात्रं establish व्हायला मदत झाली आहे. त्यांच्या व्यावसायिक भाषा, बोली, technical jargon यांचा सखोल अभ्यास लेखकाने केला आहे हे सहजच दिसतं. त्यामुळे कादंबरीला एक broad canvas रूप आलं आहे; एक अस्सलपणा आला आहे. जीवनाच्या इतक्या विविध अंगांना स्पर्श करणारी विषयवस्तू मराठीत क्वचितच दिसते. सुदीप जोशीची कारकुनी भाषा त्याचं कारकुनी एकसुरी आयुष्य नीट उभारते. अरुण आणि अनू सन्मार्गी यांची techno-legal भाषा आवश्यक ती वातावरण निर्मिती करते. सानिका धुरुच्या पात्राबाबतही तेच. भाकरे गुरुजींची भाषाही अस्सल वऱ्हाडी लहेजाची आहे.

**नाट्यात्मकता :**

चारही कथानकांमध्ये फारसे काही twisted turns, धक्के किंवा चकित करून सोडण्याचे प्रकार नाहीत. लेखकाने एका विशिष्ट भूमिकेतून कादंबरी लिहिली असल्याने कथानक बऱ्यापैकी predictable आहे. म्हणजे भरोसा कॉर्प ऊर्फ त्याचा मालक गगनशेठ ही व्यक्ती मुख्य खलनायक आहे आणि ती तिच्या पैसे आणि तंत्राच्या जोरावर काय काय करू शकते, याची वर्णनं आधीच आल्याने शेवट कसा होणार ह्याचा वाचकाला सहज अंदाज लावता येतो. चारही कथांमध्ये येणारे मृत्यू हे कथावस्तूच्या Dystopian genre शी सुसंगत आहेत. ते तसे नसते तर जो darkness आणण्यात लेखक यशस्वी झाला आहे, तो कदाचित साधता आला नसता. अर्थात ही उणीव नेमक्या तपशिलाने आणि भाषिक वैविध्याने लेखकाने भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे.

लेखकाने एक प्रकरण संपवून दुसरं प्रकरण सुरू करण्याच्या आधी एखाद्या sustained released औषधासारखी जी प्रस्तावना तुकड्यातुकड्यांत दिली आहे; तिने काही ठिकाणी रसभंग होतो. हा मराठीतला एक अनोखा प्रयोग असला तरी ती पुनरावृत्ती होते. जे तत्त्वज्ञान आपण आताच एका गोष्टीत ललितरूपात वाचलं, तेच पुन्हा निबंधरूपात वाचण्याचं काही प्रयोजन राहत नाही. कदाचित विषयवस्तू जड स्वरूपाची असल्याने ती थोडी सोपी करून सांगावी; त्याला आकडेवारी, संशोधन, सांख्यिकी यांची जोड द्यावी अशी लेखकाची इच्छा असेल. तसंही ही कादंबरी casual वाचकांसाठी नाही. गंभीर वाचनाचा थोडा पूर्वानुभव, थोडा नेट लावून वाचण्याची तयारी, चालू घडामोडींचं ज्ञान इत्यादी बाबतींतही काही एक यत्ता गाठलेल्या वाचकांसाठी ही कादंबरी आहे.

**वेग** : चारही कथानकांत कथाप्रवाहाचा वेग निरनिराळा राखलेला आहे. सगळ्यात कमी वेग चारगाव कम्यूनच्या कथेचा आहे. तर सुदीप आणि अरुण सन्मार्गींची गोष्ट मोठमोठ्या उड्या घेत पुढे जाते.

**शैली** : कादंबरीतली मुख्य पात्रं जरी उत्तम चितारली असली तरी सहाय्यक पात्रं तेवढ्या स्पष्टपणे visualize करता येत नाहीत. मुळात कथानक भविष्यात घडणारं आहे, तिच्यातलं वातावरण नवं आहे. चारगावच्या कथेत असलेलं गडचिरोलीच्या आदिवासींचंच आयुष्यही बहुसंख्य मराठी वाचकांना नवं आहे. त्यामुळे यात पात्रांच्या आयुष्यात काय घडतं यासोबतच त्यांच्या आजूबाजूच्या परिसरात काय घडतं, तो कसा दिसतो. आजपेक्षा तो 'उद्या' कसा वेगळा असणार आहे याचं graphic चित्र रंगवण्यात कादंबरी थोडी कमी पडली आहे. त्या दृष्टीने एक सर्वंकष विचार करता कादंबरी थोडी अधिक संक्षिप्त झाली आहे, असं वाटतं. कदाचित ती पसरट झाली तर जो hard hitting, hammering impact लेखकाला साधायचा आहे, तो पातळ होईल म्हणून तसं करणं टाळलं असावं की हा एक संपादकीय निर्णय आहे, हे आपल्याला सांगता येत नाही. पण थोड्या अधिक सुस्पष्ट detailing ने अधिक मजा आली असती. कदाचित वाचकानेही थोडी मेहनत घ्यावी, अशी लेखकाची अपेक्षा असेल. असो.

**आंतरिक वैशिष्ट्ये :**

या कादंबरीतून मांडलेले प्रमुख वैचारिक मुद्दे खालीलप्रमाणे आहेत–

सगळे सामाजिक प्रश्न मुळात आर्थिक असतात, हे पुरोगामी डाव्यांचं आवडतं गृहीतक आहे.

लेखकाचंही तेच मत दिसतं.

लोकसंख्या – दिवाणखान्यातल्या या हत्तीबाबाबत कोणीही बोलायला तयार नाही ह्या लेखकाच्या मताशी मी पूर्ण सहमत आहे.

Subversive Surveillance- अतिरेकी देखरेखीमुळे माणसांचं खासगी आयुष्य धोक्यात येणार आहे, असं कादंबरीतून मांडलं आहे.

धोरण दोहन (Rent Seeking)– कंपन्या आपल्या फायद्यासाठी राज्यकर्त्यांना manage करून सरकारी धोरणं स्वतःला अनुकूल करून मोठा नफा कमवतात. ही प्रवृत्ती आजच सर्वत्र दिसते.

आर्थिक सूज आणि विषमता– श्रीमंत आणखी श्रीमंत होत चालले आहेत, गरीब आणखी गरीब होत चालले आहेत वगैरे. मूठभरांच्या हाती सगळी संपत्ती कशी एकवटली आहे वगैरे.

**निरीक्षणं आणि चिकित्सा :**

कादंबरी प्रकाशनानंतरच्या सुरुवातीच्या काळातील झालेल्या एक नवी, चकित करणारी, मराठीत याआधी नसलेली मांडणी या स्वरूपाच्या रास्त कौतुकाच्या फेजमधून थोडं बाहेर पडून थोडा चिकित्सक विचार करायला आता हरकत नाही.

कथात्म साहित्यात एखादी गोष्ट किंवा प्रसंग का दाखवला? एखादं पात्र असंच का वागलं, तसंच का नाही वागलं, असं आपण लेखकाला विचारू शकत नाही. तो लेखकाचा विशेषाधिकार आहे. पण ही कादंबरी विशेष प्रकारची आहे. इथे एक विशिष्ट 'भूमिका' लेखकाने घेतली आहे. त्यामुळे त्यात काही गोष्टी लेखकाने का टाळल्या आहेत ,हा मला पडलेला प्रश्न रास्त असावा असं वाटतं. कारण आधी म्हटल्याप्रमाणे कादंबरीचा पट मोठा आहे. लोकसंख्या, भांडवलवाद, स्त्री–पुरुषांचं लोकसंख्येतलं बिघडललेलं गुणोत्तर, व्यसनाधीनता, आत्महत्या, नैराश्य इत्यादी अनेक सामाजिक समस्यांचा वेध इथे घेतलेला आहे. परंतु असे दोन विषय, जे आजच आपलं सामाजिक जीवन व्यापून आहेत, त्यांचा एक तर ओझरता उल्लेख आहे किंवा पूर्णपणे टाळला आहे.

त्यातला पहिला मुद्दा म्हणजे मी ज्याला कम्युनिस्ट दहशतवाद म्हणजे नक्षलवाद म्हणतो तो. याचा फक्त एक phenomenon म्हणून उल्लेख आला आहे, एक समस्या म्हणून नव्हे. भांडवलशाही किती वाईट असते; भांडवलदार किती क्रूर कपटी असतात; आपले आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी ते किती खालच्या स्तराला जाऊ शकतात, याची रसभरित वर्णनं कादंबरीत आहेत. त्यांचं वर्तन नैतिकदृष्ट्या किती चुकीचं आहे हे लेखकाने घटना, प्रसंगांतून वाचकांच्या मनावर बिंबवलं आहे. परंतु त्याच वेळेला कम्युनिस्ट दहशतवाद्यांचा हिंसाचार किती वाईट आहे किंवा निषेधार्ह आहे असं एकही विधान एकाही पात्राच्या तोंडी नाही की मध्येमध्ये पेरलेल्या निबंधांत नाही. जणू काही कम्युनिस्ट दहशतवाद (कम्युनिझम नव्हे) हा भांडवलशाहीच्या दडपशाहीला प्रतिक्रिया म्हणून उद्‌भवला आहे (आणि त्यामुळे तो चुकीचा नाही). या गोष्टीची अधिक चर्चा करून कम्युनिस्ट हिंसाचाराविषयी एखादी ठोस भूमिका घेण्याची वेळ येऊ नये म्हणून तर लेखकाने हा विषय नुसता touch and go तर केला नसेल?

दुसरा मुद्दा subversive surveillance शी निगडित आहे. मुळात CCTV Cameras, Surveillance यांची उत्पत्ती मोठ्या भांडवलदारांनी आपल्या ग्राहकांच्या आवडीनिवडी जाणून घेणं आणि कर्मचाऱ्यांवर देखरेख करणं यातून झाली असली तरी त्याचं प्रमाण सप्टेंबर २००१ पूर्वी आज

इतकं व्यापक होतं का हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे. ९/११ ला इस्लामिक दहशतवादाचा जो जबरदस्त तडाखा अमेरिकेला बसला आणि त्याच काळात भारतासारख्या अनेक देशांमध्ये सार्वजनिक ठिकाणांची सुरक्षाव्यवस्था वारंवार होणाऱ्या बॉम्बस्फोटांनी धोक्यात आली, त्यानंतरच या CCTVच्या राज्याला खरी बरकत आली. सुरक्षाव्यवस्था पुरवणाऱ्या कंपन्यांनीच त्यांचा माल खपावा यासाठी हा दहशतवादाचा बागुलबुवा उभा केला आहे, अशीही एक डावी Conspiracy Theory आहे. परंतु आज हा विश्वव्यापी प्रश्न बनला आहे, ही वस्तुस्थिती आहे. मोठमोठ्या सरकारांना एका बाजूला Wokism आणि अतिरेकी मानवतावाद यांना चुचकारताना ह्या वाढत्या कट्टरतेच्या समस्येवर कशी मात करायची, हे सुचत नाहीये. इस्लामिक दहशतवादाचं रूप १०० वर्षांनी कसं असेल, हे पाहणं फार रोचक ठरलं असतं. पण लेखकाने तो विषयच ऑप्शनला टाकला आहे. कारण हा फक्त आर्थिक प्रश्न नाही हे सगळेजण जाणतात. मग ते उजवीकडचे असोत वा डावीकडचे. उदा. फ्रान्ससारख्या ठिकाणी आता libertarian आणि libertine दोन्ही प्रकारच्या लोकांना त्याचे फटके बसणं सुरू झालं आहे. परिणामी एकेकाळी पुरोगामित्वाची मक्का, काशी, जेरुसलेम किंवा बेथलेहॅम असलेल्या फ्रान्समध्ये असो वा सर्वसाधारणपणे बहुतांश युरोपात असो, उजव्या राजकीय विचारसरणीला पाठिंबा वाढतो आहे आणि पुरोगामित्वाचं केंद्र आता Wokism चं नवं वस्त्र चढवून आता अमेरिकेत स्थिर झालं आहे.

थोडक्यात, कम्युनिस्ट दहशतवाद आणि इस्लामी कट्टरता हे दोन्ही पुरोगामी दिवाणखान्यातले दोन मोठे गजराज आहेत, हे या कादंबरीतून पुन्हा एकदा दिसून आलं आहे.

**भांडवलवाद आणि साम्यवाद यांच्यातली परस्परपूरकता :**

अमेरिकन भांडवलदारांनी तिथल्या लोकांना प्रत्येक गोष्ट गरजेपेक्षा मोठी घ्यायला लावली, असं आपण म्हणतो. म्हणजे मोठं घर, मोठी गाडी, मोठा कोक, मोठा पिझ्झा, मोठा बर्गर. सगळं बिग. त्यासाठी मग मोठं कर्ज, तेही अत्यल्प व्याजदरावर, घ्यायची सवय लावली. त्यासोबतच एक विशिष्ट वय झालं की घरातल्या लहान मुलांना स्वतंत्र बेडरूम, त्यात स्वतंत्र सोयी. त्यासाठी मग आणखी खर्च करा. नाही केला तर सामाजिक खात्याचे सरकारी अधिकारी येऊन तुमच्या घराचा सर्वे करणार, कमतरता असेल तर दंड ठोठावणार. हे सगळं विधिसंमत करवून घेण्यासाठी तसले कायदे बनवायला लावणार आदी. हा भांडवलशाही rent seeking चा एक classic नमुना आहे.

दुसरीकडे पुरोगामित्वाने अशा rent seeking ला कळत नकळत कसा हातभार लावला ते पाहू. पुरोगाम्यांच्या दृष्टीने व्यक्ती ही सर्वोच्च. बाकी सरकार, देश, कायदे, सामाजिक संकेत, धर्म हे सगळे अनावश्यक आणि दुय्यम आहेत. उदाहरणार्थ स्त्रीमुक्ती. जेव्हा आपण स्त्रीमुक्ती म्हणतो, तेव्हा ती पितृसत्ताक पद्धतीपासूनची मुक्ती असते. उदाहरणार्थ पेहराव, विचार, मूल जन्माला घालायचं स्वातंत्र्य, पैसा मिळवण्याचं स्वातंत्र्य, खाण्यापिण्याचं स्वातंत्र्य इत्यादी. या classic विचारांसोबतच स्त्रीमुक्ती ही केवळ थेट पुरुषांकरवी लादलेल्या बंधनांपासून मुक्ती नसते, तर ती इतर स्त्रियांकडून टाकल्या जाणाऱ्या बंधनापासूनचीही मुक्ती असते, हे आपण लक्षात घेत नाही.

उदाहरणार्थ, भारतीय समाजाचा विचार केला तर यातली बहुतांश बंधनं पुरुषसत्ताक कुटुंबपद्धतीला सरावलेल्या इतर स्त्रियांकडूनच येत असतात. म्हणजे घरातल्या आई, सासू, नणंद, बहीण, जाऊ यांच्याकडून येणारे दबाव तर बाहेरच्या शेजारीण– ऑफिसातली सहकारीण– मैत्रीण

यांच्याकडून येणारं peer pressure. यावर पुरोगामी solution काय तर विभक्त कुटुंब. कारण त्यांच्या मते पारंपरिक एकत्र कुटुंब ही एक पुरुषसत्ताक दमनकारी व्यवस्था आहे. त्यात स्त्रीचं शोषण होतं, तिला मनमोकळं जगता येत नाही, तिच्या कर्तृत्वाला वाव राहत नाही, चूल आणि मूल यात ती अडकून राहते. नवरा बायकोला space मिळत नाही इत्यादी. म्हणून विभक्त कुटुंब. विभक्त कुटुंबाचे समाजस्वास्थ्यावर काय परिणाम होतात ते महत्त्वाचं नाही, कारण व्यक्तिस्वातंत्र्य महत्त्वाचं.

परिणामी कुटुंबे विभक्त होत गेली आणि याचे थेट आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय परिणाम झाले. जिथे एक घर, एक चूल, एक गॅस सिलेंडर, एक पंखा, एक वाशिंग मशीन, एक टीव्ही, एक कार अशा मर्यादित संसाधनामध्ये भागत होतं, तेथे या सगळ्यांची मागणी दुप्पट झाली (इथे मी सोयीसाठी दुप्पट हा आकडा घेतला आहे). दुप्पट carbon emission, दुप्पट जंगलतोड. निसर्गाचं दुप्पट दोहन. त्यामुळे भांडवलदार तर खूश होणारच कारण त्यांच्या मालाला आपसूकच मागणी वाढली. शिवाय या सगळ्या वाढलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पन्न वाढवणं आवश्यक झालं. परिणामी वैयक्तिक बचत घटली, कर्जे वाढली. शहरांमधल्या वाढता एकाकीपणा, व्यसनाधीनता, ड्रग्स अशा सामाजिक समस्या तर निराळ्याच. वानगीदाखल, कॅनडासारख्या (पुरोगामी?) देशातल्या काही राज्यात तर कोकेनसारख्या मादक पदार्थांच्या काही विशिष्ट प्रमाणातल्या वैयक्तिक वापराला de-criminalise करण्यापर्यंत मजल गेलेली आहे. (भारतातही अशाच प्रकारच्या मागण्या woke लोकांनी आर्यन खान आणि बॉलीवूड ड्रग प्रकरणात केल्याचं वाचकांना आठवत असेल). पण अशा अनेक समस्यांना (आणि पर्यायाने भांडवलदारांची धन करायला) आपला व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेकी पुरस्कारसुद्धा काही अंशी कारणीभूत ठरला हे पुरोगामी लोक मान्य करतील का, तर त्याची नगण्य शक्यता आहे. कारण पुरोगामी विचारसरणीत आत्मपरीक्षण आणि कोर्स करेक्शन हा प्रकार फारसा दिसत नाही.

भांडवलशाहीमध्ये हा प्रकार दिसतो, कारण त्यात भांडवलदारांचे stakes, पैसा लागलेला असतो आणि अधिकाधिक नफा कमावणं हे घोषित उद्दिष्ट असतं. उदा. कोलगेट टूथपेस्टने आधी देशी मंजन, कोळसा, मीठ या दंतमर्जनाच्या देशी पारंपरिक साधनांची यथेच्छ टिंगल केली. मग बाबा रामदेव यांनी आयुर्वेदिक मॉडेल आणून कोलगेटचा धंदा खाल्ल्यावर कोलगेटने कधीकाळी आपणच टिंगल केलेल्या साधनांचा समावेश करून आयुर्वेदिकसदृश उत्पादनं आणणं सुरू केलं. हा swiftness भांडवलदार दाखवतात. पण आपला एखादा विचार चुकीचा ठरला हे दिसल्यावर ते मोठ्या मनाने मान्य करून सुधारल्याची उदाहरणं पुरोगामी विचारात मला तरी दिसली नाही. कारण मार्क्सवाद असो वा पुरोगामित्व हे मूलतः प्रतिक्रियात्मक आहेत, स्वयंभू नाहीत.

जगातल्या प्रभावशाली समूहांचा विचार केला तर भांडवलवाद्यांकडे अधिकाधिक नफा कमावण्याची एक भौतिक प्रेरणा आहे. हिंदूंकडे मुक्ती मिळवण्याचं, इस्लाम आणि ख्रिश्चनिटीकडे मेल्यावर स्वर्ग मिळवण्याचं एक घोषित पारलौकिक उद्दिष्ट आहे. याउलट डाव्या विचारांकडे तसं काही भौतिक वा पारलौकिक उद्दिष्ट नाही. त्यामुळे या कादंबरीतसुद्धा प्रश्नांची मांडणी केली आहे, पण ठोस उत्तर काही सुचवलं नाही. आडून आडून चारगाव कम्यूनसारखी एखादी व्यवस्था ही या समस्येवर उत्तर असू शकते हे सुचवलं आहे. पण तिलासुद्धा संरक्षणाची गरज असते आणि सरकारी surveillance पासून लपूनछपून काम करणारी ही व्यवस्था कम्युनिस्ट दहशतवाद्यांची मदत मात्र या संरक्षणाच्या कामी घेते. त्यांच्याशी give and take relationship ठेवायला तिला नैतिक अडचण येत नाही. म्हणजेच सरकारी/ भांडवलशाही surveillance नावडणारी ही व्यवस्था एका प्रकारे कम्युनिस्ट दहशतवाद्यांचं

surveillance स्वीकारते. परिणामी कादंबरी कुठला surveillance अधिक वाईट हा नवाच प्रश्न निर्माण करून संपते.

**समारोप**

'बूट पॉलिश' या १९५४ च्या RK Films च्या चित्रपटातील शैलेंद्रने लिहिलेल्या एका गाण्यात डेव्हिड नट विचारतो,

**हम से न छुपाओ बच्चो हमें तो बताओ**
**आनेवाली दुनिया कैसी होगी समझाओ ।**
**त्यावर लहान मुलं उत्तर देतात,**
**आनेवाले दुनिया में सब के सर पे ताज होगा**
**ना भूखों की भीड़ होगी ना दुखों का राज होगा**
**बदलेगा ज़माना ये सितारों पे लिखा है....**

लेखकानेच लिहिल्याप्रमाणे १९४७ च्या आसपास जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३३-३४ टक्के लोक साम्यवादी विचारसरणीचे असताना त्यानंतरच्या काळात आपण वरील गाण्यातल्यासारख्या Utopia कडे न जाता या कादंबरीत मांडलेल्या Dystopia पर्यन्त कसे पोचलो, याचं उत्तर देण्याची जबाबदारी इतर कुठल्याही विचारसरणीपेक्षा स्वतःला श्रेष्ठ मानणाऱ्या साम्यवादाची, समाजवादाची नाही का?

शेवटी जसा तो Utopia हे एक स्वप्नरंजन ठरलं, त्याप्रमाणेच आजचे डावे लोक मांडत असलेला Dystopia हा देखील एक कल्पनाविलासच ठरावा हीच सदिच्छा.

❑





**खट्टरकाकांचे विनोद-आख्यान**

**हरिमोहन झा**

**अनुवाद : वसंत केशव पाटील**

**किंमत : ₹ ४२४/-**

**सवलतीत ₹ ३५०/- ला पोस्टेजसह घरपोच मिळेल.**

संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसॲप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.

अकाउंट डिटेल्स :
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा

# चं. प्र. देशपांडे यांची फेसबुक पोस्ट
## गद्य कविता : लव्ह प्रॉब्लेम स्पेशालिस्ट

तुम्हाला सेक्सचे अतिरेकी व्यसन आहे आणि तुम्ही त्याच विचारात असता – तुम्ही बरे कसे होणार? डॉक्टर एका दाढीवाल्या सुमारे पन्नाशीच्या पेशंटला म्हणाले, हे कमी करायला हवे – यावर तो पेशंट मंदसे हसला. हे जर कमी वा बंदच करायचे असेल तर जगायचेच कशाला? असे म्हणून त्याने डॉक्टरांकडे पाहिले. त्याला दमा असावा, हे दिसतच होते, पण आणखी काय त्रास होता कोण जाणे. एका छोट्या शहरात एसटी स्टँडसमोर त्याचे एक हॉटेल होते. तो व्यवसाय करायचा तो याच कामासाठी, असा त्याचा जगण्याचा सारांश होता. काही लोक जसे साम्यवादासाठी वा हिंदुत्ववादासाठी वा गांधीवादासाठी वा आंबेडकरवादासाठी जगतात तसाच त्याचा हा सेक्सवाद होता. जियेंगे तो इसके लिये और मरेंगे तो इसके साथ! – असा त्याचा फंडा होता. डॉक्टरसाहेब, याच्यावर माझा कंट्रोल नाही आणि जगायचे तर यातच फक्त स्वर्ग आहे, असे मला वाटते. घरात तर सोय आहेच पण बाहेरही मी कुठे बलात्कार वगैरे नाही करत – रीतसर पैसे देऊन जातो, तो पेशंट म्हणाला. आता कंट्रोलच नाही आणि जगायचे तर याचसाठी हा निर्धार पाहून डॉक्टर क्षणभर स्तंभित झाले.

हे आठवायचे कारण म्हणजे आजच पेपरातून एक हँडबिल आले. ज्योतिषविद्येद्वारे अनेक गोष्टींची गॅरंटी देणारे. लग्न अडचण, नोकरी, धंदा, शिक्षण, व्यापार, घटस्फोट, सासू-सून वाद, पति-पत्नी वाद, संतान, प्रॉपर्टी, कोर्टकचेरी, शत्रुपीडा – असे अनेक प्रॉब्लेम हमखास सोडवून देण्याची खात्री दिलेली होती. मुख्य म्हणजे हा इसम 'लव्ह प्रॉब्लेम स्पेशालिस्ट' असल्याचे म्हटले होते. हे म्हणजे तर जगण्याचे मूलसूत्रच! बाकी सगळे आहे पण लव्हच नाही तर काय चाटायचेय ते बाकीचे अवडंबर? मला

उत्सुकता वाटली. मी जरा चौकशी करत करत ओळख काढली. आणि त्याच्याशी गप्पा मारण्याइतपत जवळीक साधली. त्याला म्हटले, खरंच सुटतात का हो लोकांचे प्रॉब्लेम्स? काय, याचं रहस्य काय असतं? तो म्हणाला, तुमचा स्वभाव मला आवडला – तुम्हांला मी सांगतो – पण, तुमच्या बायकोची शपथ घेऊन सांगा की तुम्ही हे इतर कुणालाही सांगणार नाही. आता माझे माझ्या बायकोवर जिवापाड प्रेम असल्याचे त्याला कसे कळले कोण जाणे. पण मी तसे केले. तो म्हणाला, तुम्हांला एक भारी उदाहरण सांगतो. चकित व्हाल. या अशा गोष्टींवर मुळीच विश्वास नसलेला एक माणूस माझ्याकडे आला होता. त्यानेच मला सांगितले की तो बुद्धिप्रामाण्यवादी आहे. त्याचा याच्यावर विश्वास नाही. पण लव्ह प्रॉब्लेम ही गोष्टच अशी आहे की एखादे तत्त्व ढिले करावे लागते – बघू तरी, म्हणून आलोय. धंद्याच्या बाजारात मला जायचे नाही. लव्हच मिळायला हवे. होईल काम – मी म्हणालो म्हणजे तो ज्योतिषी म्हणाला. कुठल्याही गोष्टीला कारण असते हे तर तुम्हांला पटतेच. इतक्या जणांचे लव्ह जमते तर तुम्हालाच का यावा प्रॉब्लेम? हं, ठीक आहे, बोला – तो म्हणाला. हे सोपे नसते. आमच्या पद्धतीने कारण शोधायचे तीन हजार पडतील आणि त्यावर उपाय सांगायचे दोन हजार. तो बुद्धिप्रामाण्यवादी टोकावर आलेला होता. कबूल झाला. त्याला तीन दिवसांनंतर यायला सांगितले. तो आला. त्याला म्हटले, कारण सापडले आहे. सातपुड्याच्या डोंगरात होते ते. विचार करायचा नाही. विश्वास ठेवत जायचे. काम झाले नाही तर पैसे परत. मी म्हणालो. ठीक आहे, सांगा – तो म्हणाला. मग मी एका मोठ्या पिशवीतून एक धोंडा काढला. हे आहे ते कारण. तुमच्याबाबतचा संताप यात साठलेला आहे. हा घरी घेऊन जा. फक्त तीन दिवसांचे काम आहे. नंतर हा माझ्याकडे परत आणून द्यायचा. मग मी त्याचे रीतसर विसर्जन करेन. यात मी नुसती कुंडली नाही वापरत – इतरही काही दैवी विद्या आहेत. तर तीन दिवस अंघोळ करून सकाळी साडेसात वाजता या धोंड्यावर एक बादली पाणी टाकायचे. बाकी काहीच काम नाही. हे करून तीन दिवसांनी या. विश्वासाने पैसे देऊन जा. काम होणार. त्याने ते ऐकले. काही दिवसांनी तो हसत पेढे घेऊन आला! त्याचे काम फत्ते झाले होते! आता मी म्हणजे मी त्याला विचारले की याचे रहस्य काय पण? कसे काय घडते हे? तो हसून म्हणाला, सोपे आहे. प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व पॅक असते. त्यामुळे त्याला अनेक प्रश्न असतात आणि त्यांतला एखादा प्रश्न मग टोकावर येतो. मी फक्त त्या व्यक्तिमत्त्वाची रचना कशी बदलता येईल याच्या आयडिया काढतो. व्यक्तिमत्त्वाची रचना बदलली की त्या वेळचा त्याचा प्रॉब्लेम सुटतो. कारण त्याचा स्वभाव, वागणे थोडेफार बदलते! आयला, पटतेय हे, मी म्हणालो, मग डॉक्टरकडे जसे त्याचे नेहमीचे पेशंट असतात – तसे काही घडते का की प्रत्येक वेळी नवे शोधावे लागतात बकरे? तो म्हणाला, नवे तर येतच असतात पण जुनेही अधिक विश्वासाने येत राहतात. एकदा व्यक्तिमत्त्वाची रचना बदलली तरी पुन्हा ते बदललेले व्यक्तिमत्त्व आहे तसे पॅकच राहते – मग त्याला दुसरे प्रॉब्लेम पडत राहतात – त्यांतला एखादा टोकावर येतो – अरे वा! असे म्हणून मी त्याचे पाय धरले. म्हटले, तुम्ही मानवी आयुष्याचे डॉक्टर तर आहातच पण शिवाय मोठे तत्त्वचिंतकही आहात! कोणताही माणूस हा बोंबलत प्रॉब्लेमयुक्तच जगणार, हे सत्य तुम्हांला उमगलेले आहे! ग्रेट!

**विजय नलावडे :** छान! मी तर मनापासून लेख वाचला सर. कारण पन्नाशीच्या लोकांच्या सेक्ससमस्या असतातच. त्यावर भारी उपाय शोधतच असतात. तसे सारेच वाचतील हा लेख. बरेच दिवस लेखरूपी भेटच नव्हती. लाखे सरांमुळे पुन्हा आपली भेट झाली.

❑

# सुरेंद्र विठ्ठल दरेकर यांची फेसबुक पोस्ट

## नव्वदोत्तर मराठी साहित्य उत्तराधुनिकता व समीक्षा

मराठी साहित्य जगतात द्रौपदीच्या अक्षयपात्राप्रमाणे न संपणारे लेखनछत्र चालू राहात नित्य नवनवीन वाङ्मयकृती ताटात वाढून येत असताना खरे तर खंत वाटावी असे काहीच नाही. पण येणे प्रकारे सर्वस्तरीय लेखनकामाठी मजबूत मनोहारी असताना समीक्षेची स्थिती भर्तृहरीने संस्कृतात वर्णिलेल्या चंद्राला दिवसा प्रकाश नसणे, ये कामिनीस जरा, पद्मावीण तळे, निरक्षर मुखी जो गोजिरा, दात्याला धनलोभ, इत्यादी सप्तशल्यांप्रमाणे झाल्यासारखी वाटत आहे. परवा तरुण पिढीतील एका लेखकाच्या कादंबरीवर दुसऱ्या तरुण लेखकाने केलेली टिप्पणी व त्यावर इतरांनी दिलेल्या परस्परविरोधी प्रतिक्रिया वाचून याहून एका वेगळ्याच शालेय द्वंद्वात्मकतेचीही आठवण झाली. ते म्हणजे ओळखणे कठीण व त्याहून सोडवणे दुष्कर असलेले इतरेतर वैकल्पिक समाहार द्वंद्व समास. पण आता जणू त्यांचा विग्रह करण्याची गरज उरलेली नाही, एवढे वातावरण दुभंग झालेले दिसत आहे. हा सोशल एन्ट्रोपीचा भाग बाजूस ठेवला तरी आस्वादनाच्या समीक्षेच्या पातळीवरील सद्यःस्थिती केवळ वैषम्य वाटावे एवढीच नसून भविष्यात काय होईल, याबाबत मन चिंतित करणारी झालेली आहे. असो. साधारण जागतिकीकरणाच्या उत्तरकालीन साहित्याबाबत अलीकडे बरेच काही वाचनात आले. यात सर्वाधिक महत्त्वाची तीन पुस्तके म्हणजे हरिश्चंद्र थोरात यांचे नेमाडेंच्या 'हिंदू' संदर्भातील चर्चाविश्व व्यापणारे 'अडगळीतील अलंकारशास्त्र', गणेश कनाटे यांचे नेमाडेंच्या देशीवादाचा फेरआढावा घेणारा विस्तृत लेख असलेले 'दीर्घ' व मीनाक्षी पाटील यांचे उत्तराधुनिकतेच्या परिप्रेक्ष्यातून मराठी कवितेचा आढावा घेणारे 'उत्तराधुनिकता आणि मराठी कविता' ही होत. साधारण समान संभाषित धरून याच

मालेत 'नवअनुष्टुभ'मध्ये अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या प्रा. राहुल पुंगलिया यांच्या नव्वदोत्तर साहित्याचा मुद्दा मध्यवर्ती ठेवत एकूणच मराठी समीक्षेची रोखठोक झाडाझडती घेणाऱ्या 'अस्मितेचे साहित्य आधुनिक का नाही?' या प्रदीर्घ लेखाचाही समावेश करता येईल.यापैकी कनाटे यांच्या देशीवाद तसेच उत्तराधुनिक भूमिकेचा मी मागे दोन भागांत सविस्तर परामर्श घेतलेला आहे. ते नेमाडेंच्या लेखन व देशीवादावरील आधुनिक वैज्ञानिक विवेकवादी दृष्टिकोनातून बरेचसे सयुक्तिक पण नंतरच्या भाषिक सांस्कृतिक डावपेचात्मक समीक्षा संभाषिताच्या परिप्रेक्ष्यातून संदिग्ध असे आरोपपत्र आहे- (इथे मला 'लेखाजोखा' या समीक्षात्मक ग्रंथात सतीश तांबे यांनी केलेल्या 'नेमाडे यांचा साडेतीन दशकांत तुल्यबळ प्रतिवाद झालेला नाही' या विधानाचे स्मरण होते. या संदर्भातील आणखी एक गमतीशीर रूपक डोळ्यासमोर येते, ते एका माळावर महाकाय नेमाडे धराशायी दोरखंडाने बंदिस्त असून गलिव्हरातील लिलिपुटियन समीक्षक त्यांच्या सभोवार खुंट्याशी उभे आहेत) तर थोरातांचे नवे पुस्तक प्रामुख्याने विशिष्ट दृष्टिकोनातून 'हिंदू' कादंबरीचा परामर्श घेणारे असल्याने व त्यात नव्वदोत्तर अस्मितागटांना अखेरच्या भागात 'मध्यमवर्गात'च (जात हा रूपांतरित वर्ग असतो) समाविष्ट केल्याने (साठोत्तरी वाङ्मयीन वेध घेतांना त्यांनी किमान परिघावरील व केंद्रातील म्हणत 'लघुअनियतकालिकांची सांस्कृतिक फलश्रुती' असा पवित्रा घेतलेला होता.) त्यांच्या नव्वदोत्तर उत्तराधुनिक मतांसाठी इतरत्र पाहावे लागेल. संज्ञेबाबत उत्तराधुनिक की आधुनिकोत्तर अशा विवादाची अद्याप नीटसपणे उकल झालेली झालेली नसतांना या परिप्रेक्ष्यातून मराठी कवितेवर क्ष-किरण टाकण्याचा मीनाक्षी पाटील यांचा हा प्रयत्न सकृत्दर्शनीच धाडसी मूल्यभानात्मक म्हणावा लागेल. या दृष्टीने मराठी समीक्षेतील उत्तराधुनिकतेची ओळख अद्याप 'स्वगता'च्या पातळीवरील व काहीशी नकारवाची असताना (किंबहुने-बाबर-चंद्रकांत पाटील) त्यांनी या लेखनातून संबंधित विषयसंदर्भात कोणती मूल्यवृद्धी केली आहे, हे पाहणे कुतुहलाचे ठरावे. परंतु तपशिलात पाहिल्यावर त्यांनी उत्तराधुनिकतेच्या संभाषिताची सैद्धांतिक चर्चा व चिकित्सा उपरोक्त ग्रंथात अभ्यासपूर्वक केली आहे, ही जमेची बाजू म्हणावी लागेल. परंतु असे असूनही यात नव्वदोत्तर कवितेच्या विश्लेषणासाठी निवडलेले बहुतांश कवी हे संधिकाळातील वा ढसाळ तिळवे आदी स्पष्टच नव्वदपूर्व प्रभाव पचवलेले आहेत. त्यामुळे ते या काळाचे काहीशा संमिश्रतेने प्रतिनिधित्व करत असले तरी त्या कवितेचा तोंडवळा पुरेसा परंपरेतील आहे. बंडखोरी करूनही परंपरेत उभे राहता येते, हे मर्ढेकर-ढसाळ-डहाके ते ग्रेस कवींनी दाखविले आहे. त्याचे केशवसुत ते कोलटकर-चित्रे असे तीन टप्पे प्रा. सप्रे यांनी मीनाक्षी पाटील यांच्या पुस्तकाच्या पाठराखण टिपणात व्यवस्थित उल्लेखिले आहेत. तोवर मराठी अस्मितेचे चित्र विरोधात्मक ट्रोप्स असूनही चांगल्या अर्थाने एकसंध होते. मुख्यप्रवाही व त्याला फटकून असलेल्या विद्रोही साहित्यालाही परंपरेच्या सत्त्वावर पोसलेल्या आयडेंटिटीचा तोंडवळा होता. नव्वदोत्तर पांगापांग व संकीर्णता हे वेगळेच घटित (phenomenon) असून त्याची पुरेशी चिकित्सा झालेली नसल्याने त्यातील उत्तराधुनिकतेचा बाज एक जाती (genre) युगप्रवृत्ती व मानदंड परिवर्तन (paradigm shift) म्हणून कितपत सार्थ आहे, याबाबत शंका निर्माण होते. या दृष्टीने नव्वदोत्तर कवितेचीच नव्हे तर एकूणच साहित्य-लेखनाची सडेतोड चिकित्सा प्रा. पुंगलिया यांनी उपरोक्त लेखात केलेली दिसून येते. सारांशाने मांडायचे तर या मतानुसार ९०च्या चंगळवादी जागतिक भांडवलशाहीच्या लाभार्थी शहरी मध्यमवर्गाची नैतिक अस्वस्थता मांडणारे साहित्य स्वतःलाच उत्तरआधुनिक म्हणून घोषित करू लागले. ते उत्तरआधुनिक तर सोडाच, आधुनिकदेखील उरलेले नाही. आपले जीवनशैलीबद्दलचे

बाळबोध संभ्रम ते कलात्मक व तंत्रात्मक निरागसतेने मुख्यत्वे कवितांमधून व्यक्त करते. मराठी साहित्यातील नव्वदोत्तरी बदलांचा मोठा परिणाम साहित्याच्या वाचन-व्यवहारावर झाला आहे. आता मराठी वाचन तुकड्यातुकड्यांचे वाचन आहे. प्रत्येक अस्मिता गटाचा वाचक निराळा व गृहीत धरला गेलेला असतो. वाचनातील विश्वात्मकता आणि सहिष्णुता आपण गमावलेली आहे. प्रत्येक गटाच्या साहित्याने आमचे साहित्य आमच्या अटींवर वाचले पाहिजे, त्याला सार्वत्रिक निकष लागू होत नाहीत, असा आग्रह धरला आहे. साहित्य हे एक स्वतंत्र क्षेत्र आहे, त्याचे स्वतःचे नियम आहेत, हे आपण विसरत चाललेलो आहोत. बहुसंख्यांक अस्मिता आणि दबावगटांच्या अस्मिता या दोघांमध्ये मूलभूत विचारव्यूहात्मक फरक जवळजवळ नाही. दोन्ही अस्मिता इतिहासाच्या मुद्दामहून रचलेल्या कथनांवर आधारित आहेत. महानगरांनी आपले प्रागतिक चरित्र गमावलेले आहे. ती शोषणाची केंद्रे झाली आहेत. आणि अस्मिता गटांचे साहित्य या महानगरांमध्ये बसून लिहिले जात असते. सत्तास्थानी बसलेले श्रीमंत, वंचितांच्या नावाने गळे काढणारे साहित्य इथे प्रसवीत असतात. यामुळे नव्वदोत्तरी महानगरी साहित्य केवळ एका गटाची अस्वस्थता मांडणारे साहित्य झाले आहे. आधुनिक काळातील समाजव्यवस्थेची पाळेमुळे तपासणारे साहित्य ते आता उरले नाही. विद्रोही असण्याऐवजी हे साहित्य प्रस्थापित व्यवस्थेचे मदतनीस आहे. प्रा. पुंगलिया याच्या लेखातील संक्षिप्त मासला इथे दिला असून मराठी साहित्याची नव्वदोत्तर दुरवस्था समजून घेण्याच्या दृष्टिकोनातून हा लेख मुळातून वाचण्यासारखा आहे. एकुणात आजच्या स्थितीतील एखादी कविता वाचून ती अस्मितेच्या संदर्भात नेमकी कोणत्या परंपरेत बसते, सांगणे कठीण आहे. कालपरवापर्यंत एखादे होतकरू वा खोडकर मूल पाहून ज्येष्ठांकडून 'बाळ, तू कोणाचा रे?' अशी पृच्छा केली जात असे. तसेच त्याला मिळालेल्या उत्तराने त्यांचे कमीअधिक समाधान होत असे. नव्वदोत्तरीतील साहित्य पाहता ते कितपत शक्य होईल, याविषयी शंका निर्माण होते. आणि आता 'व्रात्यस्तोम' तरी कोणाकोणाचे व किती करावेत हाही एक गमतीदार भाग आहेच. दुर्बोधतेची हाकाटी लक्षात घेऊन हलक्या हातानेच लिहिले आहे, तरी चूभूदेघे ही विनंती.

**नीतीन वैद्य :** प्रत्येक अस्मिता गटाचा वाचक निराळा व गृहीत धरलेला आहे, विश्वात्मकता आणि सहिष्णुता गमावलेली आहे, हे अगदीच खरे आहे. एकूणच समाज म्हणून विखंडित होण्याची प्रक्रिया आपण टकमक टोकावर आहोत असे वाटण्याइतकी वेगवान झालेली असताना संपूर्ण समाजाला माणूस म्हणून लावून पाहता येईल, असे काही लिहिले जाणे हे दिवास्वप्नच वाटावे. मुळातच आधुनिकतेचे आवाहन सर्व भेदांपलीकडे माणूस म्हणूनच असू शकते, तिथं कुठल्याही विशिष्ट अस्मिता आधुनिक कशा असू शकतील? असो. तुम्ही मोठ्या, सर्वात कळीच्या मुद्याला हात घातला आहे. पण पुंगलिया काय, कनाटे काय समीक्षक म्हणून निव्वळ कौतुकापलीकडे यांचे म्हणणे अरण्यरुदनच ठरायची शक्यता.

❑



# वर्णमुद्रा

## वर्णमुद्रा आगामी कवी, लेखक

१) गणेश कनाटे

२) दिनकर मनवर

३) गजू तायडे

४) जी. के. ऐनापुरे

५) नितीन अरुण कुळकर्णी

६) शैलेंद्र मेहता

७) प्रकाश हरी कार्लेकर

८) जयश्री दाणी

९) श्याम माधव धोंड

१०) वसंत आबाजी डहाके

११) संजीव खांडेकर

१२) पंकज कुरुलकर



# । वर्णमुद्रा पब्लिशर्स ।

**(वर्णमुद्राची अलीकडची प्रकाशित २५ पुस्तके)**

५८) हद, तुळसी परब, ४५०/-, कविता
५९) बिलामत, दिनकर दाभाडे, ५५०/-, कादंबरी
६०) झुरळ आणि इतर काहीबाही, प्रमोदकुमार अणेराव, ३२४/-,
६१) अभिजात, शैलेंद्र मेहता, ५२५/-, निबंध
६२) जगणं वाचणं, डॉ. राजेंद्र मलोसे, ४४४/-, कादंबरी
६३) हजार रक्तवर्णी सूर्य, राही डहाके, २४२/-, कविता
६४) जगावेगळी जीवने, शिरीष चिंधडे, ३२४/-, निबंध
६५) केवळ काही वाक्यं, उदयन वाजपेयी, अनुवाद : प्रफुल्ल शिलेदार, ३०४/-, कविता
६६) तरंगत तरंगत जाऊ घरंगळत, हेमंत गोविंद जोगळेकर, २२४/- कविता
६७) अश्वत्थयुग्मांचे श्लोक, संतोष विठ्ठल घसिंग, ५७५/-, कविता
६८) दुराव्याची धूळ व्यापून, बाळकृष्ण सोनवणे, २५०/- कविता
६९) अपरंपारावरच्या कविता, रवींद्र लाखे, ३०४/-, कविता
७०) तत्त्वभान, श्रीनिवास हेमाडे, ६८०/-, निबंध
७१) गनिमी काव्याचे नमुने, विश्वास कणेकर, ३००/-, कविता
७२) पेसोआच्या कविता, महेश्वर लव्हेकर, ४२४/-, कविता
७३) वुहानचा वाफारा, विजय तांबे, ४२४/-, कथासंग्रह
७४) सृजनस्रोत, शिरीष चिंधडे, ४२४/-, ओळखपर लेख
७५) सगळेच पर्याय संपले आहेत, उषा हिंगोणेकर, ३७५/-, कविता
७६) काळोखाचा राजपुत्र, सुप्रिया आवारे, ३००/-, समीक्षा
७७) सायलेंट आणि इतर कविता, सागर अचलकर, १५०/-, कविता
७८) असीम प्रदेश, मुग्धा देशपांडे, १५०/-, कविता
७९) खट्टरकाकांचे विनोद-आख्यान, हरिमोहन झा, अनुवाद : वसंत पाटील, ४२४/-, लेख
८०) गळ्यावरचा निळा डाग, सुनंदा भोसेकर, २५०/- कविता

---

**मुख्य वितरक :** वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स शेगाव, जिल्हा बुलढाणा मो. : ९९२३७२४५५०
**उपवितरक :** १) पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मो. : ८६२४९७७०२९
२) मैत्री पब्लिकेशन, पुणे मो. : ९६५७२४०८२४
३) वाल्डन बुक स्टोअर, पुणे मो. : ९७६६९७५१६५
४) बुककट्टा अमरावती, मो. : ८३७८८९५९१६
**मुख्य कार्यालय :** वर्णमुद्रा पब्लिशर्स, पृथक, रामकृष्णनगर, शेगाव, जिल्हा बुलडाणा ४४४ २०३
**E mail :** varnamudra.editors@gmail.com Website : www.varnamudra.com Mo. : 9923724550

# अलीकडे प्रकाशित झालेली पुस्तके





१५०/– कविता




१५०/– कविता




४२४/– लेख




२५०/– कविता

वर्णमुद्रा इ–जर्नल मे–जून २०२४ हा अंक मालक, मुद्रक व प्रकाशक मनोज सुरेंद्र पाठक यांनी
वर्णमुद्राच्या वेबसाईटवर प्रकाशित केला असून, अंकाची मुद्रित प्रत
। पृथक । रामकृष्ण सोसायटी, एसबीआय कॉलनी, शेगाव, जिल्हा बुलढाणा – ४४४२०३ येथून केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली.
**ईमेल :** varnamudra.editors@gmail.com **वेबसाईट :** http://www.varnamudra.com/

मुख्य वितरक
वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, मोबाईल नंबर : ९९२३७२४५५०
वर्णमुद्राचे उपवितरक
पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मोबाईल नंबर : ८६२४९७७०२९
वाल्डन बुक स्टोअर, पुणे मोबाईल नंबर : ९७६६९७५१६५
मैत्री पब्लिकेशन, पुणे मोबाईल नंबर : ९६५७२४०८२४
बुककट्टा अमरावती, मोबाईल नंबर : ८३७८८९५९१६